तात्या ऊर्फ तंट्या भिल्ल

यांचें चरित्र.

प्रकाशक

भावे आणि मंडळी, वाई.

वाई येथें

श्रीकृष्णमुद्रणालयांत

छापिलें.

जुलै १९०८

किंमत दहा आणे.

प्रस्तावना.

मासिकाच्या सहाव्यावर्षाची भेट ह्मणून हें लहानसें चरित्र ग्राहकांस सादर केलें आहे. सकृद्दर्शनी हे एका बंडखोराचें चरित्र असें ह्मणून कांहीजण नाकेंही मुरडतील. परंतु अंमळ विचार केला असतां अशी खात्री होईल कीं त्यानें उपयोगांत आणलेलीं साधनें परिस्थितीच्या मानानें कितीही दूषणीय ठरलीं तरी त्याच्या आंगच्या उज्वल गुणांची किंमत त्यामुळें अणुमात्रही कमी होत नाहीं. त्याची स्वातंत्र्यप्रियता, देशभक्ति, असत्यांबद्दल तिरस्कार, अचलमनोधैर्य इत्यादि गुणांबद्दल त्याची कोणत्याही काळांत प्रशंसाच होणार ! ' सारंततो ग्राह्यम पास्य फल्गु ' या न्यायानें या चरित्रापासूनही पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

हें लहानसें चरित्र पंडित मदनमोहन चंद्रसेन ज्योतिषी मु. मुरादाबाद यांच्या ' तांतियाभील ' यापुस्तकाच्या आधारें रचलें आहे.

प्रकाशक.

तात्या ऊर्फ तंट्या भिल्ल.

पहिला परिच्छेद.

तात्याचें बालपण.

मध्यप्रांतामध्यें नेमाड जिल्ह्यांतील घाटाकेरीचे समीप असलेल्या विरदा नामक गांवांत तात्याचा जन्म झाला होता. त्याच्या बापाचें नांव भाऊसिंह. या प्रदेशामधील हिंदु भिल्लांमध्यें गोप नांवाची एक जाति आहे, त्याच जातींत इ० स० १८४२ इ० मध्यें त्याचा जन्म झाला. त्याचा बाप भाऊसिंह एक साधारण मनुष्य होता. तो शेतकीवर आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवीत असे. त्याचें कुटुंब म्हणजे तो, त्याची बायको व मुलगा तात्या, एवढेंच होतें. तात्या लहान असतांनाच त्याची आई वारल्यामुळें त्याचें लालनपालन करण्याचें काम भाऊसिंहावरच पडलें होतें. लहानपणापासूनच तात्या अत्यंत बुद्धिवान् असून त्याच्या शरीराची काठी बळकट होती. लहानपणीं गांवांतील मुलांशीं खेळतांना हा त्यांचा मुख्य बने व तीं मुलेंही त्याच्याच हुकुमाप्रमाणें वागत असत. जर एखाद्या मुलानें त्याचा हुकुम तोडला तर तो त्यास दंड केल्यावांचून रहात नसें यामुळें सर्व मुलें त्यास चळचळ कांपत असत; तथापि त्या मुलांची तात्यावर

पूर्ण भक्ति असे. तात्याचे अंगची कर्तबगारी गांवांतील लोकांस तेव्हांपासूनच कळूं लागली होती. तो गावांतील पोरें जमा करून एकजुटीनें जेव्हां रानाजंगलांत खेळण्याबागडण्यास जाई, तेव्हां एखाद्या वृक्षावर खाण्यायोग्य फळें दिसलीं तर तो स्वतः झाडावर चढून फळें काढून खालीं आपल्या सोबत्यांकडे टाकी. फळें तोडतांना किंवा गोळा करितांना एखाद्या मुलानें फळ खाल्लें तर त्यास बिलकुल खपत नसे. तो त्या मुलाचा तिरस्कार करी व त्यास लाजवी. फळें काढण्याचें काम संपल्यावर तो तीं फळें आपल्या सवंगड्यांस समभाग वाटून देई; इतकेंच नव्हे तर जर एखादा आंपला सोबती गैरहजर असेल तर त्याचाही भाग तो आधीं काढून ठेवी; व मग आपला भाग घेई!

हत्याराशीं खेळण्याचा नाद तात्यांस लहानपणापासून होता. जरी त्याजवळ तरवारी, बंदुका वगैरे शस्त्रें नव्हतीं व तीं त्याने मिळविलींही नव्हतीं, तरी जें हत्यार प्रायः सर्व भिल्लांच्याजवळ असतें तें धनुष्य व बाण घेऊन तो त्याबरोबरच क्रीडा करीत असे व सतत हातांत लाठी घेऊन तो हिंडत असे. लाठीचे हात करण्यास त्याला कोणीं शिकविलें नव्हतें, तथापि त्या बाबतींतलें त्याचें कसब इतकें पुरें होतें कीं त्याचे लाठीचे हात पाहून सर्व लोक विस्मित होत. तो निशाण मारण्याचे कामांत तर फारच तरबेज होता. उडणाऱ्या पक्ष्यांवर नेमका तीर मारून त्यास खालीं पाडणें हें काम तो सहज करी.

दरवडेखोर बनण्यापूर्वी तात्याचे हातून पुष्कळ शौर्याचीं कृत्यें झालीं; परंतु त्या सर्वांचें वर्णन करीत न बसतां फक्त

एका दिवसाचीच हकीकत येथें देतों. तेवढ्यावरून वाचकांना त्याच्या शूरपणाची कल्पना करितां येईल.

संसारांतील कामें करण्यास योग्य असें तात्याचें वय झाल्याबरोबर त्याच्या बापानें शेतकीचें काम त्याच्या गळ्यांत टाकलें. त्या वेळेपासून तात्या स्वतः नांगर वगैरे हाकून शेतीची मेहनतमशागत करूं लागला. त्यावेळीं त्याचें वय २५ वर्षांचें झालें होतें. एके दिवशीं तो चारपांच शेतकऱ्यांसह आपल्या शेतांत नांगर हाकीत असतां गांवांकडे ओरडाओरड चाललेली असल्याचें त्याच्या कानावर आलें. हातांतील काम तसेंच ठेवून " काय गडबड आहे " हें समजण्याकरितां त्यानें आपले डोळे व कान गांवाकडे लावले. इतक्यांत गांवच्या बाजूनें एक मनुष्य येत आहे असें पाहून त्यानें त्यास हकीकत विचारिली; तेव्हां असें समजून आलें कीं, गांवामध्यें एक मस्त रेडा आला असून तो पुढें येणाऱ्या सर्व माणसांस शिंगावर घेऊन त्यांस फाडून टाकीत आहे ! त्याला मारण्याकरितां गांवांतील सर्व लोक एकत्र होऊन त्याच्या मागें लागले आहेत, त्याची ही गडबड आहे.

ही गोष्ट कानीं पडल्याबरोबर तात्या बैल व आऊत सोडून गांवाकडे धांवत निघाला. त्याच्या हातांत कोणत्याही प्रकारचें शस्त्र नव्हतें. फक्त बैलांस मारण्याची दीड हात लांब व अंगुळभर जाडीची एक काठी मात्र, त्याच्या हातांत होती. तीच घेऊन तो गांवाकडे मोठ्या वेगानें निघून गेला.

गांवाच्या जवळ येऊन पोंचल्यावर त्यांच्या असें दृष्टोत्पत्तिस आलें कीं, एक मस्त रेडा धापा देत गांवाच्या बाहेर येत आहे व गांवांतील सर्व लोक शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन त्याच्यामागें

लागले आहेत. तात्या त्या रेडयाच्या समोर येत आहे असें पाहून सर्व लोकांनीं त्यास पळून जाण्यास सांगितलें; परंतु, तात्यानें त्या सर्वांच्या बोलण्याकडे मुळींसुद्धां लक्ष्य न देतां हातांतील ती लहानशी काठीही टाकून देऊन तो रेडयाची वाट पाहत तेथेंच उभा राहिला! पहातां पहातां तो मस्त रेडा तात्याच्या समोर नजीक येऊन ठेपला व त्यास समोर उभा राहिलेला पाहून मोठ्या रागानें तो त्याच्याकडे धावला. रेडा तात्याकडे धावल्याबरोबर सर्व लोकांची कल्पना झाली कीं, तो तात्यास शिंगावर घेऊन आतां खास फाडून टाकणार; परंतु, तात्या मात्र मुळींच डगमगला नाहीं. रेडा जवळ येऊन ठेपल्याबरोबर त्यानें मोठ्या शिताफीनें त्याचीं दोन्हीं शिंगें पकडलीं व अशीं जोरानें दाबलीं कीं, रेडयास आपलें डोकेंही वर करतां येईना! तो मोठमोठ्यानें ओरडूं लागला व तात्याच्या भोंवतालीं घिरटया घालूं लागला. तात्याही शिंगें जोरानें दाबून धरून त्याच्याबरोबरच मंडलाकार फिरूं लागला व त्याची गर्दन मुरडण्याचा प्रयत्न करूं लागला. याप्रमाणें सुमारें पांच मिनिटेंपर्यंत त्या उभयतांची झटापट चालली होती. अखेर थकून जाऊन रेडा जमिनीवर धाडकन् पडला; व त्याबरोबर गांवच्या लोकांनीं येऊन हातांतील शस्त्रांनीं त्यास मारून टाकलें. तात्याचा हा असाधारण पराक्रम पाहून सर्व लोक विस्मित, मोहित व स्तंभित होऊन गेले.

ज्या गांवांत भाऊसिंग राहत होता, तेथें त्याची कांहीं एक जिंदगी नव्हती. तेथूनच थोड्या अंतरावर असलेल्या 'पोखर' गांवीं त्याची थोडी बहुत जमीन होती; व जमीनींत त्या गांवचा राहणारा शिवा पाटील हा भागीदार होता.

तात्याचा बाप बिरदा गांवांत जी शेती करीत असे, ती जमीन त्याची स्वतःची नसून मालगुजारी देऊन तो शेती करीत असे इतकेंच. तात्याच्या वयाच्या ३० व्या वर्षी त्याचा बाप मृत्यु पावला. बापाच्या मरणाचे वेळीं बिरदा गांवच्या जमिनीची बरीच बाकी--मालगुजारी देणें थकली होती, त्यामुळें भाऊसिंग मेल्याबरोबर मालगुजारानें आपली जमीन काढून घेतली. तात्यानें जमीन न काढण्याबद्दल मालगुजाराची पुष्कळ पायधरणी केली; परंतु, कांहीं उपयोग झाला नाहीं; तेव्हां निरुपाय होऊन तात्यानें बिरदा गांवास रामराम ठोकला व तो पोखर गांवीं येऊन राहिला.

दुसरा परिच्छेद.

तात्याची बदफैली व तुरुंगवास.

तात्या पोखर गांवीं येऊन राहिला; व बापाप्रमाणें शिवापाटलाबरोबरच भागीदारी करून शेती करण्याचें त्यानें मनामध्यें आणिलें. शिवा पाटील आपल्या बापाबरोबर शेती करीत होता; तेव्हां आतां त्याच्या पश्चात् त्याचें साह्य आपणास चांगलें मिळेल, असें तात्यास वाटून तो त्याप्रमाणें वागूं लागला; पण शिवा पाटलास हें बरें वाटेना! तो तात्याशीं खऱ्या व्यवहारानें वागेनासा झाला. त्यानें दुसऱ्या लोकांच्या साह्यानें तात्याचा जमीनीवरचा हक्क नाहींसा करण्याचा प्रयत्न चालविला व अखेर त्यानें त्या कामीं यशही मिळविलें. पोखर गांवीं शिवापाटील ह्मणजे एक बडें प्रस्थ असल्यामुळें सर्व गांव

पाटलाचे बाजूस वळून तात्याच्या विरुद्ध उभा राहिला. इकडे तात्या एकटा होता. त्याला कोणाचेंही साह्य मिळेना; तेव्हां त्यानें सरकाराचा आश्रय धरणें योग्य समजून सदर जमिनी-बद्दल शिवा पाटलावर न्यायकोर्टांत फिर्याद केली. शिवा पाटीलही तात्यांच्यां विरुद्ध मुकद्दमा लढण्यास तयार झाला. तात्याजवळ एक कवडीही नव्हती. शिवा पाटील मात्र श्रीमंत होता. त्यानें पैशाच्या जोरावर मुकद्दमा जिंकला व अशा तऱ्हेनें तात्या आपल्या वंशपरंपरेच्या जमीनीस कायमचा मुकला. आपली प्राणापेक्षांही प्रिय असलेली वडलार्जित जमीन गेल्याचें पाहून तात्यास बहुत खेद झाला. शेती करून उदरनिर्वाह करण्याचा त्याचा मार्ग बंद झाला; तेव्हां त्यानें आपलें सौम्य स्वरूप टाकलें व आपलें शेत जबरदस्तीनें आपल्या ताब्यांत घेण्याच्या नादास तो लागला. हातांत काठी घेऊन तो आपल्या शेतांत गेला व तेथें काम करीत असलेल्या शिवा पाटलाच्या नोकरांस त्यानें मार देऊन हकून दिलें. ' जो मनुष्य मला माझ्या शेतांतून बाहेर काढण्यास येईल, त्यास एके दिवशीं मी ठार मारीन ' अशा धमक्या सर्व लोकांस तो देऊं लागला. या धमकीमुळें सर्व गांव भिऊन गेला व त्यांनीं त्यास ' बदमाष ' ठरविला.

ही सर्व बातमी पोलिसास कळण्यास फार उशीर लागला नाहीं. पोलिस त्याला धरण्याच्या उद्योगास लागले. कांहीं दिवस गेल्यावर त्यांनीं एके दिवशीं तात्यास ' बदमाष ' ह्मणून पकडलें व मॅजिस्ट्रेटपुढें उभें केलें. मॅजिस्ट्रेटकोर्टांत तात्यावर आरोप शाबीत होऊन त्यांनीं त्यास एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा दिली. तुरुंग पहाण्याचा तात्याचा हा पहिलाच प्रसंग.

नागपूर येथील सेंट्रल जेलमध्यें त्यानें हें वर्ष मोठ्या कष्टानें घालविलें.

तुरुंगांतून सुटल्यावर तात्या पुनरपि पोखरगांवीं आला. त्यास या ठिकाणीं येऊन तीन महिनेसुद्धां झाले नाहींत, तोंच पुढील आपत्तीच्या भयानें त्यास तो गांव सोडून जाणें भाग पडलें. तात्याच्या प्रत्येक कृत्याबद्दल गांवांतील लोक संशय घेत. पोखरगांवीं कांहीं रजपूत राहत असत, त्यांनीं शिवा-पाटलाची मुलगी यशोदा इचें तात्यावर प्रेम आहे अशी कंडी उठविली. शिवपाटील तात्याच्या या कृत्याबद्दल संशय येऊन तो तात्याला चांगला खरपूस मार देण्याची संधि शोधूं लागला. गांवांतील लोक आपल्या विरुद्ध असून ते शिवाच्या साह्यानें आपणास पुन्हां कांहीं तरी संकटांत घालणार, असें तात्यास वाटून तो अगदीं भिऊन गेला; व अखेर त्यानें पोखर गांवास अखेरचा रामराम ठोकून तो हीरापूर गावीं जाऊन राहिला. तेथें जाऊन त्यास अठरा महिने झाले नाहींत तोंच जवळच्या बारी गावांत एक चोरी झाली. पोलिसतपास सुरू झाला व त्यांनीं तात्याला पूर्वी बदमाषगिरीबद्दल शिक्षा झाली होती हें कारण लावून या चोरीचे कामांतही त्याचा संशय घेतला व त्यांजबरोबर खजोडा गांवीं राहणाऱ्या विजनिया नांवाच्या एका भिल्लावरही संशय घेतला व त्या दोघासही पकडलें.

जेव्हां हे दोघे पकडले गेले, तेव्हां ते त्यांना धरणाऱ्या पोलिसांवर अगदीं रुष्ट झाले होते. त्यांना पोलिसांवर इतकें रागावण्याचें कारण काय हें समजत नाहीं; परंतु, कोणी कोणी ह्मणतात कीं, अपराध नसतां त्यांना पकडलें असल्यामुळें ते त्यांजवर असंतुष्ट झाले होते; व ह्मणूनच त्यांनीं पोलिसांस

मारण्याकरितां आपापल्या तरवारी उपसल्या होत्या; परंतु, त्यांनीं त्यांस न मारितां केवळ घायाळ मात्र केलें.

चोरी व पोलिसांवर हल्ला करणें हे दोन अपराध त्यांजवर ठेवून पोलिसांनीं त्या उभयतांस माजिस्ट्रेटपुढें उभें केलें. चोरीचा अपराध त्यांच्यांवर शाबीत न झाल्यामुळें या आरोपांतून माजिस्ट्रेटनें त्यांस दोषमुक्त करून सोडून दिलें; परंतु, पोलिसांवर हल्ला करण्याच्या अपराधाबद्दल त्यां दोघांसही तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा माजिस्ट्रेटसाहेबांनीं दिली. दोघांना एका तुरुंगांत न ठेवितां निरनिराळ्या ठिकाणच्या तुरुंगांत ठेविलें. तात्यानें जबलपूरच्या तुरुंगांत व बिजानियानें खांडव्याच्या तुरुंगांत हे तीन महिने मोठ्या कष्टानें काढले.

तीन महिने झाल्यावर तात्या तुरुंगांतून सुटला; परंतु, आतां इंग्रजीराज्यांत राहणें त्यास बरें न वाटून तो होळकरांचे राज्यांतील सेहुआ नामक गांवीं जाऊन राहिला व तेथें शेतकाम करून तो आपला उदरनिर्वाह चालवूं लागला.

यावेळीं पोखरगांवांतील त्यां रजपुतांच्या षडयन्त्रांत तात्या पतित झाला. हें षडयन्त्र व तुरुंगांतील घोर यातना हींच तात्या दरवडेखोर बनण्याचीं मुख्य कारणें होत. असो.

याच सुमारास पोखरगांवांतील शोभन भिल्लाच्या घरीं चोरी होऊन त्याचा बराच माल गेला. ही बातमी ऐकून पोलीस तेथें आले व त्या चोरीचा तपास करूं लागले. बराच तपास केल्यावर चोरीस गेलेल्या सर्व वस्तूंचा तपास लागला व तेथीलच जालिम नांवाच्या एका मनुष्याचे घरीं त्या वस्तु सांपडल्या; तेव्हां त्या गांवांतील रजपुतांनीं व शिवा पाटलानें जालिमला सोडविण्याचा प्रयत्न चालविला. या वरील

लोकांच्या शिकवणीनें जालिम पालसापुढें असा जबाब दिला कीं, आपल्या घरांत सांपडलेला चोरीचा सर्व माल तांत्या भिल्लानें आपणास दिला. तो इतकेंच सांगून स्वस्थ बसला नाहीं, तर त्यानें आपल्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ एक दोन साक्षीदारही तयार केले.

या गोष्टी ऐकून तात्याला पकडण्याकरितां पोलिसअधिकारी होळकर सरकारच्या राज्यांतील सेहुना गांवीं आले. तात्याला ही बातमी पूर्वींच कळली होती. "ज्या तऱ्हेनें हा खटला तयार झाला आहे, त्यांतून आतां कोणत्याही प्रकारें सुटका होण्याची आशा नाहीं. शिवाय आपण दोन वेळ कैदेंत पडलेले आहोंत. तुरुंगांतील त्या भयंकर यातना आतां आपल्याच्यानें सहन होणार नाहींत" हा विचार मनांत आणून तात्यानें पोलिसच्या भयानें घरादाराचा त्याग करून रानाजंगलाचा आश्रय केला; व जंगलांतच भटकत राहून पोलीस आणि तुरुंग यांच्या भयंकर आपत्तींतून आपला जीव संरक्षण केला.

या ठिकाणाहून त्या ठिकाणीं व या जंगलांतून त्या जंगलांत भटकत फिरत तात्यानें एक वर्ष घालविलें; व नंतर उदरपोषणाकरितां तो एकटया दुकट्या मनुष्यास लुबाडूं लागला. पोटाकरितां तो साधारण चोऱ्याही करूं लागला; व पोखरगांवांतील शिवा पाटील व रजपूत यांचा सूड घेण्याकरितां त्यानें आपणांस कांहीं लोकांची मदतही मिळविली. अशा तऱ्हेनें सांथीदार लोक जुळविल्यावर त्यांच्या पोटाकरितां त्यानें दरवडे घालण्यास सुरवात केली; आणि आपल्या शत्रूंच्या व त्यांच्या पक्षाचे लोकांच्या घरीं दरवडे घालून

मिळणाऱ्या पैशावर तो आपला व आपल्या सांथीदारांचा खर्च चालवूं लागला.

पोखरगांवावर तात्याचा इतका दांत होता कीं, त्या गांवांतील कोणीही मनुष्य कोठेंही भेटला तरी त्यास तडाका दिल्यावांचून तो सोडीत नसे. एके दिवशीं तो जंगलांतील एका पायवाटेनें जात असतां त्यास पोखरगावांतील भिका पाटलाचा भाऊ कल्लू भेटला. तात्यानें त्यास लागलींच पकडलें व त्याच जंगलांत त्याला सहा दिवस अडकवून ठेविलें. ही बातमी त्याचा बाप सरदार पाटील यास लागून त्यानें त्याबद्दल पोलिसास वर्दी दिली.

पोलिस लोक प्रथमपासून तात्याच्या तपासांत होतेच. त्यानां ही वर्दी मिळतांच ते तात्यास पकडण्यास निघाले; परंतु, तात्याचा शोध त्यांना लागला नाहीं; तेव्हां आतां दुसरा कोणताही उपाय नाहीं असें समजून सरदार पाटलानें निहालनामक एका मनुष्याच्या हातीं १०० रुपये तात्याकडे पाठवून कल्लुला सोडवून आणलें.

पोखर गांवीं फक्त निहालच. तात्याचा मित्र होता व तात्याचाही निहालावर पूर्ण विश्वास होता. याच कारणामुळें सरदार पाटलानें त्याच्या विद्यमानें तात्याकडे सदर रुपये पाठीवले.

ही गोष्ट होऊन थोडे दिवस झाल्यावर पोखर गांवांतील मोहन पाटील नांवाचा एक मनुष्य सेहुवा गांवीं आला. त्या गांवाजंवळंच्याच एका जंगलांत त्यास तात्या भिल दिसला. तात्याची दृष्टभेट झाल्याबरोबर तो रडूं लागला व ह्मणाला कीं, "आईबापांनीं माझा फार अपमान केला; व त्यांनीं

अत्यंत निर्दयतेनें मारलें; मी तुह्मांकडे पळून आलों. मी आतां असा निश्चय केला आहे कीं, आजन्मपर्यंत बाबाकडे न जातां आपल्याजवळच रहावयाचें." ही गोष्ट तात्यानें लक्ष्यपूर्वक ऐकिली. मोहनचें त्यानें शांतवन केलें व धूर्त शिरोमणि मोहनचें कपटजाल न जाणून त्यानें त्यास चार दिवस आपणाजवळ ठेवून घेतलें. अखेर मोहननें इच्छा दर्शविली ह्मणून दोघेही बरोबर खजोडा गांवीं बिजनियाचे घरीं गेले. बिजनियानें त्या उभयतां पाहुण्यांचें चांगलें आदरातिथ्य करून त्यांस जेवावयास घातलें. तदनंतर खजोडा सोडून ते दोघे संध्यांकाळचे सुमारास पोखर गांवीं येऊन पोंचले. तेथें पोंचल्यावर तात्यानें आपला प्रियबंधु निहाल याच्या घरीं रात्र घालविली. निहालनें मोठ्या आदरानें त्यास आपल्या घरीं जागा दिली व त्याच्या विरुद्ध तेथें जो जो प्रकार घडला तो-ही त्यानें त्यास सांगितला.

तात्या आपल्या गांवीं आल्याची बातमी ऐकून दुसरे दिवशीं प्रातःकाळींच सरदारपाटलानें मोहन व हिरवाल या दोघांस बरोबर घेऊन तात्याची भेट घेतली. त्यानें तात्यास मिठया मिठया बाता सांगून, त्याच्या इतके दिवस जंगलांत राहण्याबद्दल दुःख प्रदर्शित करून व ज्या खटल्यामुळें त्यास इतके कष्ट सोसावे लागले, त्या खटल्यांतून त्यांस वांचविण्याची प्रतिज्ञा करून त्यांस आपल्या घरीं आणलें. त्यानें त्यांस असेंही सांगण्यास कमी केलें नाहीं कीं, तात्यानें माझ्या मुलास फसवून कधींही नेलें नाहीं असें स्टांपावर लिहून देतों.

सरळ स्वभावाचा मनुष्य तात्या सरदारपाटलाच्या वरील

बोलण्यावर विश्वास ठेवून कोणत्याही प्रकारचा विचार न करितां त्याच्या घरीं गेला. त्याच्या घरीं पोलिसलोक गुप्त रीतीनें बसले होते. तात्या घरांत शिरल्याबरोबर पोलिसांनीं त्यास एकदम गराडा घालून धरिलें. तात्या सहज रीतीनें पकडला गेला व सरदारपाटील आपल्या विश्वासघाताबद्दल मनांतल्या मनांत विचार करूं लागला. पोलिसांनीं तात्यास मोठ्या बंदोबस्तानें खांडव्यास नेलें व तुरुंगांत नेऊन ठेविलें.

त्याच दिवशीं तात्याचा एक साथीदार दौलिया भिल्ल पकडला जाऊन त्याच ठिकाणीं आणिला गेला व दुसरे दिवशीं तात्याचा मुख्य मंत्री बिजनिया यांसही धरून तेथेंच आणलें. अशा रीतीनें हे तिघेजण खांडव्याच्या तुरुंगांत काळ कंठूं लागले.

तिसरा परिच्छेद.

नेमाडचें न्यायकोर्ट. सन १८७८ इसवी.

जो तात्या भिल्ल यावेळपर्यंत स्वतंत्रतेनें वाटेल तिकडे हिंडत होता, तो आज इंग्रजी न्यायकोर्टांत माजिस्टेट समोर भयंकर आरोपावरून कैदी ह्मणून उभा आहे. आह्मास जें कठिण वाटतें, व ज्याबद्दल आह्मांस भय वाटतें, त्यास तात्या काय समजतो, व त्याबद्दल त्याचे काय विचार असतील, कोणजाणें.? असो.

आजं ज्या ठिकाणीं तात्यावरील आरोपाची चौकशी चालली आहे, तें मध्यप्रांतांतील नेमाड जिल्ह्याचें न्यायकोर्ट आहे. हें विटांचें केलेलें एकमजली घर अथवा वाडा आहे.

याचा मध्यभाग चांगला लांबरुंद आहे. याच ठिकाणीं बसून न्यायाधीश चौकशीचें काम करितात. या मध्यभागाच्या पूर्वेस आणि पश्चिमेस अशीं दोन छोटीं दालनें असून त्यास आफीस किंवा दप्तर ह्मणतात. याठिकाणीं कागदपत्र असतात व येथेंच कारकून वगैरे लिहिण्यासवरण्याचें काम करितात. ही कचेरी ज्या ठिकाणीं आहे, तेथून कांहीं अंतरावर निरानिराळे असे अनेक बंगले आहेत; व त्यांतूनही निरानिराळीं कोर्टें आहेत. त्या कोर्टांतून निरनिराळे अधिकारी असून तेथेंही निरानिराळ्या प्रकारच्या खटल्याचें चौकशीचें काम चालतें. सर्व कोर्टें लांबरुंद व स्वच्छ आहेत. त्या कोर्टांच्या सभोंवतीं मोठ्या गर्वानें वरतीं डोकीं काढून सुरूचीं झाडें सुसूचा आनंदध्वनि करीत इंग्रजीराज्याच्या विजय-कीर्तीचा जणू डंकाच वाजवीत आहेत.

तात्याच्या चौकशीची तारीख २० नवंबर होती. या दिवशीं कोर्टांत इतकी गर्दी झाली होती, मनुष्य पुढच्यास मागें सारून पुढें जाण्यास समर्थ नव्हता. या गर्दीत बहुतेक भिल्ल लोकच होते. आह्मी ज्यांस असभ्य समजून तुच्छ दृष्टीनें पहातों, तेच हे भयंकर व काळ्या वर्णाचे लोक होत. या लोकांपैकीं कित्येकांच्या अंगावर वस्त्र नव्हतें, कित्येकांच्या पायांत जोडा नव्हता व कित्येक तर बोडकेच होते. जरी ते असे दीन होते, तरी सहानुभूति, ऐक्य व स्वजातियांवर प्रेम इत्यादि गुण त्यांच्यामध्यें चांगल्या प्रकारें वसत होते. आज तात्या वगैरे आपल्या जातिबांधवांचें काय होतें, हें पाहण्याकरितां ते मुद्दाम लांबलांबच्या गांवाहून आले होते. उशीर झाल्यास कोर्टांत जागा मिळणार नाहीं, ह्मणून ते सकाळपासूनच तेथें येऊन बसले होते. न्यायाधीशाचे चप-

राशी कोर्टांत आल्यावर ते जमलेल्या भिल्ल लोकांवर आपला अधिकार चालवूं लागले. ते कोणाला चुप करूं लागले, कोणाच्या डोक्यावर थप्पड मारून त्यांस मागें सारूं लागले व कित्येक अभागी लोकांस तर ते त्यांचें मानगुटें धरून बाहेरही घालवून देऊं लागले. गरीब बिचारे, ते काय करणार ! चपराशाच्या हुकमाप्रमाणें ते गुपचुप बाहेर जात; व पुन्हां संधि मिळतांच चोरून लपून आंत शिरून आपण प्रथमतःच आलेले आहोंत, या बहाण्यानें कोठें तरी उभे रहात.

वर सांगितलेल्या न्यायकोर्टामध्यें लांकडाच्या एका उंच खुर्चीवर एक इंग्रज न्यायाधीश बसला आहे. त्याच्या समोर एक टेबल असून त्यावर कांहीं कागद पडले आहेत. त्याच्या उजव्या हातांत एक अस्थींच्या दांडीचा टांक असून टेबलावर टेकलेल्या डाव्या हातावर झुकतें डोकें टेंकून समोर उजव्या बाजूस साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत उभ्या असलेल्या एका साक्षीदाराची जबानी तो चित्त लावून ऐकत आहे व पुढें ठेवलेल्या कागदांवर कांहीं लिहीत आहे. त्याच्या रक्त मुखावर एक विशेष लाल प्रकाश पडलेला दिसत आहे व त्याचा गंभीर चेहेरा जास्तच गंभीर होत आहे; मात्र नेत्रांच्या कोपऱ्यांतून कांहीं रागाचा जोर प्रकट झाल्याशिवाय राहत नाहीं. न्यायाधीशाच्या डाव्याबाजूस दोन देशी गृहस्थ बसले आहेत. त्यांचीं वस्त्रें वगैरे पाहतां असें दिसतें कीं, ते त्या प्रांतांतील सन्माननीय गृहस्थ आहेत. ते चाललेली चौकशी ऐकत आहेत किंवा डोळे मिटून बसले आहेत; किंवा झोपेंत गुंग आहेत, हें कळणें कठीण आहे; पण ते त्या ठिकाणीं बसले आहेत एवढें मात्र खरें !

न्यायाधीशाच्या समोर पण थोडे खालीं न्यायाधीशाकडे तोंड करून एक मुसलमान मुनशी बसला असून कांहीं लिहीत आहे. काय लिहीत आहे, हें त्याचें त्यास ठाऊक; परंतु, मध्यें साक्षीदार व आरोपी यांस जें कळत नसे, तें तो समजून देत असे.

न्यायाधीशाच्या खुर्चीसमोर उभा राहिलेला एक मनुष्य साक्षीदारास मार्मिकपणें कांहीं प्रश्न करीत आहे. याच्या ढिल्या पायजम्यावरून व पगडीवरून हा सरकारी वकील असावा असें वाटलें. आरोपीच्या विरुद्ध उभा राहून त्याचा सर्वनाश करण्याची खटपट तो करीत आहे व खरें कोणतें व खोटें कोणतें हें न्यायाधीशास तो समजावून देत आहे. त्याच्या दोन्ही बाजूंस त्याच्याप्रमाणें पोशाक केलेले आणखी बरेच गृहस्थ बसले असून न्यायाधीशाचें कार्यकर्तृत्व ते पाहत आहेत व मध्येंच उठून वकिलाच्या कानांत कांहीं सांगून ते फिरून आपल्या जागेवर बसत आहेत.

याच्या मागल्या बाजूचा देखावा मात्र अत्यंत भयंकर आहे. तेथें दीड हात रुंद व पांच हात लांब असें जोतें घातलें असून त्यावर तीन हात उंचीचा एक कठडा चोहोंबाजूंनीं केलेला आहे. त्या कठडयामध्यें न्यायाधीशाकडे तोंड करून तीन मनुष्यें उभीं आहेत. त्यांच्या डाव्या, उजव्या व मागल्या बाजूस शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन पहारेकरी उभे आहेत. या तिघांचा वर्ण काळा, छाती रुंद, हात लांब, मस्तक विशाल, शरीर बलिष्ठ, मांडया स्थूल, चेहेरा गंभीर व डोळे रक्तवर्ण होते. त्यांच्या मुखश्रीवरून असें वाटतें कीं, त्यांना कसल्याही प्रकारचें भय वाटत नाहीं. त्यांतील उत्तरेच्या अंगास उभा

असलेल्या मनुष्याचें वय ३९ वर्षांपेक्षां जास्त नव्हतें; परंतु, त्याच्यांकडे पाहिलें ह्मणजे मनामध्यें भीति व भक्ति हीं दोन्हीही संचार होतात. याचेंच नांव तात्या उर्फ तंटया भिल्ल ! ज्याप्रमाणें सिंहाचा बच्चा स्वतंत्रतेनें हिंडतां हिंडतां पत्थरांचे ढीग किंवा वृक्षांच्या जाळीं या अडव्या आल्यामुळें पुढें जाण्यास अडचण आल्यावर क्षणभर थांबून सभोंवार पाहतो, त्याप्रमाणें आज तात्याही त्या बंदिस्त जाग्यांत उभा राहून तिरस्कारयुक्त दृष्टीनें पाहत आहे. अडचणीच्या जाग्यांतून निसटून जाण्याकरितां सिंहाचा बच्चा जसा विचार करितो, त्याप्रमाणेंच तात्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें ह्मणजे असें दिसून येतें कीं, तोंही सुटका होण्याची युक्ति योजीत आहे. तो वारंवार वांकडी नजर करून आपल्या जवळच्या साथीदारांकडे पाही व तोंड लपवून हांसे. त्याच्या चेहऱ्यामध्यें वारंवार फेरबदल होत. त्याचे लाल डोळे अधिक लाल होत व तो क्रोधदृष्टीनें त्या साक्षीदाराकडे पाही.

तात्याच्या डाव्या बाजस उभा असलेल्या मनुष्याचें वय ३० वर्षांपेक्षां कमी नव्हतें. त्याचा चेहेरा इतका भयंकर आहे कीं, तो पहातांच भीति वाटते. याचेंच नांव बिजनिया भिल्ल. याच्याकडे पाहिल्यास असें स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येतें कीं, विलक्षण क्रोधानें तो अगदीं भरला आहे; पण तो तो क्रोध दाबण्याचा प्रयत्न करीत आहे. राखेंत पुरून ठेविलेला अग्नि झांकला जातो खरा; पण तो फार वेळ गुप्त रहत नाहीं. लवकरच सहज बाहेर पडतो.

तिसऱ्या मनुष्याचें वयही ३० पेक्षां कमी नाहीं. त्याचें नांव दौलिया भिल्ल. यांच्या मागल्या बाजूस भिल्ल लोकांची

अगदीं गर्दी झाली होती. या गर्दीत कोण मनुष्य परिचित व कोण अपरिचित हें कळणें अत्यंत कठीण होतें.

ज्या मनुष्याची साक्ष चालली होती, त्याचें नांव हिम्मत पाटील. तो नेमाड जिल्ह्यांतील भीनपान गांवांतील एक मोठा जमीनदार होता.

चवथा परिच्छेद

तात्याची चौकशी.

हिम्मत पाटलाची साक्ष संपली; तेव्हां तात्याकडे तोंड करून न्यायाधीशसाहेबांनीं त्यास हंसत हंसत सांगितलें कीं " तात्या, तूं ऐकलेंसना ! हिम्मत पाटलानें तुझ्या विरुद्ध साक्ष दिली आहे. तुला जर यावेळीं त्यास कांहीं प्रश्न करावयाचे असतील तर तसें करण्यास तुला सध्यां अधिकार आहे. " न्यायाधीशांचे हे शब्द ऐकून तात्या म्हणाला:— " या ठिकाणीं उभे राहून त्यानें बऱ्याच खोटया गोष्टी सांगितल्या आहेत, तेव्हां मी त्यास काय विचारूं ? तथापि जर आपण सांगतां आहां, तर एक दोन गोष्टी त्यास विचारून पहातों. हा दुष्ट किती खोटें बोलतों, हें तरी पाहूं या ! "

इतकें बोलून तात्या हिम्मत पाटलाकडे क्रोधीत मुद्रेनें पाहून म्हणाला: — " हिम्मत, तूं शपथ घेतली आहेस व खोटें बोलणार नाहीं असें म्हणून न्यायाधीशापुढें उभा आहेस. या वेळीं तरी तूं खरें बोल. तात्यावर तूं उपकार कर, असें

मी ह्मणत नाहीं; पण खरें बोल. तात्या दरवडेखोर आहे ही गोष्ट खरी असली तरी त्याला खोटें सहन होत नाहीं. तूं खोटें सांगूं नको. खरें बोल. खोटें बोलण्यानें परलोकप्राप्ति होणार नाहीं. " इतकें बोलून तात्या गप्प उभा राहिला. तदनंतर हिम्मत ह्मणाला:— " मी जें सांगितलें आहे; तें सर्व खरें आहे. मी खोटें सांगितलें नाहीं व खोटें सांगण्याची माझी इच्छाही नाहीं. "

हिम्मत पाटलाच्या तोंडचे हे शब्द कानीं पडतांच तात्यानें सिंहासारखी गर्जना केली. त्याचें दोन्ही नेत्र आरक्त झाले, ओंठ थरथर कांपूं लागले, व तो तेथेंच मोठ्यानें ओरडून ह्मणाला:— " हिम्मत, कोणाच्या समोर उभा राहून खोटी साक्ष देत आहेस, हें तुला ठाऊक नाहीं काय ? तूं जर यावेळीं न्यायाधीशापुढें उभा राहिलेला नसतास व मीही कैदी नसतों, तर मीं तुझी काय दशा केली असती, हें या सर्व लोकांनीं पाहिलें असतें. थांबळेंस मी तुला काय सांगूं ? पण लक्ष्यांत ठेवं कीं, मी नांवाचा तात्या भिल्ल आहें व तूं या तात्याच्या विरुद्ध खोटी साक्ष दिली आहेस ! ज्याच्या सांगण्यावरून तूं ही खोटी साक्ष दिली आहेस, त्या आपल्या गुरूसही तूं जाऊन सांग कीं, " माझें नांव तात्या आहे ? "

हे शब्द तात्याच्या तोंडांतून निघाल्याबरोबर कोर्टांत जमलेले सर्व लोक स्तंभित झाले ! न्यायाधीशसाहेब तात्यावर फार रागावले ! हिम्मत पाटील हळू हळू मागें सरत सरत एका शिपायीच्या आड लपला ! तात्याही यावर कांहीं बोलला नाहीं. तो रागानें हिम्मपाटलाकडे मात्र पहात होता.

चौकशी अंतीं या अपराधी लोकांवर चोरी, बदमाषी व

वर फोडणें इतके अपराध शाबीत धरून न्यायाधीशसाहेब आरोपीस ह्मणाले:— " माझ्या मतें तुह्मी अपराधी ठरला आहां ! यावर तुह्मास कांहीं ह्मणावयाचें आहे काय ? "

हें ऐकून तात्या ह्मणाला:— " जर आपल्या मतानें आह्मी दोषी ठरलों आहों, तर आतां काय बोलावयाचें ? आह्मी दरवडेखोर आहों, दरवडे घालण्याचाच आमचा धंदा आहे; व त्यावरच आह्मी आपला उदरनिर्वाह चालवितों, यांत संशय नाहीं; परंतु, या नीच हिम्मत पाटलाच्या खोट्या बोलण्यानें माझें सर्व शरीर जळत आहे. सूड घेण्याच्या प्रवृत्तीनें माझ्या हृदयावर अंमल बसविला आहे. मी दरवडेखोर तर खराच; परंतु, खोटें बोलण्याची मला फार चीड आहे. प्राण जाण्याची वेळ आली तरी बेहेत्तर; पण मी खोटें बोलणार नाहीं. मी या खटल्यांत दोषी आहें ही गोष्ट खरी; परंतु, या पाप्यानें सांगितलेल्या सर्व गोष्टी खोट्या आहेत. मी यावेळीं जास्त कांहीं बोलूं शकत नाहीं; परंतु वेळ येईल तेव्हां सर्वांस माझी हकीकत कळेल.." इतकें बोलून तात्यानें आणखी एक दोन वेळ हिम्मत पाटलाकडे पाहिलें. बिजनिया व दौलिया हे कांहीं बोलले नाहींत; ते हिम्मत पाटलाकडे मात्र सारखे पहात होते. नंतर सर्व लोकांचें लक्ष न्यायाधीशाच्या निकालाकडे लागलें. साहेब खालीं मान घालून लिहूं लागले— कांहीं वेळानें डोकें वर करून ते ह्मणाले:— " आरोपीनों, कित्येक दिवस तुमचा खटला चालल्यावर आज फैसला होण्याची वेळ आली आहे. माझ्या मतें तुह्मी सर्व प्रकारें दोषी आहां; तुह्मीही आतां ती गोष्ट कबूल केली आहे. मी तुमच्या पैकीं कोणालाही कमी दोषी समजत नाहीं. तुह्मी आतां सर्व

जण• तुरुंगांत जा. मागाहून जो निकाल होईल तो तुह्मांस कळविला जाईल. ”

हा हुकूम ऐकतांच तेथें जमलेले सर्व लोक हळूं हळूं बाहेर जाऊं लागले व चपराशीही त्यास तेथून बाहेर घालवून देऊं लागले. सर्व लोक गेल्यावर आरोपींच्या हातांत हातकड्या घालून त्यांना तेथून मोठ्या बंदोबस्तानें कारागृहांत नेण्यांत आलें.

पाचवा परिच्छेद.

तात्यांचा कारागृहवास.

तात्यामध्यें असाधारण शक्ति, पराक्रम व रग होती. शिवाय त्याचे दोन साथीदारही यावेळीं त्याजबरोबर होते; तेव्हांच तो मनांत आणता तर हातांत बिड्या होत्या तरी सभोंवतालच्या शिपायांच्या डोळ्यांत धूळ टाकून तो पळून जातां; परंतु त्यानें असें न करितां आपल्या साथीदारांसह तो शांतपणें खांडव्याच्या तुरुंगांत शिरला.

खांडव्याचा तुरुंग लहान नाहीं. ज्यानें हा तुरुंग पाहिला आहे तो असें सांगेल कीं, हिंदुस्थानांत जितके मोठे मोठे तुरुंग आहेत, त्यांपेक्षां हा मोठा नसला तरी लहान खचित नाहीं. तुरुंगांत जाण्यास फक्त एक मार्ग आहे. त्यांत एकामागें एक असे दोन मोठे मोठे लोखंडी दरवाजे आहेत. हे दोन दरवाजे एकदम कधींही उघडीत नाहींत. या दोन दरवाजांच्यामध्यें सतत एक शिपाई पहारा करीत असतो.

जव्हां एखाद्या मनुष्यास तुरुंगाचे आंत न्यावयाचें असतें, तेव्हां प्रथमतः पुढील दरवाजा उघडतात. त्यांतून तो मनुष्य आंत गेला ह्मणजे तो दरवाजा बंद करितात व मग दुसरा उघडतात. व हा दुसरा दरवाजा खोलांडिल्यावर मग खरा तुरुंग लागतो. ह्या दुसऱ्या दरवाज्याच्या आंत त्या मनुष्याचें पाऊल पडल्याबरोबर तोही दरवाजा लावला जातो. जर कोण्या मनुष्यास तुरुंगांतून बाहेर आणावयाचें असेल तर त्यास याच तऱ्हेनें बाहेर आणतात; ह्मणजे प्रथमतः आंतील पाहिला दरवाजा उघडून त्यास तुरुंगाच्या बाहेर काढतात व मग पुढील दरवाजा उघडून त्यास बाहेर आणितात. या तुरुंगाचा कोट चुनेगच्चीचा असून वीस फुट उंच आहे. कोटावर ठिकठिकाणीं चौक्या असून तेथें रात्रंदिवस उभे राहून पहारेकरी मोठ्या सावधगिरीनें पहारा करितात. पाऊस असो, अंधःकार असो, वारा येवो, कीं थंडी पडलेली असो, त्यांना तेथेंच पहारा करावा लागतो. जरी या चौक्या तटावर आहेत; तरी त्या तटाचा किंवा तुरुंगाचा यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं. तुरुंगाच्या बाहेरच्या बाजूनेंच या चौक्या आहेत व त्यांवर जाण्याचा मार्गही बाहेरूनच आहे.

तुरुंगाचे आंतील जागा ठिकठिकाणीं भिंती घालून विभागिलेली आहे. या आंतील भिंतीही कमी उंच नाहींत. त्या १९ फुट उंचीच्या आहेत. ह्यांस वार्ड ह्मणतात. प्रत्येक वार्डांत नियमित कैदी असतात. जास्त कैदी एका वार्डांत ठेवित नाहींत. कैद्यांची राहण्या निजण्याची जागा ती हीच. सर्व दिवस मजुरी करून सायंकाळीं कैद्यास त्यांच्या त्यांच्या वार्डांत पोंचविण्यांत येतें. आंत शिरतांना तेथील पहारेवाले किंवा

वार्डर त्यांची गणती करून त्यांस कोठड्यांत बंद करितात. या कोठड्या लांबीरुंदीला कमी नसतात. वार्डांत जितके कैदी राहण्याचें ठरविलें असतें, तितक्याच निजावयाच्या जागा तेथें तयार केलेल्या असतात. सायंकाळ झाल्यावर कैदी तेथेंच जाऊन रात्रभर निजतात.

हीं शयनागारें दिसण्यांत वाईट नसतात. दीड हात रुंद, साडेतीन हात लांब व अर्धा हात उंच अशीं ही शयनस्थानें विटांचीं तयार केलेलीं असून त्यांवर चुन्याचा गिलावा केलेला असतो. एकेक फुटाच्या अंतरानें हे ओटे घातलेले असतात. हाच कैद्यांचा पलंग ! त्यावर विटांचीच एकेक उशी असून एक कांबळ्याचें पट्टेंही तेथेंच पडलेलें असतें. दिवस मावळल्यावर कैदी आपापल्या ठिकाणीं जातात व पहारेकरी त्या कोठड्यांच्या लोखंडी दरवाज्यास कुलुपें ठोकून दारें बंद करितात व आपल्या ठिकाणीं जाऊन पहारा करितात.

तुरुंगांत एके ठिकाणीं एक कार्यालय ह्मणून केलेलें असतें. त्या ठिकाणीं कैदी लोक नेमून दिलेलीं कामें करीत बसतात. या तुरुंगांत सर्व प्रकारचीं पृथक् पृथक् कामें चालतात. कोठें कोठें मोठमोठे घाणे असून तेथें बैलाप्रमाणें काम करून कैदीलोकांस तेल काढावें लागतें. कित्येक ठिकाणीं दगडांचे ढीग पडले असून ते फोडण्याचें काम कैदी करीत असतात. कोठें छापखाना कोठें चटया विणण्याचा कारखाना व कोठें बगीच्या करणें इत्यादि आहे.

याच्या शेजारींच एक स्वयंपाकघर आहे. नियमित वेळीं भोजनाची घंटा वाजतांक्षणीं सर्व कैदी आपापले लोखंडाचे थाळे घेऊन तेथें ओळीनें बसतात. तेच त्या थाळ्यांत

अन्न घेऊन खातात व त्याच थाळ्यानें पाणी पितात.

वर जें दोन दरवाजांचें वर्णन केलें, त्यांच्या मध्यें एकेका बाजूस दोनदोन बंगले आहेत, तेथें तुरुंगाची कचेरी आहे. या ठिकाणीं बसून तुरुंगावरील कामगार आपापलें काम करीत बसतात. यांचीं राहण्याचीं ठिकाणें मात्र तुरुंगाचे आंत नाहींत. बाहेर तुरुंगाजवळच ते राहतात.

तात्या, बिजनिया व दौलिया तुरुंगाचे आंत गेले. त्यांच्या बापाचें नांव, राहण्याचें ठिकाण, शरीराची उंची, शरीरांवरील एखादी विशिष्ट खुण व कोणत्या अपराधाबद्दल शिक्षा झाली, इत्यादि गोष्टी लिहून घेतल्यावर वार्डरांच्या आज्ञेनें ते ७ नंबरच्या वार्डांत गेले. या दिवशीं यांना कांहींच काम करावें लागलें नाहीं. केवळ कैदी ह्मणून ते कैद्याच्या त्या अंथरुणावर निजून राहिले.

या तुरुंगांमध्यें तात्याच्या टोळींतील दहा भिल्ल कैदी होते. ते एका दरवड्याच्या खटल्यांत सांपडले जाऊन त्यांस कैदेची शिक्षा झाली होती. त्यांनीं एकाएकीं आज आपले दोन सरदार व आपल्या टोळींचा नायक तेथें आल्याचें पाहून ते त्यांच्या जवळ गेले व त्यांस प्रणाम करून त्यांनीं दुःख प्रदर्शित केलें. तात्यानें त्यांचें कुशल विचारून व त्यांस धीर देऊन तो ह्मणाला:— "आमच्या करितां तुह्मी दुःख करूं नका. कारण जरी मी कैदी ह्मणून येथें आलों आहें तरी मी कैदी नाहीं असें तुह्मी समजा. तुह्मांस पाहण्याकरितां मी अगदीं उतावीळ झालों होतों; ह्मणून परमेश्वरानें माझी इच्छा पूर्ण करण्याकरितां मला आज येथें पाठविलें आहे. तुह्माला सोडविण्याकरितां मी येथें आलों आहे. जोंपर्यंत

वाटेल तोंपर्यंत मी येथें राहीन व अखेर तुह्मांस बरोबर घेऊन येथून चालता होईन. "

तात्याचें हें भाषण ऐकून सर्वजण त्यांस धन्यवाद देऊं लागले. जो आपल्या सोबत्यास भेटण्याकरितां आपल्या प्राणाचीही पर्वा करीत नाहीं व आपल्या साथीदारांकरितां हंसत हंसत मोठ्या डोहांत उडी टाकण्यासही भीत नाहीं, त्याची गणना साधारण मनुष्यांत आमच्यानें करवत नाहीं.

तात्या कैदी ह्मणून जितके दिवस तुरुंगांत राहिला होता, तितके दिवस त्यांस कांहीं विशेष कष्ट झाले नाहींत.

एके दिवशीं एका वार्डरानें तात्याशीं कांहीं चढीची भाषा केली, त्याच दिवशीं तो एके ठिकाणीं जखमी होऊन पडलेला सांपडला; परंतु, त्यास जखमी कोणीं केलें, हें कांहींच समजलें नाहीं. कैद्यांजवळ चौकशी करतांही त्याचा कांहींच पत्ता लागला नाहीं. मात्र आपली अशी दशा कां झाली कोणीं केली हें त्या वार्डरास मात्र पूर्णपणें समजलें होतें.

ही सर्व गोष्ट हळूं हळूं तुरुंगावरील अधिकाऱ्याच्या कानांवर गेली; तेव्हां अशा प्रकारचा बंदोबस्त झाला कीं, तात्याला कोणांकडून कसल्याही प्रकारचें साह्य मिळूं नये; परंतु, अखेर या बंदोबस्ताचें निराळेंच फळ मिळालें.

सहावा परिच्छेद.

तात्या तुरुंगांतून पळाला.

ता. २४ दिसेंबर रोजीं सायंकाळापूर्वीं तात्याला असें कळलें कीं, आपल्या मंडळींत कांहीं गुप्त बेत चालला आहे. ही

बातमी त्याला कळतांक्षणीं त्यानें आपल्या दोन सरदारांबरोबर कांहीं एकांत केला ? काय एकांत केला. हें मात्र दुसऱ्या कोणास कळलें नाहीं; मात्र त्या तुरुंगांत असणाऱ्या भिल्ल कैद्यांना थोडासा आनंद झालेला दिसला. सर्वांचीं मनें उल्लसित झालीं. असो.

ते प्रति दिवशीं संध्याकाळीं ज्याप्रमाणें आपल्या वार्डांत निजावयास जात, त्याप्रमाणें याही दिवशीं गेले. ते सर्व आपल्या वार्डांत गेल्यावर पहारेवाल्यानें सर्वांची हजेरी घेऊन दारास कुलूप ठोकलें व तो आपल्या ठिकाणीं निघून गेला. हळूं हळूं रात्र झाली. दुसऱ्या वार्डांतील सर्व कैदी डाराडुर घोरूं लागले.

अशा वेळीं दौलियानें आपले अंगावरील वस्त्र काढून तें त्या कोठडीच्या कडीवर फेंकलें व मोठ्या चतुराईनें तें वस्त्र त्या कडीस बांधून त्यावरून तो त्या कडीवर जाऊन बसला. कडी ज्या ठिकाणीं भिंतींत गेली होती, त्या ठिकाणीं पुढल्या बाजूस एक लहानसें छिद्र होतें.

आह्मी अतां या ठिकाणीं दौलियाच्या साहसास धन्यवाद देतों व त्याच्या नखांच्या शक्तीची प्रशंसा करितों. त्यानें त्या छिद्राच्या ठिकाणीं जाऊन आपल्या नखानें तेथला चुना काढला; व हळूं हळूं एकेक मिळून त्यानें तेथील कित्येक विटाही उखळल्या. यानंतर त्या कडीस बांधलेल्या वस्त्राच्या साह्यानें ते बिनजप्प त्या पाडलेल्या भगदाडांतून कोठडीच्या बाहेर वार्डांत आले.

सात नंबरच्या वार्डाजवळ आठ नंबरचा वार्ड होता. याच वार्डांत दुसरे भिल्ल कैदी होते. याच्या पलीकडे दुसरी कोण-

ताही. वार्ड नव्हता. तुरुंगाचा तट या वार्डाची एक भिंत होती. वार्डाचे आंत कोणी पहारेकरी राहत नसून त्या १९ फूट उंच भिंतीच्या वाडीच्या दारास कुलूप लावून दाराच्या बाहेर पहारा करीत असत. वार्डाच्या आंतील कोण ताही प्रकार त्यांस सहज समजण्यासारखा नव्हता.

ते तिघेजण तेथून बाहेर पडून ८ नंबरच्या वार्डाचे भिंती कडे जाऊन भिंतीला धरून ते एकमेकांवर उभे राहिले; ह्मणजे एकजण जमीनीवर उभा राहिला; दुसरा त्याच्या डोक्यावर पाय देऊन त्याजवर उभा राहिला; व तिसरा दुसऱ्याच्या डोक्यावर पाय देऊन उभा राहिला; अर्थात सर्वांच्या वर उभा राहिलेला तिसरा मनुष्य १९ फुट उंचीच्या भिंतीवर सहज जाऊं शकला; भिंतीवर जाऊन त्यानें आपले दोन्ही पाय त्या भिंतीच्या एका कोनांत कुशलतेनें अडकवून मोठ्या सावधगिरीनें त्यानें आपले हात व डोकें खालीं सोडलें; ह्मणजे तो उलटा लोंबकळला. त्यांच्या दोन्ही हातास खालील दुसरा मनुष्य लोंबकळला; त्याबरोबर जमीनीवर उभा राहिलेला मनुष्य दूर झाला व त्यानें त्या दुसऱ्या मनुष्याचे पाय धरिले; पुढें पाय सोडून कंबर धरिली; कंबर सोडून डोकें धरिलें; डोकें सोडल्यावर तिसऱ्या मनुष्याचे हात धरिले; हात सोडून कंबर धरिली व कंबरेवरून तो भिंतीवर जाऊन उभा राहिला. येणेंप्रमाणें पहिला मनुष्य वर पोचल्याबरोबर दुसऱ्यानें तिसऱ्याचे हात सोडून दंड धरिले, दंड सोडून मस्तक धरिलें; मस्तक सोडून कंबर धरिली व अशा प्रकारानें तोही भिंतीवर जाऊन पोंचला; व त्यानंतर त्या दोघांनीं तिसऱ्याचे पाय सोडवून त्यास वर ओढून घेतलें. जरी ते अशा कठीण प्रकारानें भिंतीवर चढले

होते, तरी त्यांनीं आपापली कांबळ्याची पट्टी बरोबर घेतली होती. तिसरा मनुष्य ज्यावेळीं दुसऱ्याच्या डोक्यावर चढला, तेव्हां त्यानें आपल्याजवळ तीं तीनही पट्टीं घेतलीं व भिंतीच्या पृष्टभागावर ठेवून दिलीं. हे तिघेजण वर आल्यावर त्यांनीं तीं कांबळ्याची पट्टीं एकमेकांस बांधून त्याचा एक दोर तयार केला व तो दोर ८ नंबरच्या वार्डांत त्यांनीं सोडला. एकजण त्या दोराचें शेवट धरून वर बसला व दोघेजण त्यास धरून आंत उतरले. नंतर वर बसलेल्या मनुष्यानें तो दोर खालीं टाकला. उतरलेल्या दोघांनीं तो गाठविलेला दोर सोडवून मोकळा केला व तीं तीनही कांबळीं एकावर एक आंथरून तीं दोघांनीं दोहींकडे दोन्हीं शेवटांस धरिलीं व भिंतीच्या बाजूस ते तीं पसरून उभे राहिले. त्याबरोबर वरच्या मनुष्यानें त्यांत अलद उडी मारली; व अशा युक्तीनें ते तिघेहीजण सात नंबरच्या वार्डांतून आठ नंबरच्या वार्डांत आले. तेथें शोध करितां त्यांना कित्येक किल्या पडलेल्या तेथें सांपडल्या, त्या घेऊन त्यांनीं ८ नंबरच्या वार्डांतील कैदी निजावयाच्या जागेचें कुलुप काढलें व आपले साथीदार कैद्यास बाहेर काढून घेऊन त्यांपैकीं एक मनुष्य पूर्वीच्या उपायानें कांबळ्याची पट्टी घेऊन भिंतीवर चढला व पूर्वीप्रमाणें त्या कांबळ्यांच्या पट्यांचा एक दोर तयार करून आंत सोडला त्या दोराच्या साह्यानें सर्व जण भिंतीवर चढून आले व त्याच युक्तीनें तुरुंगाबाहेर पडले.

एकेक मिळून सर्व लोक तुरुंगाच्या बाहेर पडल्यावर केवळ तात्या मात्र तुरुंगाच्या तटावर राहिला. सर्व लोक विशेष कष्ट न पडतां तुरुंगाच्या बाहेर गेले तरी पहारेकऱ्यांस

यासंबंधीं कांहींच वार्ता कळली नाहीं, असें समजून तात्या तेथें तटावरच उभा राहून पहारेकऱ्यांस मोठमोठ्यानें हाक मारून ह्मणालाः— " तुरुंगावरील पहारेकऱ्यांनों, पहा ! तात्या आपल्या साथीदार कैद्यांसह तुरुंगांतून पळून जात आहे. चोरून पळून जाणें बरोबर नाहीं, असें समजून मी तुह्मांस सांगतों कीं, तुह्मी लवकर जाऊन तुरुंगावरील दुसऱ्या अधिकाऱ्यांस याची वर्दी द्या; ह्मणजे ते आह्मांस पकडण्याचा यत्न करितील. " असें सांगून त्यानें तटाच्या बाहेरचे बाजूस धरलेल्या घोंगडीच्या पटयांत उडी मारिली व सर्व मिळून तेथून पळूं लागले.

हें कठीण काम त्यांनीं इतक्या थोड्या वेळांत आटोपलें कीं, आपल्या वार्डांतून बाहेर निघाल्यापासून सर्वांसमेत तुरुंगाच्या बाहेर पडण्यास त्यांस पांच मिनिटांपेक्षां जास्त वेळ लागला नाहीं !!

तटावर उभा राहिलेल्या तात्यांची गर्जना ऐकून कित्येक पहारेवाले खडबडून जागे झाले. ती गर्जना ऐकून तुरुंगावरील सर्व अधिकारी त्या ठिकाणीं जमा झाले. पहारेवाल्यांकडून त्यांनीं तो वृत्तांत ऐकिला. आठव्या नंबरच्या वार्डाचे जवळच्या तटावर जो पहारेकरी होता, त्याचा तपास करितां तो जाग्यावर नव्हता. तुरुंगाच्या बाहेरही त्यास सोधलें; पण सांपडला नाहीं. तेव्हां पळालेल्या कैद्यांच्या शोधाकरितां तुरुंगाच्या चोहोंबाजूस लोक पाठविले. पुष्कळ लोक कैद्यांच्या शोधास धांवले व जेलरसाहेब कांहीं लोक बरोबर घेऊन तुरुंगांत शोध करण्यास लागले. वार्डांचीं द्वारें रीतीप्रमाणें बंद असून पहारेकरीही आपापल्या ठिकाणीं हजर आहेत, असें

त्यांच्या दृष्टीस पडलें. पहिल्या नंबरच्या वार्डीपासून तीं प्रत्येक वार्डाचें दार उघडून ते पहात चालले. सहानंबरचे वार्डीपर्यंत त्यांना कांहींएक कमजास्त आढळलें नाहीं. अखेर ७ नंबरचा वार्ड उघडला; तेव्हां असें आढळून आलें कीं, त्या वार्डांतील कैद्यांनीं निजावयाच्या खोलींत एका भिंतीचे वरचे बाजूस भोंक पाडलें आहे. हें पाहून वार्डराच्या तोंडचें पाणी पळालें. तो थरथर कापूं लागला. जेलरसाहेबही विचारांत पडले. तदनंतर त्या वार्डांतील कैद्यांची चौकशी करितां तेथें कोणीही दिसलें नाहीं. अर्थात् ताल्या, बिजुनिया व दौलिया हे तिघेजण पळून गेलेले आढळले. ताल्या नाहीं, असें कळल्याबरोबर जेलरसाहेबांचें एकपट भय चौपट वाढलें. ते कपाळावर हात मारून घेऊन स्वस्थ उभे राहिले.

तदनंतर ८ नंबरचा वार्ड उघडला. तेथील प्रकार पाहूनही ते स्वस्थच बसले. कैद्यांच्या निजण्याच्या खोलीचें कुलूप खालीं पडलें असून दारहीं उघडें आहेसें त्यांना दिसलें. कैद्यांची मोजदाद करतां १० जण कमी भरले. हे १० कोण ह्मणून रजिस्टर आणून पहातां दहा भिल्ल कैदी त्या ठिकाणीं होते, ते सर्वहीजण पळून गेलेले आढळले; वार्डाच्या आंतील बाजूस एके ठिकाणीं एक पहारेवाला मूर्च्छित होऊन पडलेला दिसला; मात्र तो मेला नव्हता. त्यास दवाखान्यांत पोंचविलें. तेथें त्याची चिकित्सा करण्यांत आली. तुरुंगांत चाललेला हा भयंकर प्रकार पाहून त्यास चक्कर आली व तो २० फुट उंचीच्या तटावरून पडून अत्यंत घायाळ झाला होता व डोक्याची एक बाजूही अगदीं फुटून गेली होती.

हा सर्व प्रकार पाहून जेलरसाहेब अगदीं चिंताग्रस्त झाले.

त्यांनीं पुन्हां एकवार सर्व वार्ड तपासले; तेव्हां अखेर असें निश्चित ठरलें कीं, फक्त १३ कैदी पळून गेले आहेत.

त्यांच्या शोधार्थ चोहोंकडे लोक पाठविले. कांहीं पायानेंच गेले व कांहीं जलद चालणाऱ्या घोड्यांवर स्वार होऊन धांवले. आसपासच्या सर्व ठाण्यांत बातमी मिळावी म्हणून तुरुंगाचा डंका सतत ६ तासपर्यंत सारखा घणघण वाजत होता. या डंक्याचा शब्द ऐकल्याबरोबर प्रत्येक ठाण्यांतील डंके अशाच तऱ्हेनें वाजूं लागले. सारांश, अशा तऱ्हेनें आसमंतात २० कोसपर्यंत तुरुंगांतून कैदी पळून गेल्याची बातमी पसरली. परंतु, त्यापासून कांहीं फायदा झाला नाहीं. कोणासही ते सांपडले नाहींत.

सातवा परिच्छेद.

तात्याची विश्रान्ति व वेष बदलणें.

तात्यानें सांथीदारांसह तुरुंगाच्या बाहेर पडून व कांबळ्याची पट्टी तेथेंच टाकून पळण्यास आरंभ केला. यावेळीं ते कोठें चालले आहेत, हें कांहीं ठरलें नव्हतें. समोर जिकडे जातां येईल तिकडे ते वेगानें चालले होते. गांव, मैदान, जंगल, पर्वत, नदी इत्यादि कशाकडेही लक्ष्य न देतां ते एकसारखे धांवत चालले होते. त्यांची मुख्य इच्छा इतकीच कीं, शक्य तितक्या जलदीनें तुरुंगापासून जाववेल तितकें लांब जावयाचें. सारांश, अशा तऱ्हेनें पळतां पळतां त्यांस एके ठिकाणीं

उजाडलें. रात्रीं बारा वाजतां ते तुरुंगांतून बाहेर पडले. या वेळीं ६ वाजले होते. सतत ६ तासपर्यंत ते सारखे धांवत होते. वाटेंत एखाद्या ठिकाणीं ते क्षणभरही विश्रान्तीकरितां थांबले नाहींत. इतक्या वेळांत ते तुरुंगापासून ३० कोस दूर असलेल्या नेमाड जिल्ह्यांतील भंडारा शहराच्या जवळ आले होते. पळत असतां ते वारंवार मागें वळून पहात होते; पण कोणी आपणांस पकडण्यास येत आहे, असा भासही त्यांना झाला नाहीं.

या रानांत त्यांस सूर्योदय झाला. कैद्यांचा पोशाख असलेल्या साथीदारांसह पुढें गेल्यास आपणांस कोणी ओळखतील, एवढ्याकरितां तात्यानें पुढें जाण्याचा विचार तहकूब करून ते सर्वजण त्या जंगलांतच दडून राहिले. तेथें त्यांनीं आपल्या गळ्यांतील हंसळ्या, डोक्याच्या टोप्या व अंगांतील सदरे काढून टाकले; फक्त लज्जानिवारणाकरितां त्यांनीं चड्ड्या मात्र ठेविल्या. तदनंतर खाण्यायोग्य अशीं जंगलांतील फळें जमा करून त्यांनीं आपली थोडीशी क्षुधा शांत केली.

संध्याकाळ झाल्यावर ते त्या जंगलांतून बाहेर पडून पुन्हां चालूं लागले रात्रीं ९ वाजतां ते एका गांवानजिक येऊन थांबले. तेथून फक्त दौलिया एका भिल्लास बरोबर घेऊन गांवांत गेला. तेथें एक कापड विकणारा व्यापारी आहे, अशी त्यांनीं माहिती मिळविली. दौलियानें त्याचें घर आपल्या बुद्धिचातुर्यानें हुडकून काढून तो तेथें गेला व त्याची गांठ घेऊन त्यास म्हणाला—" मला तात्यानें कांहीं कापड आणण्याकरितां तुह्माकडे पाठविलें आहे व आपणास त्यानें असा निरोप सांगितला आहे कीं, जर तुह्मी आह्मांस जरूर तीं वस्त्रें द्याल, तर त्यांत

तुमचें कल्याण आहे; नाहीं तर मला स्वतःला येऊन तुमची गांठ घ्यावी लागेल. "

त्या कापडवाल्यास तात्याचें नांव ठाऊक होतें. त्याच्या कानावर तें नांव पडल्याबरोबर घाईघाईनें आपल्या स्त्रीशीं कांहीं कानगोष्ट करून तो दौलियास ह्मणाला:—" भाईसाहेब, मी एक साधारण व्यापारी आहें. तात्याचे योग्य वस्त्रें देण्याम माझ्या अंगांत शक्ति नाहीं." इतकें बोलून तो दौलियास घरांत घेऊन गेला व त्यास एक लहानशी कापडाची गांठ दाखवून ह्मणाला:—" माझ्याजवळ जें आहे तें हें आहे. यांतून तुह्माला जीं वस्त्रें पाहिजेत तीं घ्यावीं, अथवा संगळी गांठ न्यावयाची असेल तरीही माझी हरकत नाहीं. "

त्या व्यापाऱ्याचें तें भाषण ऐकून दौलियास फार संतोष झाला व त्या गाठडींतून १२ असामींस पुरतील इतकीं वस्त्रें घेऊन तो परत जाण्यास निघाला; इतक्यांत त्या व्यापाऱ्याची स्त्री पुढें येऊन त्यास ह्मणाली:— " महाराज, आपली स्थिती पाहून आपण भुकेले आणि तान्हेले आहांत असें दिसतें; जर आपण ह्मणाल तर कांहीं खाण्यास आणून देतें. "

त्या स्त्रीचें तें भाषण ऐकून दौलियास फारच आनंद झाला व तो तिला ह्मणाला:— " बाई, आपण ह्मणतां ती गोष्ट खरी आहे. पण मी एकटा नाहीं. आह्मी .१२ असामी भुकेनें व तहानेनें व्याकूळ झालेले आहोंत. जर माझे सर्व मित्र उपाशीं आहेत, तर मी एकटाच कसें खाऊं ! " हें ऐकून ती स्त्री घरांत गेली व ५।७ मनुष्यांस खाण्यास पुरेल इतकी सामग्री घेऊन बाहेर आली व ह्मणाली:— " माझ्या

घरीं यापेक्षां जास्त खाण्यापिण्याची सामग्री नाहीं. जी होती ती सर्व आणली आहे. ही आपण घेऊन जावी. " दौलिया भुकेनें अगदीं व्याप्त झाला होता, सबब ती सर्व सामग्री घेण्याच्या मोहांत तो पडला, व त्यानें बरोबर आणलेल्या साथीदाराजवळ ती सर्व सामग्री देऊन ते तात्याकडे आले. दौलियानें त्या कापडवाल्याची व त्याच्या स्त्रीची सर्व हकीकत तेथें सांगितली. ती ऐकून त्या गरीब व्यापाऱ्याच्या चांगुलपणाबद्दल तात्यास फार आनंद झाला. असो. अखेर त्या सर्वांनीं मिळन ती सामग्री समविभागें घेऊन आपली क्षुधा थोडीशी शांत केली.

आपल्यावर उपकार करणाराचें विस्मरण कधींही न होणें हा तात्याच्या अंगीं एक फार मोठा गुण होता; पण त्याप्रमाणेंच आपणास अपकार करणाऱ्या मनुष्याचा सूड घेतल्याशिवायही तो कधीं राहत नसे. वरील गोष्ट घडून आल्यावर ४ वर्षांनीं तात्या कांहीं कारणामुळें या गांवीं पुन्हां आला होता. त्यावेळीं त्यानें त्या व्यापाऱ्याची व त्याच्या स्त्रीची भेट घेतली; व त्यांनीं पूर्वी आपल्यावर केलेल्या उपकाराबद्दल त्यास स्मरण देऊन त्या उपकाराच्या बदला त्यानें त्या गरीब व्यापाऱ्यास इतकी मदत केली कीं, त्याचे पुष्कळ दिवसांचे हाल त्यामुळें नाहींसे झाले. असो.

तात्यानें साथीदारांसह क्षुधानिवृत्ति केल्यावर तीं आणलेलीं वस्त्रें त्या सर्वांस वांटून दिलीं. त्यांनीं तीं घेऊन नेसलीं, पांघरलीं व तुरुंगांतील त्या चड्या काढून फाडून नदींत फेकून दिल्या.

तदनंतर ते तेथें क्षणमात्रही न बसतां पुढील मार्गक्रम-

णास लागले. ती सर्व रात्र व दुसरा सर्व दिवसभर ते चालत होते. आपण आतां तुरुंगापासून बरेच आलों व आतां आपणास फारशी भीति राहिली नाहीं, अशी त्यांची खात्री झाल्यावर मग ते रात्रीचे जंगलांत राहीनासे झाले. ज्या ठिकाणीं रात्र होईल, तेथून आसपास असलेल्या एखाद्या गांवांत ते रात्र काढीत गांवांत पोंचल्यावर तात्या भिल्ल आपल्या साथीदारांसह आला आहे, अशी बातमी गांवांत ज्यांना ज्यांना कळे, ते त्याची भेट घेऊन त्याचा आदरसत्कार करीत व आपल्या सामर्थ्याप्रमाणें त्यास कांहीं नजर नजराणाही देत. तात्याही मोठ्या आनंदानें त्या भेटींचा स्वीकार करून त्या लोकांशीं गोड गोड भाषणें करून त्यांचें मनोरंजन करी. त्या गांवांतील कोणी भिल्ल उपाशी आहे अशी जर बातमी त्यास लागली तर तो स्वतः त्याच्या घरीं जाई व मिळालेल्या भेटींपैकीं कांहीं त्यास देऊन त्याचें दुःख निवारण करी व त्याची कांहीं योग्य व्यवस्थाही लावून देई.

तात्याच्या आंगचा हा मोठा गुण होता. तो चुकून किंवा रागाच्या आवेशांतही आपल्या जातवाल्या भिल्लावर जुलूम करीत नसे; इतकेंच नव्हे तर त्यास शक्य तितकी मदतच करीत असे. यामुळें तात्याचा सन्मान होत असे. भिल्ल लोक तर त्यास देवाप्रमाणें मानीत व दरवडेखोर असूनही ते त्यास राजाप्रमाणें मान देत.

याप्रमाणें तात्या या गांवांतून त्या गांवांत व या जंगलांतून त्या जंगलांत भटकूं लागला. मात्र ज्या ठिकाणीं तो जाई, तेथील भिल्ल लोक त्याच्यावर स्वतःच्या जीवाप्रमाणें प्रेम करीत.

तात्या पकडला जाण्यापूर्वींच त्याचें लग्न झालें होतें. य-

वेळीं त्यानें सासुरवाडीस येऊन आपल्या स्त्रीची भेट घेतली व तिच्या खाण्यापिण्याची योग्य व्यवस्था करून तो तेथून निघून गेला.

आठवा परिच्छेद.

तात्याचें मित्रदर्शन सन १८७९ इ०

इ. स. १८७९ ईसवींच्या एप्रिलच्या ६ वे तारखेस रात्रीं तात्या आपल्या कांहीं सरदारांसह व साथीदारांसह शस्त्रास्त्रें घेऊन नेमाड जिल्ह्यांतील खांडव्याच्या बाजाराकडे जाण्यास निघाला.

वायव्यप्रांत व अयोध्या एवढ्यांचीच ज्यांना माहिती आहे व जे हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही प्रांतांत गेले नाहींत, त्यांनीं असें विचारतां कामा नये कीं, वायव्य व अयोध्या प्रांतांतील सध्यांच्या दरवडेखोरांप्रमाणें सर्व देशांतील दरवडेखोर सर्व दिवस शेतकाम अथवा अन्य कांहीं व्यवसाय करून पोट भरीत असतील व फक्त रात्रीचेवेळीं मात्र ५।६ जण एकत्र होऊन व हातांत जंगी सोटे घेऊन आणि दरवडे घालून आपला उदरनिर्वाह करीत असतील. आज आह्मी ज्या प्रदेशाची हकीकत सांगत आहों, त्या मध्यप्रदेशांत वायव्यप्रांताप्रमाणें 'धारा, *बिजई, †दाराबशाह' याचप्रमाणें

* हे दोघे भाऊ ईटा जिल्ह्यांतील (वायव्यप्रांत) अलीगंज तहशिलींत होऊन गेले. सन १८९१ मध्यें सरकारानें यांस मोठ्या कष्टानें पकडून फांशीची शिक्षा दिली.

† हा दरवडेखोर आजकाल इटावा, कानपुर, फरकाबाद इत्यादि

(पुढें चालू.)

शेंकडों नव्हे तर हजारों दरवडेखोर आहेत. यांचा धंदाच दरवडे घालण्याचा. हे रात्रंदिवस ढाल तरवारी घेऊन इकडून तिकडे व तिकडून इकडे हिंडतात आणि प्रसंग पाहून दरवडा घालून आपला पराक्रम दाखविण्यास कमी करीत नाहींत. इंग्रजसरकार यांचा नायनाट करण्यास अजूनही अगदीं तत्पर आहे. त्यांस पकडण्याचे शक्य ते प्रयत्न चालूं आहेत; परंतु, अद्यापि इच्छेप्रमाणें फळ मिळत नाहीं. त्यांना चांगली शिक्षा देण्यास कोणीच समर्थ होत नाहीं.

तात्या आपल्या सांथीदारांसह ज्या मार्गावरून खांडव्याकडे जात आहे तो मातीचा तयार केलेला एक सुंदर मार्ग आहे; मात्र सामान्यत: या सडकेच्या दोन्ही बाजूंस दाट जंगल आहे. ही सडक वाटेंतील कित्येक गांवांच्या अगदीं मधून गेली आहे. या सडकेनें जाणारीं फारशीं माणसें दिसत नाहींत. केव्हां केव्हां कित्येक प्रवासी उंटावर अथवा घोडयावर बसून या गांवाहून त्या गांवीं जातात.

तात्यानें चालतां चालतां दुरून एक गाडी येतांना पाहिली. त्या गाडींत बारदी गांवांतील सरदार व रामजी नांवाचा एक मनुष्य असे दोघे बसलेले होते. ते कांहीं कामाकरितां खांडव्यास गेले होते व आज काम आटोपून ते परत आपल्या गांवीं चालले होते. त्यांनीं लांबून शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेले कांहीं लोक आपणाकडे येत आहेत असें पाहून ते दरवडेखोर

शहरांभोंवतालच्या खेडेगांवांत हिंडून दरवडे घालीत आहे. यांस धरणारांस १००० रुपयांचें बक्षिस सरकारानें लावलें आहे. आम्हाला एका ठिकाणाहून अशी बातमी लागली आहे कीं, यांचे साथीदार शीघ्रगामी अश्वांवर बसून व वेष पालटून इकडे तिकडे हिंडत असतात.

असावेत असें जाणिलें व अगदीं भयभीत होऊन स्वप्राण संरक्षणार्थ गाडी व सामान यांची आशा सोडून ते पळत सुटले. गाडीवानाशिवाय गाडी मात्र चालली होती. ती हळूं हळूं तात्याच्या टोळीपाशीं येऊन पोंचली. तात्यानें त्या गाडीची अशी अवस्था पाहून त्यांतील सर्व सामान घेऊन आपल्या साथीदारास वाटून दिलें.

ती टोळी तें सर्व सामान घेऊन खांडव्याच्या बाजारांत येऊन पोंचली. त्या दिवशीं तेथेंच मुक्काम करून दुसरे दिवशीं त्यांनीं तेथून कुच केलें. तात्या यावेळीं जो हा बाहेर फिरत चालला होता, तो दरवडे घालण्याच्या उद्देशानें नसून 'तात्या पकडला जाऊन तुरुंगांत पडला आहे हें ऐकून त्यांच्या मित्र मंडळास जें दुःख झालें, तें दूर करून आपण मोकळे झालों आहों, हें त्यास कळविण्याकरितां व त्यांस भेटण्याकरितांच' तो यावेळीं या गांवाहून त्या गावीं व या ठिकाणाहून त्या ठिकाणीं भटकत होता.

तात्या अनेक ठिकाणीं जाऊन पुनरपि खांडव्याच्या बाजारांत येऊन पोंचला; मात्र या खेपेस त्यानें त्या ठिकाणीं मुक्काम न करितां आपल्या ठिकाणीं लवकर जाऊन पोंचण्याच्या इच्छेनें तो लागलींच पुढें चालता झाला.

ता. १६ जून रोजीं खांडव्याचा बाजार सोडून तो आपल्या साथीदारांसमेत तो बराच दूर येऊन पोंचला. कित्येक दिवसाच्या एकसारख्या चालीनें अगदीं थकून गेला. त्यांलां अत्यंत भूक लागली होती; पण रहण्यास चांगली जागा न आढळल्यामुळें त्यास मुक्काम करितां येईना. भोजनादि सामग्री मिळविण्याचा प्रयत्न करण्यास अथवा आसपास एखाद्या

गांवाचा पत्ता लागण्यास त्यास वाटेंत कोणी मनुष्यही भेटला नाहीं; या मुळें तर त्याचा निरुपाय झाला.

अशा प्रकारें विचार करीत व एखादा गांव शोधीत शोधीत ते जात असतां एकाएकीं त्यांना आपल्या पुढें बऱ्याच अंतरावर एक गाडी जात असतांना दिसली. ती गाडी पाहून ते जलदीनें चालूं लागले व कांहीं वेळानें त्या गाडीच्या सन्निध जाऊन पोंचले. तींत दोन मनुष्यें असलेलीं त्यांना दिसलीं. आरुद गांवांतील कोणी नाना व भगवान् नांवाचे दोन गृहस्थ हे असून कांहीं कामास खांडव्यास गेले होते, ते आपलें काम आटोपून या वेळीं परत आपल्या गांवीं चालले होते.

त्यांच्या साथीदारांपैकीं एकजण त्या गाडीपाशीं जाऊन त्यांपैकीं एकीस विचारूं लागला कीं, " आमच्या खाण्यापिण्याची कांहीं सोय लागेल असा एखादा गांव याच्या आसपास आहे काय ? " हें ऐकून त्या गाडींतील एकजण रागाचा आवेश आणून ह्मणाला—" तुमच्या खाण्यापिण्याची सोय कोठें लागेल, हें आह्मांस काय ठाऊक ? तुह्मांला पाहिजे असेल तर तुह्मी जाऊन कां शोध करीत नाहीं ? " यावर तो साथीदार ह्मणाला, "मला ठाऊक असतें तर तुह्मांस विचारण्याचें काय कारण होतें ? तुह्माला ठाऊक आहे कीं नाहीं, एवढें सांगा. जास्त बोलण्याचें कारण काय ? "

" जास्त बोलण्याचें कारण काय ह्मणजे ? तुमच्या खाण्यापिण्याची तजवीज पहात बसण्याला मी तुमचा नोकर नाहीं. "

" तूं नोकर नाहींस, हें मला ठाऊक आहे ! ! परंतु,

यावेळीं तूं नोकरापेक्षांही बिकृष्ट आहेस, हें लक्ष्यांत ठेव. मी कोणाचा नोकर आहें, हें तुला ठाऊक आहे काय ? तात्याचें नांव तूं कधीं ऐकिलें आहेस काय ? "

" हो, हो, तुझा तात्या मला ठाऊक आहे ! मी असे किती एक तात्या पाहिले आहेत !! "

तात्याही त्या ठिकाणीं यावेळीं होताच ! तें भाषण ऐकून तात्या अत्यंत रागावला; इतका कीं, त्याचा राग कोणत्याही उपायानें शमन होईना ! आधीच तो शूर पुरुष, दुसरे, वीरप्रद रक्तानें शरीर भरलेलें, शिवाय, शस्त्रास्त्रांसहित व आपल्या साथीदारांसहित असलेला; मग त्याचा त्या अपमानित वाक्यानें प्रदीप्त झालेला राग शांत कसा होणार ? त्यानें त्याच वेळीं त्यास योग्य तें शासन देण्याचा हुकुम सोडला. हुकुम ऐकतांक्षणीं त्याच्या साथीदारांनीं त्याचें सर्व सामान तिथल्या तेथें लुटलें; मात्र कोणाच्या जीवास धक्का लागला नाहीं.

भगवान् निर्बल मनुष्य नव्हता. तोही दरवडेखोर ह्मणूनच देशांत प्रसिद्ध होता. त्याला पुष्कळ लोक भीत असत. तो लाठी फिरविण्यांत अगदीं निपुण असे, हेंही पुष्कळांना ठाऊक होतें. भगवानानें आपलें सामान सहज जाऊं दिलें नाहीं. गाडींतून उतरून व हातांत लाठी घेऊन तो आपल्या सामानापाशीं उभा राहिला; व लाठी फिरवूं लागला. पण त्याच्या त्या लाठीचे एका भिल्लाच्या तीक्ष्ण तलवारीनें तुकडे तुकडे करून टाकले. तेव्हां तो हतवीर्य होऊन व आपलें सामान तेथेंच टाकून पळून गेला. मात्र त्यानें प्रथमंच त्या दरवडेखोरांपैकीं एकास लाठीचा असा तडाका मारला होता कीं, त्याची ती खूण बरेच दिवस बुजली नाहीं.

या दरवडयाचा तपास करण्यांत पोलिसांनीं अतिशय मेहेनत घेतली व लाठीच्या तडाक्याच्या खुणेवर ६ मनुष्य पकडले; पण यांपैकीं खरा दोषी कोण व निर्दोषी कोण याचा कांहींच उमज पडला नाहीं. कारण, पुरावा न झाल्या-मुळें माजिस्ट्रेट साहेबांनीं सर्वांसच दोषमुक्त ठरवून सोडून दिलें.

याच सुमारास एके दिवशीं रात्रीं पोखरगांवांत एकाएकीं फार मोठी आग लागली. शिवा पाटील, सरदार पाटील व रजपूत इत्यादि सर्वांचीं घरें जळून फडशा पडलीं; फक्त एक घर मात्र त्या गावांतील वांचलें; मग परमेश्वरानें स्वतः येऊन त्याचें संरक्षण केलें कीं काय हरी जाणें ?!

वरील गोष्ट घडल्यानंतर कांहीं दिवसांनीं तात्या आपल्या टोळीसह एका गांवांत गेला. त्या गांवीं एक मोठा प्रतिष्ठित मनुष्य राहत असे. तात्या त्याजकडे जाऊन ह्मणाला कीं, मी सरकारी शिपाई आहें. कांहीं विशेष कामाकरितां मुंबई प्रांतीं जात आहें; पण मजजवळ खाण्यापिण्याची सामग्री नाहीं, एवढ्याकरितां आपणाकडून कांहीं तजवीज होईल ह्मणून आलों आहे. तात्याच्या ह्या भाषणावर त्या गृहस्थाचा पूर्ण विश्वास बसून त्यानें त्याच्या खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था करून दिली. तात्याच्या बरोबर त्या गृहस्थाचें हें भाषण चाललें असतां भिनपान गांवचा हिम्मत पाटील तेथें हजर होता. तात्यास त्यानें ओळखलें; पण त्यासंबंधीं कोणाजवळ कांहीं एक न बोलतां भयानें तो तेथून चालता झाला. तात्याही त्याची ही झालेली अवस्था पाहून मनांतल्या मनांत हंसला; पण त्याचा परिस्फोट न करितां तोही आपल्या टोळीसह तेथून निघून गेला.

नववा परिच्छेद.

तात्यानें घेतलेला सूड.

वरील गोष्ट घडून आल्यावर थोडेच दिवसांनीं मध्यरात्रीचे सुमारास तात्या आपल्या लोकांसमवेत भिनपान गांवीं जाऊन पोंचला. हिम्मत पाटील त्या गांवचा एक मुख्य जमीदार होता. मनुष्यबल व द्रव्यबल याची त्यास मुळींच कमतरता नव्हती. शिवाय तेथील पोलिसलोकही त्याच्यावर अगदीं दिलखुष असत. तात्याच्या विरुद्ध त्यानें साक्ष दिली असल्या कारणांनें त्याच्यावर एखादें संकट आल्यास त्या समयीं त्यास साह्य करण्यास पोलिसांनीं तत्पर राहणें साहजिकच आहे.

या रात्रीं हिम्मत पाटलाच्या घरांत भयंकर प्रकार चालूं झाला. त्याच्या घराचें प्रत्येक दार फोडून शेंकडों मनुष्यें आंत घुसूं लागलीं. त्याच्या घरांत भयंकर आरडाओरड सुरू झाली. ती ओरडाओरड ऐकून गांवांतील सर्व लोकांत हाहाकार माजला. कांहीं तर भीतिनें गांवही सोडून गेले; व कांहीं हिम्मत-पाटलास साह्य करण्याकरितां जमलेल्या मंडळींत जाऊन मिळाले; परंतु, त्यांना भिल्लांच्या वीरत्वसूचक भयंकर हल्ल्यामुळें विन्मुख होऊन आपले प्राण संरक्षण करण्याकरितां पळून जाणें भाग पडलें. भिल्लांनीं हिम्मत पाटलांच्या घरांत घुसून त्याचें सर्वस्व लुटण्यास आरंभ केला.

त्यावेळीं तात्यानें आपल्या साथीदारांस सांगितलें कीं, "माझ्या वीर मित्रांनो, हिम्मत पाटलानें माझा फार मोठा अपराध केला असल्यामुळें त्यांस शिक्षा करण्यास मी आज येथें

आलों आहें; तथापि त्याच्या आयकोनें अथवा मुलांनीं माझा कांहीं एक गुन्हा केला नाहीं, तरी त्यांना त्रास न होईल अशी सक्त तजवीज ठेवा; मात्र त्याचें घर इतकें धुऊन काढा कीं, त्याच्या घरांत एकमूठभरही धान्य ठेऊं नका. उद्यांच त्याच्या परिवारास भिक्षा मागावी लागली पाहिजे. हिम्मत पाटलानें मला फार छळलें आहे, सबब, त्याला मात्र पकडून माझ्यासमोर आणा. मी त्या दुष्टास योग्य ती शिक्षा देईन."

तात्याचे हे शब्द ऐकून "ठीक आहे" असें ह्मणत सहा सातजण हिम्मताच्या घराकडे धावले. हिम्मत ज्या घरांत निजत असे, त्या घराचे दारावर दरवडे खोरांच्या पायांचे दणादण आवाज होऊं लागले; तें दार जुनें अथवा मोडकळीस आलेलें नव्हतें, तथापि दरवडेखोरांच्या जंगी पदाघातांचा जोर त्यास सहन न होऊन तें मोडलें.

ते लोक भराभर आंत शिरले. हिम्मताच्या बिछान्याकडे जाऊन पहातात, तों बिछाना मोकळा असून हिम्मत कोठें नाहीं. त्या अंधाऱ्या घरांत दिव्याच्या सांह्यानें त्यांनीं पुष्कळ शोध केला, पण हिम्मत सांपडेना! अखेर शोध करतां करतां एका ठेंगण्या बाजेच्या खालीं हिम्मत दडून बसलेला दिसला. हिम्मत आपल्या बायकोसह तेथें घोंगडी पांघरून लपून बसला होता. भयानें तो बेशुद्धच झाला होता ह्मणण्यास हरकत नाहीं; व त्याच्या बायकोच्या जवळ एक मुल झोंप येऊन घोरत पडलेलें होतें.

दरवडेखोरांनीं तें पाहून हिम्मत पाटलाच्या बायकोचा हात धरून तीस तेथून जोरानें बाहेर ओढली! स्त्री जात मूळचीच आधीं भित्री; त्यांत अशा प्रसंगीं तिला दरवडेखो-

रांनीं ओढली; मग काय विचारता, ती ओक्सा बोक्शीं रडूं लागली. जवळचें मूलही रडूं लागलें; तेव्हां दरवडेखोरांच्या ती स्त्री आहे, हें लक्ष्यांत आलें; व त्यांनीं तात्याच्या आईचें स्मरण ठेऊन तीस लागलींच सोडून दिलें; तेव्हां ती जमी-नीवर पडून रडत असलेलें आपलें मूल कडेवर घेऊन अर्ध्या फाटक्या वस्त्रानिशींच ती तेथेंच एका कोपऱ्यांत जाऊन उभी राहिली. नंतर दरवडेखोरांनीं हिम्मत पाटलास ओढून बाहेर काढलें. हिम्मतानें माझें सर्व घरदार लुटा, पण मला सोडा, अशी कितीकदां दरवडेखोरांची विनवणी केली; पण त्या विनवणीकडे लक्ष्य न देतां त्यास बांधून त्यांनीं तात्याकडे नेलें व तेथें त्यास उभें केलें.

हिम्मत पाटलास पाहिल्याबरोबर तात्याचा राग दुणावला; त्याच्या डोळ्यांतून सुडाच्या जणूं ठिणग्या पडूं लागल्या. तो हिम्मत पाटलास ह्मणालाः—हिम्मत, तूं मला ओळखलेंस काय ? खोटी साक्ष देऊन ज्यास तूं तुरुंगांत पाठविलेंस, तो मी तात्या आहें. तात्या आतां तुरुंगांतून कसचा सुटतो, असा विचार तुझ्या मनांत आला होता, पण तोच तात्या मी आहें. ज्या तात्याकरितां तूं खोटें बोलून इहपरलोकची पर्वा केली नाहींस, तोच तात्या मी आहें. यावेळीं तूं डोळे उघडून त्या दरवड्याच्या खटल्यांतील आरोपी तात्या यास नीट पाहून घे. खोटें बोलण्याचा परिणाम काय होतो, व तात्याच्या विरुद्ध साक्ष दिल्याची बक्षिशी कशी मिळते, याचा तूं विचार कर. तूं इतका लोभी व अधम आहेस कीं, साधारण लोभाकरितां पोलिसच्या मोहिनी मायेंत पडून तूं माझ्याविरुद्ध उभा राहि-लास ! मी सूचना दिली असतांही माझ्यासमोर उभा राहून

माझ्या सर्व नाशाची तूं इच्छा केलीस! तात्या रागावल्यास आपण वांचणार नाहीं, हें त्यावेळीं तुला ठाऊक नव्हतें काय? जेव्हां न्यायाधीशासमोर मी तुला खरें बोलण्याबद्दल सांगितलें, त्यावेळीं जर तूं माझी गोष्ट ऐकतास, तर आज या विपत्तींत तुला पडावें लागतेंना! असो. यावेळीं तुझ्याशीं जास्त बोलण्यांत अर्थ नाहीं. या माझ्या हातांतून सोडवून नेणारे जर तुझे कोणी साह्यकारी असतील तर त्यास तूं आतां हाक मार! ह्मणजे या माझ्या भुकेल्या तळवारीची लालसा मी त्यांच्या रक्तानें तृप्त करीन! ज्या अधम पोलिस कामगा-रांना तूं प्रिय मानून माझा तिरस्कार केलास त्यांचेंही एकवार तूं स्मरण कर! ज्यांच्या उपदेशानें तुझी बुद्धि भ्रष्ट झाली असेल, त्यांचेंही तूं यावेळीं स्मरण कर; व मनांतल्या मनांत त्यांच्या सदोदित वियोगाची परवानगी घे." इतकें सांगून तात्यानें आपला मुख्य सरदार जो बिजनिया त्यांजकडे दृष्टि फिरविली. बिजनिया हातांत बंदुक घेऊन तात्याच्या बाजूस उभा होताच. तात्याची परवानगी होतांच त्यानें आपल्या कामागिरीची बरोबर तालीम बजाविली!

पहातां पहातां हिम्मताचीं या जगांतील सर्व दुःखें दूर झालीं. स्त्री, व कुटुंब यासंबंधीं अंतःकरणांतील माया नाहींशी झाली, धनदौलतीची इच्छा संपली, दासदासी, जमीदारी इत्यादींचीं आशा सुटली व पोलिसच्या गोड गोड भाषणांच्या चक्रव्यूहांत सांपडून त्यांची त्यानें जी सहायता केली, त्याचें फळ त्यास मिळालें! हिम्मत पाटील तेथल्यातेथेंच अनंत शय्येवर पडून अपार निद्रासुखाचा अनुभव घेऊं लागला.

तात्यानें आपल्या शत्रूचा सूड उगवून व त्याची सर्व

धनदौलत लुटून त्याच्या कुटुंबास भिकेस लाविलें; आणि जयजयकारानें गांवचे गांव प्रतिध्वनित करून तो तेथून दुसरीकडे निघून गेला.

दहावा परिच्छेद.

पुनरपि सूड.

तात्या आपल्या टोळीसह भिनपान गांवच्या बाहेर पडल्यावर थोडयाच वेळानें ही बातमी पोलीसठाण्यास पोंचली. आपला बंधु हिम्मत पाटील यास मारल्याचें वर्तमान कळतांच सर्व पोलिस थरारून गेले. लहानांपासून थोरांपर्यंत सर्व पोलिस अधिकारी या खुनी मुकद्दम्याच्या तपासास नेमिले गेले. त्यांनीं आपल्या मनाशीं असा विचार केला कीं, शक्य तो प्रयत्न करून या दरवडयाचा पत्ता लागला पाहिजे व तात्यास पकडून त्यास शिक्षाही झाली पाहिजे. जर या दरवडयाचा तपास लागला नाहीं व दरवडेखोरास शिक्षा झाली नाहीं, तर पोलिसचौकशीचें काम थकून जाईल. कारण, पोलिसास साह्य करण्याचें जर हें फल मिळालें, तात्याच्या विरुद्ध साक्ष दिल्यान जर हा परिणाम होतो, तर मग पोलिसास साह्य कोण देईल ! ! तात्याच्या विरुद्ध साक्ष देण्यास कोण मनुष्य तयार होईल ? हा विचार करून पोलिसकामदारांनीं आपल्या शक्यनुसार सर्व चौकशी तर केली; परंतु, ज्याच्यामुळें हा ऐवढा उत्पात झाला तो तात्या सांपडला नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याच्या टोळीपैकींही कोणी सांपडलें नाहीं.

यावेळेपासून तात्याला पकडण्याकरितां पोलिसखात्याकडून नानाप्रकारचे यत्न होऊं लागले. अनेक ठिकाणचे कार्यदक्ष, साहसी, उद्योगी, व बुद्धिमान् पोलिसकामदार एकत्र करण्यांत येऊन त्यांची या कार्याकडे योजना करण्यांत आली; इतकेंच नव्हे तर तात्याला पकडण्याकरितां एक स्वतंत्र पोलिस नेमलें जाऊन त्यास "तात्यापोलिस" हें नांव मिळालें.

या प्रदेशांतील कित्येक ठिकाणीं सरकारचाच अधिकार आहे. प्रजेकडून सारा वगैरे वसूल करण्याचें काम सरकारच करितें. हा वसूल करण्याकरितां प्रत्येक ठिकाणीं एकेक अधिकारी नेमला असून त्यास मालगुजार ह्मणतात.

एके दिवशीं रात्रीं १२ वाजतां एका मालगुजारास तात्याचा कांहीं पत्ता लागला. एक तर तो सरकारी कामदार व दुसरें तात्या पकडला गेल्यास आपणास काहीं बक्षिस मिळेल या आशेनें तो "तात्यापोलिस" च्या एका मुख्य कामदाराकडे धांवत धांवत जाऊन सांगूं लागला कीं, "महाराज, मला तात्याचा कांहीं सुगावा लागला आहे. तो १३।१४ सांथीदारांसह एका जंगलांत धुंद अवस्थेंत पडला आहे. मला वाटतें, कांहीं मादक द्रव्यांच्या सेवनानें त्याची तशी अवस्था झाली असावी." मालगुजाराच्या तोंडची ही बातमी ऐकून तो पोलिस अधिकारी १०० पेक्षां ज्यास्त पोलिस लोक आपणाबरोबर घेऊन त्या मालगुजारासह त्या जंगलांत हळूं हळूं जाऊन पोंचले. ते सर्वजण तिथें घोरत पडलेले पाहून पोलिसांनीं एकंदम त्यांस कैद केलें व त्यांच्या मुसक्या आवळून त्यांच्याजवळचीं हत्यारें त्यांनीं काढून घेतलीं. बंदीवान् झाल्यावर

त्यास आपण पकडलें गेल्याचें समजलें व त्यांतल्या त्यांतही प्रत्येकानें पळून जाण्याची खटपट केली; परंतु, त्यापासून कांहीं विशेष फायदा झाला नाहीं. त्यांपैकीं ज्यास तात्या ह्मणून पकडलें होतें, त्याची शक्ति व पराक्रम पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. जेव्हां त्यास बांधून तेथून नेऊं लागले तेव्हा फक्त दोन शिपायांनीं त्यास धरलें होतें. त्यानें त्या दोघां शिपायांस आपल्या खांद्यानें असा धक्का दिला कीं, ते दहा हात दूर जाऊन पडले. हें पाहून आणखी चार शिपाई त्यांच्या मदतीस आले; पण त्यांची त्यानें तीच अवस्था केली. अखेर अनेकांनीं मिळून त्यास धरिला. असो. तात्या आपल्या १३ सांथीदारांसह पकडल्याबद्दल " तात्यापोलिस " आनंदांत निमग्न झाले. प्रत्येकजण आपल्या बहादुरीची चर्चा आपल्या मित्रांत करूं लागले. कोणी ह्मणूं लागले:—" मी नसतों तर तात्या कधींही पकडला गेला नसता " दुसरा ह्मणतो:—मीं त्याच्याबरोबर जसें युद्ध केलें तसें आजपर्यंत कोणीही पाहिलें नसेल. जे १० हात लांब जाऊन पडले होते, त्यांपैकींही कोणी फुशारकी मारूं लागले:— " बोका ज्याप्रमाणें उंदरास धरितो, त्याप्रमाणें मीं तात्याचें मानगुटें धरिलें होतें. " येणेंप्रमाणें सर्व जण आपापली खरी खोटी बहादुरी वर्णन करण्यांत चूर झाले होते. तात्या पकडला गेल्याची बातमी हां हां ह्मणतां चोहोंकडे पसरली. ज्या ज्या सरकारी कामदारांस ही बातमी समजली त्यांना फार आनंद झाला.

तात्या व त्याचे दोन मुख्य सांथीदार यांस, ज्या पोलिस अधिकाऱ्यानें प्रथमतः माजिस्ट्रेट कोर्टांत उभें केलें, तो यावेळीं तेथें हजर नव्हता कांहीं कामाकरितां दुसरीकडे गेला

होता. तेथें त्यास तात्या पकडला गेल्याची बातमी समजतांच तो तात्याला पहाण्यास आला. त्याला पहातांक्षणीं तो कोण हें त्यानें ओळखलें. तो त्या ठिकाणीं यासंबंधीं कांहीं बोलला नाहीं; परंतु, त्यास पकडणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याकडे जाऊन तो ह्मणाला:— " आपण तात्या ह्मणून ज्यास पकडलें, तो तात्या नव्हे. मी तात्यास चांगला ओळखतों. तुह्मी धरलेला मनुष्य दौलिया असून तो तात्याचा मुख्य साथीदार आहे इतकेंच ! ! "

त्या कामदारानें ही गोष्ट ऐकल्याबरोबर तो अगदीं गप्प बसला; त्यास या ह्मणण्याचा संशय येऊन त्यानें जास्त तपास करण्यास सुरवात केली. पण अखेरपर्यंत तो तात्या न ठरतां दौलियाच ठरला. तेव्हां तात्या धरला गेला नसून दौलिया धरला गेला, हीही बातमी चोहोंकडे पसरली.

दौलियास पुन्हां माजिस्ट्रेटपुढें चौकशीस उभें करण्यांत आलें व त्याच्यावरील आरोपाची चौकशी होण्यास आरंभ झाला.

तात्याला कळलें कीं, आपला एक सरदार १२ असामींसह पकडला गेला आहे; व मालगुजारानें त्यांस पकडून दिलें आहे, हेंही त्यास समजलें. त्यानंतर त्यानें आपले दुसरे सरदार व साथीदार यांस बोलावणें पाठवून त्यास दौलिया व मालगुजार यासंबंधीं सर्व वर्तमान कळविलें व तो त्यांस ह्मणाला:— " दौलियास पकडून देणारा हा मालगुजार जर आज माझ्या हातून शिक्षा केल्यावांचून राहिला जाईल; तर उद्यां हळूं हळूं पुष्कळ लोक आपल्या विरुद्ध होतील व आपण सर्वजण एकेक पकडले जाऊन शिक्षेंत जाऊं. त्यामुळें

आपलें स्वातंत्र्य नाहींसें होईल; सध्या आपण जें स्वातंत्र्यसुख अनुभवीत आहों, त्यास आपण मग कायमचे आंचवूं ! दौलिया साधारण मनुष्य नाहीं. तो माझा डावा हात आहे. तुम्हां सर्वांवरही त्याचें प्राणापेक्षां जास्त प्रेम आहे. ज्या मनुष्यानें दौलियास अशा तऱ्हेनें पकडून दिलें आहे; त्या मालगुजाराचा सत्यनाश करणें आपलें मुख्य कर्तव्य आहे. चला, त्या मालगुजारास आपण शिक्षा देऊन येऊं !! " तात्याची ही गोष्ट सर्वांस मान्य झाली; व त्याच दिवशीं ते मालगुजाराच्या घराकडे जाण्यास निघाले.

दौलियाची चौकशी पुरी झाली. हिम्मत पाटलाचा खून व दरवडा यांत साह्य केल्याचा आरोप त्याजवर शाबीत होऊन न्यायाधीशानें दौलियास जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा दिली व इतरांसही लहानमोठ्या शिक्षा देऊन तुरुंगांत पाठविलें. दौलिया आजन्मपर्यंत आपणास भेटणार नाहीं, ह्मणून सर्वांस फार दुःख झालें. दौलियास जबलपुरच्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें.

ज्या दिवशीं दौलियास जन्मठेपेची शिक्षा झाली, त्याच दिवशीं रात्रीं त्या अभागी मालगुजाराच्या घरावर भयंकर दरवडा पडला; त्याची सर्व चीजवस्त लुटली गेली व त्याबरोबरच तात्याचे रागाचे असे भयंकर शब्द त्याच्या कानावर पडलें कीं, " दुष्टा, तूं कोणाच्या सरदारास पकडून दिलेंस, हें तुला कळलें नाहीं काय ? दौलियाला धरून देऊन तूं कोणाच्या हृदयावर आघात केलास ? हिम्मत पाटलाची झालेली दशा तुला ठाऊक असूनही तूं तात्याच्या वाटेस गेला आहेस. तर भोग आतां त्याची फळें !! " यानंतर जो प्रकार झाला,

तो वर्णन करतांना हृदय विदीर्ण होऊन जातें; लेखणी अड-खळते; सबब एवढेंच सांगतों कीं, या दरवडयानंतर तो मालगुजार पुन्हां कोणाच्याही दृष्टीं पडला नाहीं.

दौलियास जरी जन्मठेपेची शिक्षा झाली होती तरी त्यास कांहीं दिवसपर्यंत जबलपूरच्याच तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. ज्यांना जन्मकैदेची शिक्षा होते, त्यांना त्याच वेळीं अंदमान बेटांत पाठवितात, असें नाहीं. सर्व हिंदुस्थानांतील जन्मठेपेचे कैदी एकत्र करून वर्षातून एकवेळ त्यांस तिकडे पाठवावयाचें असा परिपाठ आहे; व यामुळेंच दौलियाला जबलपूरच्या तुरुंगांत ठेविला होता. हिऱ्यानांवाचा तात्याचा दुसरा एक सरदार पूर्वीच जबलपूरच्या तुरुंगांत होता, त्याची व दौलियाची या समयीं तेथें गांठ पडली; तेव्हां ते दोघेही पहारेवाल्यांचा डोळा चुकवून तुरुंगांतून पळून जाण्याची संधि शोधूं लागले.

मालगुजाराच्या घरच्या दरवड्याची बातमी "तात्यापोलिसास" कळली. ते तात्याला पकडण्याचा पुनरपि उद्योग करूं लागले; खाण्यापिण्याची व झोपेची पर्वा न करितां ते आपल्या कामांत गढून गेले होते; परंतु, तात्याच्या कुशलतेपुढें त्यांची मात्रा चालली नाहीं. त्यांना बाहेर तोंड काढण्यास लाज वाटूं लागली. सर्व लोक पोलिसचा तिरस्कार करूं लागले. यावेळीं तर तात्याला पकडण्याकरितां एका जंगी बाक्षिसाची लालूचही दाखविण्यांत आली, पण व्यर्थ !!

अकरावा परिच्छेद.

दौलियाचें फिरून पळून आणें. सन १८८०.

मालगुजाराच्या घरावरील दरोड्याचें काम संपल्यावर दौलियाच्या दुःखामुळें कांहीं दिवसपर्यंत तात्या स्वस्थ बसला. जो दौलिया तात्याच्या डाव्या हाताप्रमाणें होता, ज्यानें आजपर्यंत दौलियाच्या विचाराशिवाय एकही काम पुरें केलें नाहीं, त्या दौलियास शिक्षा झाल्याचें पाहून तात्याचें चित्त अस्वस्थ झालें; प्राण व्याकुळ झाला व त्याच्या नेत्रांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. तो एकांतांत बसून दौलिया-करितां कित्येक दिवस रडत राहिला. दौलिया जरी तात्या-प्रमाणें पराक्रमी नव्हता व बिजनियाप्रमाणें शस्त्रें चालविण्यांत पटाईत नव्हता; तथापि तो कमी कार्यकुशल होता असें नाहीं. तात्याची सरदारी चालविण्यास तो योग्यच होता. त्याचे सांथीदारमंडळ त्याच्या शूरत्वाची नेहमीं प्रशंसा करीत असत.

दौलिया पुनरपि आपल्या हातीं लागणें अशक्य आहे असें पाहून तात्यानें आपल्या टोळींतील परीक्षा करून मेदिया नांवाच्या एका भिल्लास दौलियाच्या जागेवर नेमिलें. दौलिया-प्रमाणें मेदियाचे अंगीं जरी शूरत्व नव्हतें, तरी तो साधारण मनुष्य होता असें नाहीं. तोही शक्तिमान् व पराक्रमी होता.

याच सुमारास एके दिवशीं प्रातःकाळीं जबलपूरच्या तुरुं-गांतील कांहीं पहारेकरी अत्यंत भयभीत होऊन कांपत कांपत जेलरसाहेबांकडे जाऊन सांगूं लागले कीं, रात्रीं तुरुंगांतील कांहीं कैदी तुरुंगाचा जंगी तट फोडून पळून गेले. ही

बातमी कळतांच जेलरसाहेब जलदीनें तुरुंगांत जाऊन कैदी कसे पळाले हें पाहूं लागले. जे कैदी पळून जाण्याची त्यांस भीति होती, तेच तात्याच्या टोळींतील दौलिया व हिऱ्या नाहींत असें पाहून जेलरसाहेब अगदीं भिऊन गेले; व त्यांच्याबरोबर आणखीही कित्येक भिल्ल कैदी पळून गेल्याचें पाहून तर ते अगदीं गर्भगळीत झाले. गालावर हात टेकून ते तेथेंच बसले. वरिष्ठ अधिकाऱ्यापुढें काय जबाब द्यावा याचा विचार करितां करितां त्यांचा चेहरा अगदीं सुकून गेला; तथापि दौलियाच्या कुशलतेची त्यांनीं मनांतल्या मनांत प्रशंसा केली; व त्याचें साहस आणि यत्न पाहून ते विस्मित झाले. त्यांच्या मनांत असें आलें कीं, अशा प्रकारें जो तुरुंगांतून दोन वेळ पळून गेला. त्यास निर्बली ह्मणतां यावयाचें नाहीं. या जगांत त्यास कोणतेंही काम असाध्य असेल असें वाटत नाहीं.

तुरुंगांतून कैदी पळून गेल्याचें वर्तमान पसरतांच तुरुंगांत जिकडे तिकडे खूपच चळवळ उडून गेली; व जेलरसाहेबांसहीं त्यासंबंधानें जाब द्यावा लागला.

इकडे दौलिया व हिऱ्या तुरुंगाच्या बाहेर पडून आपल्या साथीदारांसह पूर्वीं निश्चय केल्याप्रमाणें तात्यास जाऊन भेटला. दौलियास पाहून तात्यास परमानंद झाला; व त्याच्या कुशलतेचें आणि साहसाचें वर्णन करून तो त्यास कडकडून भेटला. तदनंतर दौलियास उजव्या हातास व हिऱ्यास डाव्या हातास बसवून तात्यानें त्यांच्या तोंडून सर्व हकीकत ऐकिली. ती सर्व हकीकत ऐकून तात्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले.

यानंतर तात्यानें आपलें भयंकर स्वरूप पुनरपि धारण केलें. आपल्या मुख्य मुख्य सरदारांच्या साह्यानें इंग्रजी राज्यांत भयंकर रीतीनें दरवडे घालण्यांचें काम त्यानें सुरू केलें. इंग्रजी कामदार आपणांस पकडण्याकरितां विशेष दक्षतेनें वागत आहेत, हें पाहून त्याचा राग द्विगुणित झाला व त्या रागाचें शांतवन करण्यास्तवच त्यानें सरकारचे राज्यांत दरवडे घालण्यास सुरुवात केली. त्यांत एका वर्षाचे अवधींत एकेक मिळून २४ दरवडे घातले; व हळूं हळूं २४ गांव लुटले. निरनिराळ्या २४ ठिकाणच्या लोकांचे अंतःकरणावर तात्याचें नांव खोदलें गेलें व रात्रंदिवस तात्याचेंच नांव त्यांच्या कानांत गुणगुणूं लागलें.

तात्यानें एका वर्षांत इतके डोके घातले; पण त्यानें त्यांत एकाही भिल्लास दुखविलें नाहीं किंवा कोणत्याही दरिद्री मनुष्यास त्रास दिला नाहीं. तात्या दरवडेखोर होता; पण अधम नव्हता. तात्या चोर होता; परंतु, गरिबांचा काळ नव्हता. तात्या खुनी होता; पण निर्दय नव्हता. तात्या सर्व दोषांची खाण होता; परंतु, गरिबांचा मायबाप, दरिद्र्यांचा आश्रय, रोग्यांचा चिकित्सक व आपल्या भक्तांचा दास होता. तात्या, बालकांचा सहायक, स्त्रियांचा आश्रय व म्हाताऱ्यांची काठी होता. तात्याच्या अंगीं जे गुण होते, ते गुण कोणामध्यें असतील ते असोत!! तात्या आपल्या शत्रूंचा यम, कृपणांचा शत्रु, इंग्रजांचा वादी व पोलिसांचा काळ होता. ज्याच्याशीं त्याचें शत्रुत्व त्याच्या घरावर दरवडा पडावयाचाच. ज्या ठिकाणीं इंग्रजांचें प्रभुत्व, त्या ठिकाणीं दरवडेखोरांचा सुळसुळाट ! ज्या ठिकाणीं त्याला पकडण्याच्या मसलती चालत; व ज्या

ठिकाणीं त्याला पकडण्याकरितां लोक पोलिसांस साह्य देत; त्या ठिकाणीं दरवडा, त्या ठिकाणीं खून व त्याच ठिकाणीं सर्वनाश व्हावयाचा !!

नेमाड जिल्ह्याचे पोलीस सुपरिंटेंडंटसाहेब तात्याच्या अत्याचारानें अत्यंत कष्टी झाले. तात्याच्या दरवड्यामुळें त्यांस फार चिंता उत्पन्न झाली. अनेक ठिकाणांहून अनेक हुषार पोलिस-अम्मलदार तात्याला पकडण्याकरितां बोलावले गेले. तात्याच्या गुप्त कृत्यांचा स्फोट करण्याकरितां शेंकडों डिटेक्टिव्ह पोलिस निवडून त्यांस "तात्यापोलिसां" त सामील करण्यांत आलें. सर्व लोक अनेक उपायांचें अवलंबन करून व अनेक ठिकाणीं हिंडून या गुप्त कृत्यांचा परिस्फोट करण्याच्या उद्योगास लागले.

या सर्व पोलिसांत इब्राहिमबेगनामक एक अत्यंत बुद्धिमान डिटेक्टिव इन्स्पेक्टर होता. त्यानें पुष्कळ शोध करून एका भिल्लास पकडलें. पूर्वीं सांगितलेल्या ऐका दरवड्यांत दरवडा घालून दरवडेखोर परत जात असतां चुकून एकाचा जोडा एके ठिकाणीं राहून गेलेला इब्राहिम बेगला मिळाला. तो जोडा पाहून इब्राहिम बेगनें हा भिल्लाचा जोडा आहे असें ओळखलें व त्या अनुरोधानें त्यानें तो जोडा ज्याचा होता त्या मनुष्यास पकडलें.

या मनुष्याला पकडल्यावर इब्राहिमबेग व रेबिन साहेब यांनीं मोठ्या चतुराईनें त्यांकडून वीस दरवड्यांची माहिती काढून घेतली. कोठें, कोणत्या प्रकारानें, कोणी, कोणाच्या साह्यानें हे दरवडे घातले, हेंही त्याजकडून त्यांस कळलें; पण तात्या व त्याचे दोन सरदार यांची माहिती मात्र त्याजकडून

त्यांस मिळाली नाहीं. या भिल्लाच्या सांगण्यावरून इतकें निष्पन्न झालें कीं, या दरवड्यांत आणखी ९६ भिल्ल होते. यानंतर त्यांसही पकडलें. त्यांजकडून ह्या दरवड्यास कोणाकडून साह्य मिळालें, हेंही कळून त्या साह्यकर्त्यांसही पकडण्यांत आलें; व अशा प्रकारें या सर्व मंडळीस पकडून त्यांस चौकशीकरितां न्यायकोर्टांत उभें केलें. न्यायाधीशांनीं त्यांजवर दरवड्याचा आक्षेप ठेवून २०० भिल्लांस लहान मोठ्या सक्तमजुरीच्या शिक्षा दिल्या.

बारावा परिच्छेद.

बिजनिया व रजपूत यांचें शौर्य.

वरील प्रकार घडल्यानंतर कांहीं दिवसांनीं तात्याचा मुख्य साह्यकर्ता व सरदार बिजनिया, दुसरा सरदार मोदिया यासह पकडला गेला. यांस पकडतांना रेबिनसाहेबास जें दुःख व जो त्रास झाला, त्याचें वर्णन करणेंही असंभवनीय आहे.

एके दिवशीं बिजनियाच्या एका शत्रूनें एकाएकीं येऊन एका पोलिसकामदारास वर्दी दिली कीं, तात्याचे दोन मुख्य सरदार एका जंगलांत एकांतीं कांहीं विचार करीत बसले आहेत. ही बातमी मिळतांक्षणीं तो पोलीसअम्मलदार आपल्या शिपायांसह शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन त्या जंगलाकडे जाण्यास निघाला. तेथें जाऊन पहातात तों खरोखरच ते सरदार एके ठिकाणीं बसून कांहीं बोलत होते. अम्मलदारसाहेबांनीं त्यांस पकडण्याचा आपल्या लोकांस हुकुम दिला.

हुकुम मिळतांक्षणीं त्यांना त्या ठिकाणास वेढा देऊन त्यांना पकडण्याचा यत्न चालविला. हें पाहून ते दोघेही सरदार चकित झाले! आपण संकटांत सांपडलों आहों असें जाणून त्यांनीं आळस टाकून सिंहाप्रमाणें गर्जना केली व आपापली तरवार सरसावून ते त्या जागेवरून उठले! ज्यावेळीं त्या सर्व शिपायांनीं एकत्र होऊन त्या दोघांवर चाल केली; तेव्हां त्यांच्या हातावर तुरी देऊन निसटून जाण्याचा विचार त्यांनीं मनांत आणिला; परंतु, क्षणमात्रांतच तो विचार जागच्या जागीं राहून त्यांना त्यांच्यांशीं युद्ध करण्यास तत्पर व्हावें लागलें. पोलिसशिपायांपैकीं कोणी लाठी, कोणी तलवार व कोणी बंदुक घेऊन त्यांजवर हल्ला करूं लागले; कोणी लाठीचे तडाके देण्यास सुरवात केली; कोणी त्यांवर तलवारीचे प्रहार चालविले व बंदुकांच्या आवाजांनीं तर कानठळ्या बसूं लागल्या; परंतु, त्यामुळें त्या दोघां सरदारास यत्किंचित्‌ही भीति वाटली नाहीं; ते त्यांच्याशीं तोंड देऊं लागले. तलवारींच्या वारांनीं त्यांनीं कित्येक शिपायांच्या लाठ्यांचे तुकडे तुकडे उडविले व कित्येकांचे हात त्यांनीं तलवार व बंदुका यांसह पृथ्वीवर पाडले. विजनियाचा हा पराक्रम तेथें ज्यांच्या दृष्टीस पडला, त्यांना त्याची प्रशंसा केल्यावांचून राहवेना! अशा प्रकारें दोहों बाजूंचें बराच वेळ तुमुल युद्ध होत असतां मेदिया घायाळ होऊन पकडला गेला; पण विजनियाची वीरश्री वाढत चालली; त्याचें स्वरूप उग्र होत चाललें व त्याच्या हातांनीं तलवार जास्त दृढतेनें पकडली. त्याच्या पराक्रमानें दिपून जाऊन कित्येकांनीं ती रणभूमी सोडली; पुष्कळ शिपाई घायाळ होऊन पृथ्वीवर आदळले, व पोलिसअम्मल-

दारानेंही त्यास पकडण्याची आशा सोडली. यावेळीं बिजनिया अत्यंत चपलतेनें तरवार फिरवीत फिरवीत त्या अम्मलदारावर हल्ला करण्यास धांवला; इतक्या अवधींत तीन रजपूत शिपायांनीं त्यास अडविलें. एके बाजूस तीन रजपूत व दुसऱ्या बाजूस एकटा बिजानिया यांमध्यें भयंकर प्रलय चालला !! एकटा बिजनिया शंभरांप्रमाणें भोंसला ! रजपूतही कमी शूर नव्हते. त्यांचा पराक्रम पाहून बिजनिया मनांतल्या मनांत खुष झाला व हे तिघेजण आपल्या टोळीचे मुख्य होण्यास अगदीं लायक आहेत असेंही त्याच्या मनांत आलें. असो. बिजनियानें एकटा असूनही त्या शूर रजपुतांबरोबर बराच वेळ टिकाव धरिला; पण अखेर तो थकला. रजपुत शिपाई. ताजेतवानें असल्यामुळें बिजनिया थकल्याचें पाहून त्यांनीं जास्त लगट केली व त्यास अखेर पकडलेंही. जरी त्या रजपुतांनीं बिजनियाचा पराजय केला होता, तरी त्याचें शस्त्रास्त्रांचें कसब पाहून ते त्यास धन्यवाद देऊं लागले. सर्वांच्या देखत ते ह्मणाले कीं, “ तात्याचा एक सरदार जर इतका पराक्रमी आहे, तर खुद्द तात्या केवढा पराक्रमी असेल ! ज्याच्या एकट्या सरदारानें आह्मां तिघांस लाजविलें, तो तात्या स्वतः किती मनुष्यांना पराजित करील कोण जाणे ? ”

सरकाराला हा सर्व वृत्तांत कळविण्यांत आला. तिन्ही रजपुत शिपायांच्या अलोकिक पराक्रमाचीही पुष्कळ चर्चा झाली. त्यांच्या शूरत्वाची बातमी ज्यानें ज्यानें ऐकिली, त्यानें त्यानें त्यांस धन्यवाद दिले व बिजनियाच्या शूरत्वाचीही प्रशंसा झाली. इंग्रजसरकारानें त्या रजपुतांवर खुष होऊन त्यांस नेमिलेलें बक्षिस दिलें; इतकेंच नव्हे तर उघड उघड

रीतीनें त्यांच्या पराक्रमाची प्रशंसा करून वीरास योग्य अशी बंदुक व तलवार ही देणगी सरकारानें त्यांस संतोषानें दिली.

आमच्यांतील वीर्य नाहींसें होत चाललें, या वीरभूमींत आतां वीरलोक उत्पन्न होत नाहींत, आमच्यांत साहस, पराक्रम व सहिष्णुता यांचा अभाव आहे, असें कोण ह्मणतो ? ज्या देशींत तात्याचा जन्म झाला; ज्या देशांत वीसच वर्षांपूर्वी बिजनियानें शौर्य सर्वांच्या दृष्टीस पडलें; ज्या देशांत दौलिया व हिऱ्या यांस मोठ्या सावधगिरीनें तुरुंगांत ठेवावें लागलें; ज्या देशांत रजपुतांच्या शौर्याबद्दल संतुष्ट होऊन सरकार त्यांस तलवार व बंदुक बाक्षिस देतें; त्या देशांत वीर लोक नाहींत असें कोण ह्मणेल? शूरांचें रक्त त्यांच्या नाड्यांतून वहात नाहीं असें कोण ह्मणेल ? ज्यांना तसें ह्मणावयाचें असेल, त्यांनीं खुशाल ह्मणावें; आह्मी तर केव्हांही ह्मणणार नाहीं ! !

बिजनिया व मेदिया पकडला जाऊन त्यांस न्यायकोर्टांत उभें करण्यांत आलें. भिनदान गांवच्या हिम्मत पाटलाचा खून केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यांत आला. सदर आरोप त्यांच्यावर शाबीत होण्याकरितां पोलिसांनीं पुष्कळ खटपट केली; व त्यांत त्यांस यश येऊन मेदियाला जन्मठेप (काळ्या पाण्याची) व हिम्मतपाटलाच्या खुनाबद्दल बिजनियास फांशीची शिक्षा दिली. जरी तात्याचे मुख्य मुख्य सरदार पकडले जाऊन त्यांस न्यायकोर्टांत शिक्षा झाल्या तरी ज्या तात्याकरितां सरकारचा इतका यत्न, इतके परिश्रम व इतका पैसा खर्च होत होता, तो तात्या सांपडला नाहीं. ज्याच्याकरितां अगणित पोलिसची नेमणुक झालेली तो तात्या कां पकडला जाऊं नये हा प्रश्नच गूढ होय.

यावेळीं इंग्रजी कामदारांनीं हतवीर्य होऊन इंदुरसरकारचा आश्रय करण्याचा बेत केला. तात्याला पकडण्याकरितां इंदुरसरकारास आग्रह करण्यांत आला. सरकारच्या या आग्रहाप्रमाणें महाराजांस वागणें भाग पडून त्यांनीं तात्याला पकडण्याकरितां कितीएक पोलिसांची योजना केली; पण फार काय सांगावें, हेही पोलीस इंग्रजी कामदारांप्रमाणें अपयश पदरीं बांधून आपापल्या ठिकाणीं निघून गेले.

हा सर्व प्रकार पाहून व ऐकून इंग्रजी कामदार ह्मणूं लागले कीं, आह्मी बहुतेक सर्वांस पकडलें आहेंच! आतां केवळ तात्या व त्यांचे कांहीं साथीदार मात्र राहिले आहेत; त्यांनाही होळकर सरकारच्या साह्यानें केलेल्या नवीन बंदोबस्तानें लवकरच पकडून टाकूं! तात्याला पकडण्यास इतका उशीर व इतका खर्च लागला नसता; पण या प्रांतांतील पुष्कळ भाग दाट जंगलांनीं व्याप्त असल्यामुळें, जंगल नाहीं तेथें रेताड मैदान असल्यामुळें, प्रायः गांव व वस्ती कोठेंच दिसत नसल्यामुळें आणि जेथें गांव आहेत, तेथें भिल्ल लोकांचेंच प्राबल्य असल्यामुळें तात्याचा सुगावा मुळींच लागत नाहीं; इतकेंच नव्हे तर पोलिस जो कांहीं यत्न करितात तो तात्यास सहज समजला जातो!!

तात्या, तुझी धन्य असो! आह्मी तुला दरवडेखोर ह्मणावें काय? तुला दुसरें कांहींच नांव आह्मास देतां येणार नाहीं काय? ज्या दरवडेखोरास प्रजा साह्य करिते, त्यास आह्मीं कसें विसरावें? तूं दरवडेखोर तर खराच; पण कोणत्या गुणांनीं दरिद्री प्रजेची भक्ति तुजवर बसली आहे, हें विचार करण्या-

सारखें आहे ! कोणत्या असाधारण गुणामुळें तुला पोलिसची कारवाई समजत असावी बरें ! !

तेरावा परिच्छेद.

बिजनियाचा अंत व कोदवार पाटलाबरोबर तात्याचा व्यवहार सन १८८१ इ०

एकेक मिळून तात्याचे सर्व मुख्य मुख्य सरदार पकडले गेल्यामुळें त्याची छाती फाटून गेली, तो शक्तिहीन झाला, त्याच्या टोळींतील लोक फुटून ते इकडे तिकडे फांकले, आतां कांहीं दिवस तरी तात्याच्या हातून कांहींही होऊं शकणार नाहीं; त्याला आपली टोळी पुन्हां तयार करितां येणार नाहीं व त्याला दरवडाही घालतां येणार नाहीं; अशी कित्येकांची कल्पना झाली; पण अखेर ती कल्पनाच ठरली. ज्यावेळीं बिजनियाचा मुकदमा कोर्टांत चालूं होता व सर्वजण बिजनियाच्या नशिबीं काय शिक्षा लिहिली आहे याचा विचार करीत होते, त्याच वेळीं एका भयंकर दरवड्याची बातमी आली. ता० ७ जानेवारी १८८१ रोजीं हा भयंकर दरवडा पडला.

इंदूररस्त्यापासून समोरें ३ मैलांवर चिचगुहानामक एक गांव आहे. त्या गांवीं एक वाणी राहत असे. त्याजवळ पुष्कळ संपत्ति होती; पण त्या संपत्तीचा व्यय त्याच्या हातून होत नसे. गांवांतील एखादा मनुष्य जर अन्नाकरितां प्राण टाकीत असेल, तर त्याजकडे हा वर डोळे करूनही पहात

नसे. वरील दिवशीं रात्रीं ह्याच्या घरांत तात्याचा एकाएकीं प्रवेश झाला. तो त्यावेळीं एकटा नसून दौलिया, हिऱ्या व आणखी कित्येक लोक त्याच्या बरोबर होते. त्यांनीं त्या वाण्याचें सर्वत्र लुटून तेथून कुच केलें; जातांना तात्या त्या वाण्यास ह्मणाला कीं, " जर तूं एक पैसाही खर्च करीत नाहींस तर इतकी मोठी संपत्ति तुजजवळ असून काय फायदा ? ज्याला पैसा खर्च करावासा वाटतो, त्यानेंच श्रीमान् होणें योग्य आहे."

पोलिसांस ही बातमी समजतांच ते होळकरसरकारपोलिसच्या साह्यानें या दरवड्याची चौकशी करूं लागले; परंतु, त्यापासून काय झालें हें आह्मी सांगण्यापेक्षां वाचकांस तें सहजच समजण्यासारखें आहे; मात्र पोलिसांस या चौकशीपासून इतकेंच समजलें कीं, तात्या या वेळीं होळकरी अमलांत कोठें ना कोठें तरी दडून बसला आहे.

हा दरवडा घातल्यानंतर कांहीं दिवसांनीं ह्मणजे फेब्रुवारीच्या दुसऱ्या तारखेस एका भयंकर वार्तेनें तात्याचें हृदय व्याकुळ झालें व मन बावरून गेलें. त्यानें या दिवसापासून एक महिनापर्यंत हातांत शस्त्रही धारण केलें नाहीं. ज्या कारणामुळें तात्याचें मन विचलित झालें तें असें:—

तात्याचा मुख्य सरदार बिजनिया यास हिम्मत पाटलाच्या खुनास साह्य केल्याबद्दल फांशीची शिक्षा झाली, हें सर्वांस ठाऊक आहेच. वरील दिवशीं हिम्मत पाटलाच्या भिनपान गांवांत भिल्लच भिल्ल दिसूं लागले; अनेक ठिकाणांहून हजारो भिल्ल त्या गांवीं येत असून सर्वजण एका मोठ्या मैदानांत जमले होते. इतक्यांत कांहीं सशस्त्र शिपायांनीं काढण्यांनीं

बळकट बांधलेल्या एका कैद्यास तेथें आणलें. तो कैदी या-वेळीं कृश व दुर्बल दिसत होता. शरीर नुसतें अस्थिपंजर मात्र उरलें होतें. तथापि त्याच्या तोंडावर यावेळींही गंभीरता व वीरतेज झळकत होतेंच. तो कैदी लोकांच्या दृष्टीं पडल्या-बरोबर त्यांनीं त्यास ओळखलें व एकदम सर्वजण "बिजनिया महाराज" "बिजनिया महाराज" असे ओरडले. शस्त्रधारी पोलिसांनीं त्याच्या गळ्यास एक दोरी अडकवून त्यास तेथील एका झाडाच्या फांदीस लटकविलें व दुसरा एक शिपाई उच्चस्वरानें ह्मणाला:— " सर्व भिल्ल लोकहो, तात्यास साह्य केल्यामुळें याचा काय परिणाम झाला पहा!! तात्याच्या बरोबर दरवडे घातल्यानें अशी दशा प्राप्त होते, हें लक्ष्यांत ठेवा. यानें येथल्या हिम्मत पाटलाचा खून केला ह्मणून त्यास फांशीं देण्यांत येत आहे, हें पाहून तुह्मी सावध असा. अशीं कामें केल्यानें काय होतें हें पाहून ठेवा, व तात्याचें साह्य केल्यानें होणाऱ्या परिणामाचें स्मरण ठेवा." इतकें बोलून तो शिपाई गप्प बसला. बिजनिया त्या फांसास लटकला गेल्यावर दोन चार वेळ त्यानें असके दिले व पहातां पहातां या जन्मांतील सर्व दुःखांपासून तो मुक्त झाला. भिल्लसमुदाय बराच वेळ तेथें उभा राहिल्यावर हळू हळू व्याकुळ अंतः-करणानें व्यथित होऊन आपापल्या गांवांकडे निघून गेला. बिजनियाचें प्रेत त्या झाडासच टांगलेलें राहून दरवडे व खून केल्यानें काय परिणाम होतो हें सर्वांस दाखवूं लागलें. या भयंकर देखाव्यानें सर्व लोक भयभीत झाले; परंतु, वास्त-विक तात्या व त्याचे सांथीदार यांस त्यापासून भय वाटलें कीं नाहीं हें कळलें नाहीं. मात्र ही बातमी ऐकून त्यांना बहुत

दुःख झालें. तात्याला तर पुत्रमरणापेक्षांही जास्त दुःख झालें. एक महिनाभर शस्त्रास्त्रांचा त्याग करून तो रात्रंदिवस रडत बसला होता.

या सुमारास कोदवार पाटील नांमक मनुष्यानें तात्याला फसविण्याच्या अनेक युक्त्या इंग्रजी कामदारांस सांगितल्या. कोदवार पाटील ज्या गांवीं रहात होता, तेथें भिल्लांची वस्ती बरीच असल्यामुळें ही बातमी तात्यास तेव्हांच लागली. पाटलानें त्याच्या विरुद्ध जें जें सांगितलें, तें सर्व त्यास इत्थंभूत कळलें. बिजनियाचें विस्मरण होईपर्यंत हातांत शस्त्र न घेण्याचा तात्यानें निश्चय केला होता; पण कोदवार पाटलाची हकीकत त्याचे कांनीं आल्याबरोबर तो रागानें अगदीं संतप्त झाला व एप्रिल महिन्याच्या पहिले तारखेसच त्यानें पुनरपि शस्त्र ग्रहण केलें.

यद्यपि किती एक मुख्य मुख्य सरदारांचा असा परिणाम झाल्यामुळें तात्याचें पुष्कळ नुकसान झालें होतें; तथापि त्याच्या टोळीस पुढारी नाहीं असें झालें नव्हतें. त्याच्याजवळ दुसरी जी किरकिक मंडळी होती, त्यांपैकींच कांहींची नेमणुक त्यानें आपल्या सरदारीचे जागेवर करून तो मोठ्या बंदोबस्तानें कोदवार पाटलाच्या घरावर जाऊन पोंचला; व त्याच्या घरांत शिरून त्यानें त्याचें सर्व घर लुटून फस्त केलें. त्याजजवळ फुटकी कवडीही राहिली नाहीं. तात्याच्या विरुद्ध कांहीं बातमी सांगितल्यानेंच आपली अशी दशा झाली, हें कोदवार पाटील समजूनच होता. कोदवार पाटलाचें घर लुटल्यानेंच त्यास योग्य शिक्षा मिळाली नाहीं असें तात्यास वाटून त्यानें त्याचे नातेवाईक, आप्त इष्ट यांचा तपास काढून

त्या प्रत्येकाचें घर लुटून फस्त केलें. सर्वजण हाहाकार करीत. पोलिसठाण्यांत गेले व त्यांनीं ही सर्व बातमी तेथें पोंचविली. तात्यानें त्याची बिलकुल पर्वा न करितां तो त्या ठिकाणाहून दुसरीकडे निघून गेला.

चौवदावा परिच्छेद.

तात्याच्या सांथीदारास शिक्षा व विरुद्धाचरणाचें फल.

या दरवडयानंतर तात्यानें नेमाड जिल्हा सोडून देऊन तो तापीनदीच्या किनाऱ्यावरील जंगलांत घुसला. तेथें त्याचे अन्नपाण्यावांचून बरेच हाल होऊं लागले; ह्मणून तेथून तो दुसरीकडे जाण्याच्या विचारांत होता; इतक्यांत एके दिवशीं त्यास त्या जंगलांत सरवरीया गांवचे तीन मनुष्य भेटले. त्यांच्याशीं त्याचा चांगला परिचय होता. तात्याची ती दुःस्थिति पाहून त्यांस अत्यंत कळवळा आला.व त्यांनीं जवळच्या भामगडच्या बाजारांत जाऊन तात्यास कांहीं अन्नसामग्री आणून दिली. ती सामग्री मिळाल्यानें तात्या अत्यंत संतुष्ट झाला व त्यानें त्यांच्याशीं कायमची मैत्री बांधिली.

तात्यानें या जंगलांत राहून मांडळगांवच्या आसपास कित्येक ठिकाणीं दरवडे घातले. ज्यांच्या घरीं तात्यानें दरवडे घातले, ते कोणत्याना कोणत्या तरी कारणानें त्याचे शत्रू झालेले होते. कोणी लोभी व कंजुष ह्मणून, कोणी इंग्रजांचा मित्र ह्मणून व कोणी पोलिसचा साह्यकर्ता ह्मणन त्यांच्यावर तात्यानें हे हल्ले केले होते. वरील नूतन मित्रांच्या द्वारें तो

या मनुष्यांची माहिती मिळवी व त्यांचें सर्वस्व लुटून तेथून पळून जाई, असा प्रकार बरेच दिवस चालला होता.

या सर्व दरवड्यांची बातमी ' तात्यापोलिस ' चे अधिकाऱ्यांस लागून ते त्यांची चौकशी करूं लागले. तेव्हां त्यांस असें कळून आलें कीं, या सर्व दरवड्यांच्या मुळाशीं तात्या आहेच. त्यास पकडण्याचा त्यांचा उद्योग पुनरपि जोरानें चालू झाला; पण फलप्राप्तीची आशा वाटेना. अत्यंत परिश्रम करून तो सांपडला तर नाहींच; पण आहे कोठें याचा तपाससुद्धां त्यांस लागला नाहीं. या पोलिसअधिकाऱ्यांत शेरअली नामक एक इन्स्पेक्टर होता. त्यानें पुष्कळ यत्न केले तथापि तात्या सांपडला नाहीं; पण त्याच्या यत्नास थोडें तरी यश मिळालेंच. त्यानें सरबरीया गांवांतील तात्याच्या त्या तिन्ही मित्रांस मोठ्या कुशलतेनें पकडलें, व तात्याचे हे सांथीदार आहेत अशी त्याची खात्री झाली. त्यांच्या घराचा झाडा घेतां दरवड्यांत चोरीस गेलेले कित्येक जिन्नस सांपडले; तेव्हां दरवडा घालण्यास साह्य करणाऱ्या आरोपावरून त्यांची न्यायकोर्टापुढें चौकशी झाली; चौकशी अंतीं त्यांच्यावर अपराध शाबीत होऊन प्रत्येकास तीन तीन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा न्यायाधीशांनीं दिली.

सरबरीया गांवांत एक रजपूत मालगुजार होता. तो साहेजला गांवांत राहून तेथीलही मालगुजारी वसूल करीत असे. सरबरीया गांवांतील तात्याच्या वरील तीन मित्रांस शिक्षा झाल्यानंतर एके दिवशीं कित्येक सशस्त्र लोक एकाएकीं साहेजला गांवांत शिरले. त्यांनीं मालगुजाराची गांठ घेऊन त्याच्याशीं ते कांहीं बोलत बसले, जातेवेळीं मालगुजारानें त्यांस ५०

रुपये दिले. पोलिसला ही खबर कळतांच ते त्या रजपूत मालगुजाराकडे आले व त्यास त्या सशस्त्र लोकांची माहिती विचारूं लागले. पोलिसचा अशाप्रकारचा पहिला प्रश्न झाल्याबरोबर तो मालगुजार मनांतल्या मनांत अगदीं भयभीत झाला; परंतु, तें बाहेर न दाखवितां त्यानें मोठ्या धाडसानें धडधडीत खोटी गोष्ट पोलिसांस सांगितली. तो ह्मणालाः—"येथें कांहीं सशस्त्र लोक आले होते; ही गोष्ट खरी आहे; पण मला त्यांची माहिती नाहीं. तें पोलिस होते कीं दरवडेखोर होते, हेंही मला उमजलें नाहीं. मी त्यास कसलीही मदत केली नाहीं अथवा द्रव्यही दिलें नाहीं." मालगुजाराचे हे शब्द ऐकून पोलिस लोक अत्यंत आश्चर्यचकित झाले!

धन्य पोलिसांची! जो मालगुजार सरकारी नोकर असून तुमच्याशीं त्याचा वारंवार संबंध पडावयाचा, तो तुमच्या समोर उभा राहून ते आलेले लोक दरवडेखोर होते कीं पोलिस होते, हें मला कळलें नाहीं, असें बेधडक सांगतो, यावरूनच त्यांची बुद्धिमत्ता प्रकट होते व त्या प्रांतांतील लोकांचें पोलिसांवर कसें प्रेम आहे, हेंही यावरून चांगल्याप्रकारें समजतें. वास्तविक तुमचें हें काम पाहून चुपच बसावें लागतें; कारण, असला प्रकार पोलिसास ह्मणजे कमी लज्जादायक आहे असें नाहीं.

मालगुजाराची ती गोष्ट ऐकून पोलिस लोक एकदम चकित झाले. तात्या सांपडत नाहीं, ह्मणून पोलिसांची जिकडे तिकडे छीः थुः होत होती, त्याचा बदला त्यांनीं या मालगुजारावर काढला. पहातां पहातां साक्षीदार तयार होऊन असें सिद्ध झालें कीं, मालगुजारानें जाणून बुजून दरवडेखोरांस

साह्य केलें व तात्याच्या सांगीवरूनच पोलिसास त्यानें खोटें सांगितलें. साक्षीदार मिळाल्यावर मग काय विचारता ? पोलिसाजवळ खोटें सांगितल्याचा आरोप त्याजवर शाबीत होऊन डेप्युटी कमिशनरसाहेबांनीं मालगुजारास सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा दिली.

या गोष्टीनंतर तात्या तेथून निघून होळकरसरकारच्या मुलखांत जाऊन राहूं लागला. एक महिनाभर विश्रांति घेऊन तो पुनरपि आपल्या टोळीसह बाहेर निघाला व नेमाड हद्दींतील बागदागांवीं त्यानें कित्येक दरवडे घालून त्या गांवास बहुत त्रास दिला. या गांवास इतका त्रास देण्याचें तात्यास कारण काय ? यासंबंधीं कांहींच बातमी बाहेर आली नाहीं.

यानंतर थोडक्याच दिवसांनीं बेरिया येथील पोलिसचौकींत एकदम अशी बातमी येऊन पोंचली कीं, तात्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन अंबागांवाकडे एकटाच चालला आहे. त्या चौकीवर एक हेडकान्स्टेबल रहात असे. त्याला ही बातमी कळतांच त्यानें अंबागांवच्या मालगुजरास बोलावून आणून त्यास सर्व हकीकत सांगितली. आपल्याच गांवावरून तात्या जात आहे हें ऐकून सरकाराकडून बक्षिस मिळविण्याकरितां तो तात्यास धरण्याच्या उद्योगास तत्पर झाला. त्यानें त्या हेडकान्स्टेबलास बरोबर घेऊन तात्या ज्या रस्त्यानें जात आहे अशी बातमी त्यास लागली त्याच रस्त्यानें ते निघाले. वाटेंतही त्यांस तात्यासंबंधीं बातम्या लागत चालल्या व यामुळें तात्या सांपडेल अशी त्यांस पक्की आशा वाटूं लागून ते जोरानें पुढें निघाले. मालगुजार पोलिसास बरोबर घेऊन तात्याच्या शोधार्थ निघाला आहे अशी बातमी

त्या प्रांतांतील भिल्लांस कळल्याबरोबर तात्याची बातमी त्यांस लागणें बंद झालें. अखेर निराश होऊन ते आपापल्या घरीं परत गेले.

या गोष्टीस फार दिवस झाले नाहींत तोंच अंबागांवां-तील सदरू मालगुजारांच्या घरीं दरवडा पडला. दरवड्याच्या वेळीं तात्यानें त्या मालगुजारास दरडावून सांगितलें कीं, बक्षिसाच्या लालचीनें तूं पोलिसास बरोबर घेऊन तात्यास पकडण्यास तयार झाला होतास; ह्मणून तुझ्या घरावर हा दरवडा पडला आहे असें समज. ज्या बक्षिसाची आशा त्यानें धरिली त्याचें हें फल त्यास मिळालें !

अंबागांवीं दरवडा घालण्याच्या वेळीं तात्यानें आणखी एक कृत्य केलें होतें. दरवडयापासून त्या गांवाचें रक्षण करण्याकरितां एक पोलिस शिपाई तेथें नेमिला होता व तो याच मालगुजाराचे घरीं रहात असे. तात्याला ही गोष्ट आधी-पासूनच ठाऊक होती. घरांत शिरल्याबरोबर तात्यानें त्या शिपायास हाक मारून सांगितलें कीं, 'मी येथें आतां दरवडा घालणार आहें. तूं आतां येथून चालता हो.' त्या शिपायानें तात्याच्या ह्या सांगण्याकडे दुर्लक्ष्य करून तो आपलें शस्त्र घेण्याच्या नादाला लागला; त्याबरोबर तात्यानें त्यास धरून तेथेंच बांधून ठेविलें. त्याचीं शस्त्रें वगैरे हिरावून घेतलीं; व मालगुजाराचें सर्व घर लुटून तो आपल्या लोकां-सह चालता झाला. जातांना त्यानें त्या पोलिसास सोडलें; पण तो त्या वेळीं इतका भयभीत होऊन गेला होता कीं, त्याला बसली जागा तर सोडवेनाच; पण त्याच्या तोंडांतून एक शब्दही उमटेना !

जर यावेळीं त्या पोलिसानें कांहीं क्लृप्ती लढविली असती व जर तो गुप्तपणें त्या दरवडेखोरांच्या मागें जाऊन त्यांच्या रहाण्याचें ठिकाण पाहून येता तर सर्व दरवडेखोर सांपडले असते; पण त्या शिपायास तें सुचलें नाहीं व एवढ्याचमुळें त्यास पोलिसांतून कमी केलें आणि कित्येक दिवसपर्यंत सरकारी नोकरीपासून त्यास पराङ्मुख रहावें लागलें.

पंधरावा परिच्छेद.

दौलिया पकडला गेल्यामुळें तात्यास आलेला राग.

वरील गोष्ट घडल्यानंतर १८ दिवसांनीं ह्मणजे ता.२३ मे रोजीं तात्या तापीनदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर जाऊन पोंचला. तेथून तो नेमाड जिल्ह्यांतील बलथार गांवीं जाण्यास निघाला असतां वाटेंत दिदेरागांवीं त्यानें मुक्काम केला. तेथील दोन भिल्लांनीं तात्याचा चांगला सत्कार केला व त्यास त्याच्या अनुचरांसह मेजवानी दिली. ती मेजवानी घेऊन तात्या पुढें निघाला. बलथार गांवीं पोंचल्यावर तेथें व तेथून जवळच असलेल्या धारतलाईगांवीं दरवडा घालून तात्या होळकराच्या मुलुखांत शिरला व तिकडे त्यानें एका गांवीं कांहीं दिवस विश्रांति घेतली. वरील दरवडे घातल्यावर पोलिस त्या ठिकाणीं चौकशीस गेले व ज्या बाजूनें दरवडेखोर गेल्याची बातमी त्यांस लागली, त्याच बाजूनें ते चौकशी करीत चालले; परंतु, त्या जंगली व डोंगराळ प्रदेशांत कांहीं एक पत्ता न लागून त्यांस हात हालवीतच परत

याचें लागलें. तथापि गोकुलराम इन्स्पेक्टरनें तात्याचा पत्ता न लागलेला पाहून हिउरागांवांतील त्या दोन भिल्लांस पकडलें व त्यांजकडून तात्यासंबंधीं कांहीं माहिती मिळवून तो स्वस्थ राहिला.

तात्यास पकडण्याकरितां जे गुप्तपोलीस नेमिले होते, त्यानीं पुष्कळ तपासाअंतीं असें ठरविलें कीं, तात्या होळकर-इलाख्यांत राहतो. महाराजांचे लोक मात्र तात्यास धरण्या-करितां मुळींच यत्न करीत नसत; कारण, तात्यास पकड-ण्याचा प्रयत्न केल्यास तो सांपडत तर नाहींच; पण उलट त्याचा क्रोध वाढून तो आपल्या प्रांतांतील गांवांस छळतो, अशी त्यांची दृढ समजूत झाली होती.

होळकरइलाख्यांतील खरयानामक गांवीं एक न्हावी रहात असे. त्याला तात्यासंबंधीं कांहीं बातमी समजली कीं, तो लागलींच नेमाडांतील एका न्हावी जातीच्या गुप्त पोलिसास ती जाऊन सांगे. तथापि महाराजांचे पोलीस तिकडे लक्ष्य पुरवीत नसत. न्हाव्याची ही बातमी तात्यास लागून तो शिक्षा देण्याकरितां ता. ६ सपटेंबर रोजीं एकाएकीं त्याच्या घरीं गेला व त्यापासून २५ रुपये रोख घेऊन आणि २५० रुपये मागाहून देण्याबद्दल त्याचें वचन घेऊन त्यानें त्यास सोडून दिलें.

ही बातमी महाराज होळकर यांच्या कानांवर जाऊन त्यांनीं आपल्या लोकांस तात्यास पकडण्याचा हुकूम दिला. तें तात्याचा शोध करीत करीत भीलखेरीनामक गांवीं जाऊन पोंचले. त्या ठिकाणीं एक सोनार रहात असे. तात्या यावेळीं त्या सोनाराच्या घरीं असून तो त्याजजवळ कांहीं रुपये मागत

होता. सोनारानें त्यास मोठ्या आदरानें जेवण घालून आपल्या घरीं ठेवून घेतलें व रुपये आणण्याच्या बहाण्यानें बाहेर जाऊन त्यानें तात्या आपल्या घरीं असल्याची बातमी त्या आलेल्या होळकरपोलिसांस दिली.

सदर दरवडेखोर त्या सोनाराच्या घरीं विश्रांति घेत असतां महाराजांचे लोक एकदम घरांत घुसले; त्यांनीं त्यांस पकडलें व मोठ्या बंदोबस्तानें महाराजांच्याकडे रवाना केलें.

तात्या आपल्या कित्येक सांथीदारांसह सांपडला गेला, ही बातमी ऐकून महाराजांना अत्यंत संतोष झाला. ज्यांनीं त्यांस पकडलें ते बक्षिसाकरितां अधीर झाले. तात्यास पकडल्याची बातमी इंग्रजी अम्मलदारांस देण्यांत आली.

इंग्रजी पोलिसास ही बातमी लागतांच त्यांना आपल्या डोक्यावरचें मोठें ओझें उतरल्यासारखें वाटलें; व तें तात्याच्या विरुद्ध पुरावा गोळा करण्याकरितां धांवाधांव करूं लागले. इंग्रज सरकाराकडून होळकर दरबाराला तात्याला बंदोबस्तानें नेमाडास पाठवून देण्याबद्दल खलिता लिहिला गेला; त्याप्रमाणें त्यास पाठविण्यांत आलें. नेमाडास येईपर्यंत तो दरवडेखोर आपलें नांव तात्या आहे असेंच सांगत होता; पण अखेर तो तात्या नसून कैदेंतून दोनवेळ पळून गेलेला दौलिया भिल्ल आहे, असें कळून आलें.

दौलिया सांपडल्याची बातमी तात्यास कळतांच तो अत्यंत दुःखी झाला. भीलखेरीगांवच्या सोनारानें हा विश्वासघात केला असें कळतांच त्याचा व त्यास साह्य असलेल्या दुसऱ्या लोकांचा सूड घेण्याचा तात्यानें निश्चय केला. तो आपल्या लोकांसह भीलखेरी गांवांत शिरला व त्या सोनाराच्या घरास

त्यानें प्रथम आग लाविली व मगाहून ज्या सात मनुष्यांनीं दौलियांस धरून देण्याचे कामीं पोलिसांस साह्य केल्याचें त्यास कळलें, त्यांचींही घरें त्यानें पेटविलीं. सर्व गांव भेदरून गेला. जिकडे तिकडे उजेड आणि धुराचे लोट दिसूं लागले. सर्व लोक आग विझविण्याच्या उद्योगास लागल्याची संधि पाहून तात्यानें लुटालुट चालविली व बरीचशी लूट मिळवून तो अंजनगांवीं निघून गेला. त्या ठिकाणीं होळकर सरकारचा एक पटवारी रहात असून तो त्या भागाचा सर्व सरकारी वसूल करीत असे. तात्या त्या पटवाऱ्याच्या घरांत शिरला व त्यानें तेथील सर्व सरकारी वसुलाचे कागद पत्र बाहेर काढून ते जाळून टाकिले. या कागद पत्रांमुळें होळकर सरकारचें बरेंच नुकसान झालें. जातांना तात्या पटवाऱ्यास ह्मणालाः— " इतके दिवस तात्या महाराजांच्या राज्यांत शांतिपूर्वक रहात होता. कित्येक दिवसपर्यंत महाराजांनीं मला बिलकुल त्रास दिला नाहीं व मीही महाराजांचें कांहीं अनिष्ट केलें नाहीं. पण आतां जर महाराज मला धरून देण्याच्या उद्योगास लागले आहेत व त्यांनीं जर माझा एक सरदार पकडून नेमाडास पाठविला आहे तर आतां तात्या त्यांच्या राज्यांत दरवडे घालणार. घरें आणि कागदपत्र जाळूनच तो स्वस्थ राहिला असें समजूं नका. तूं महाराजांस आतांच्या आतां जाऊन सांग कीं, ' तात्या एखादे वेळीं तुह्मांस भेटेल, तुमच्या समोर युद्धांत रणदुंदुभि वाजवील, व दौलियाला पकडल्याबद्दलचा सूडही घेईल "

तात्याच्या दरवडेखोरपणाची धन्य असो ! जो मनुष्य साधारण असून होळकरमहाराजांविरुद्ध शस्त्रधारण करण्याची

इच्छा करितो– सामान्य दरवडेखोर होऊन चतुरंग सेनेच्या मध्यभागीं रणदुंदुभि वाजविण्यास तयार होतो– त्यास कोणत्या वर्गांतील दरवडेखोर समजावें हें आह्मांस समजत नाहीं. त्यास सामान्य दरवडेखोरांत गणती येणार नाहीं. परकीय इतिहासकार ज्यास दरवडेखोरांच्या कोटींत गणतात, त्या महाराष्ट्रकुलभूषण शिवाजीचाच हा अवतार होय. शिवाजी-महाराज व हा असभ्य भिल्ल दरवडेखोर यांत कांहीं भेद आहे काय ? असले हलके दरवडे घालण्याचें सोडून देऊन तो बड्या दरवड्यांत शिरता व त्यास थोडी विद्या येत असती तर त्यास आज दरवडेखोराच्या बदला राजाच ह्मणण्यांत आलें असतें. तो घनघोर जंगलाच्या ऐवजीं सुंदर महालांतून रहाता, तर जे लोक त्यास धरण्यास प्रवृत्त झाले होते, तेच त्याच्यापुढें हात जोडून उभे रहाते. हिंदुस्थानचे बादशहा सातवे एडवर्ड ज्याप्रमाणें इतर राजांस तोफांच्या सलामीचा सन्मान देऊन आपली कीर्ति वाढवीत आहेत, त्याप्रमाणें आज त्यासही सन्मानार्थ सलामीच्या तोफा मिळत्या व तोफांच्या आवाजाप्रमाणें त्याचें नांवही सर्वत्र दुमदुमून रहातें; पण तें सर्व बाजूस राहून आज तो दरवडेखोर या हिडिस नांवानें प्रसिद्ध झाला आहे !!

सोळावा परिच्छेद.

दौलिया व हिऱ्या यांचा शेवट.

दौलियाला पकडण्याच्या कामीं इजरिलगांवच्या कांहीं लोकांनीं महाराजांस साह्य दिलें होतें; सबब त्यांचा सूड

घेण्याकरितां तात्या अंजनगांवाहून इजरिलगांवीं जाऊन पोंचला. तेथें त्यानें त्या गांवास आग लावली; व लुटालुट करून तेथून जामथी गांवाकडे निघून गेला. त्या गांवांतील कांहीं शेतकऱ्यांनीं त्यास कांहीं रक्कम देण्याचें कबूल केलें होतें; ती वसूल करण्याकरितां तो तेथें गेला होता. तात्या जामथीस आहे ही बातमी बोरगापोलिसठाण्यांत जाऊन तेथील कांहीं पोलिस त्या गांवीं जाऊन पोंचले; पण तेथें गेल्यावर त्यांना अशी बातमी कळली कीं, तात्या येथून हिऱ्या भिल्लाच्या गांवाकडे गेला आहे; लागलीच ते तिकडे निघाले. तात्या हिऱ्याच्या गांवीं गेला, तेव्हां त्यानें आपल्या सांथीदारांपैकीं कांहीं लोक गांवाच्या बाहेर आपल्या विरुद्ध पक्षापैकीं कोणी येईल जाईल त्यावर देखरेख ठेवण्याकरितां ठेविले होते. त्यांनीं पोलिस येत आहेत असें पाहून कांहीं सांकेतिक ध्वनि केला; त्याबरोबर तात्या तो गांव सोडून चालता झाला. इकडे मागाहून पोलिसअधिकाऱ्यांनीं हिऱ्याचें सर्व घर धुंडाळलें; पण त्यांना तेथें कोणी मिळालें नाहीं. फक्त त्याच्या भावाचे व बहिणीचे घरीं दरवडयांतील कांहीं माल मात्र सांपडला.

जरी तात्या तेथून आपल्या सांथीदारांसह नाहींसा झाला होता तरी बुद्धिमान् गुप्तपोलिसांनीं तात्याचा सांथीदार हिऱ्या यास पकडलें. डिटेक्टीव्ह इन्स्पेक्टर नाथूखां यानें जामथीगांवांतील एका मनुष्याशीं मैत्री संपादन करून त्याच्या द्वारें हिऱ्यासंबंधीं सर्व बातम्या मिळविण्यास सुरुवात केली. त्या मनुष्याशीं हिऱ्याचा कांहीं संबंध होता. इन्स्पेक्टरच्या सांगण्यावरून त्यानें ता. १६ दिसेंबर रोजीं हिऱ्यास आपल्या घरीं बोलावलें. या बोलावण्यांत कांहीं लबाडी आहे असें हिऱ्यास न समजल्या-

मुळें तो एकटाच त्याच्या घरीं गेला. तेथें सदर इन्स्पेक्टर-साहेब चार सशस्त्र शिपायांसह दडून बसले होते, त्यांनीं त्यावर एकदम हल्ला केला. हिऱ्या शस्त्ररहित नव्हता. दोन्ही बाजूंनीं बंदुकांचा भयंकर शब्द कानीं पडूं लागला. दोन्ही बाजूंनीं गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. पहातां पहातां एक शिपाई घायाळ होऊन पडला व हिऱ्यासही जखम लागली. तत्काल नाथूखानें त्यास पकडून त्याचे हातांतील बंदुक हिसकावून घेतली.

दौलिया व हिऱ्या यांस मॅजिस्ट्रेटकडे पाठविण्यांत आलें. मॅजिस्ट्रेट साहेबांनीं कच्ची चौकशी करून त्यांचा खटला सेशनमध्यें पाठविला. सेशनमध्यें त्यांस जन्मठेप (काळ्या पाण्याची शिक्षा) मिळाली व त्यांस धरणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांस सरकाराकडून योग्य बक्षिस देण्यांत आलें. यावेळीं दौलिया व हिऱ्या यांस तुरुंगांत निरनिराळ्या कोठ-ड्यांतून ठेवण्यांत आलें होतें; इतकेंच नव्हे तर त्यांच्या पायांत जड बिड्याही घालण्यांत आल्यामुळें त्यांचा पक्का बंदोस्त झाला होता. त्यांच्यावर स्वतंत्र पहारेकरी नेमिले होते. त्यांच्या डोकीस पळून गेलेल्या कैद्यांची खूण ह्मणून लाल टोप्या घाल-ण्यांत आल्या. सारांश, यावेळीं त्यांना जितके दिवस तुरुंगांत ठेविलें होतें, तितके दिवस त्यांच्यावर खडा पहारा ठेविला होता. अखेर त्यांना जहाजांत बसवून समुद्रापलीकडे काळ्या पाण्यावर (अंदमान बेटांत) पाठविण्यांत आलें.

पोलिस लोक अतिशय उद्योग व यत्न करीत असतांही तात्या त्यांस न सांपडणें ह्मणजे कमी लज्जास्पद गोष्ट नव्हे हें तर खरेंच; पण थोडा विचार केल्यास तात्यास पकडणें सामान्य काम नव्हतें हें तेव्हांच लक्ष्यांत येईल. तो जेव्हां जंग-

लांत रात्री ही तेव्हां त्यानें दोन रात्री एके ठिकाणीं काढल्या नाहींत, अथवा सतत दोन दिवस एके ठिकाणीं राहून त्यानें विश्रांतिही घेतली नाहीं. विश्रांति घेण्याचें त्याचें ठिकाण एक असलें तर भोजनाचें ठिकाण तेथून दोन कोस तरी असावयाचेंच. तो ज्या ठिकाणीं विसावा घेई, ज्या ठिकाणीं जेवी, व ज्या ठिकाणीं बसे, तें ठिकाण सोडून जातांना मागें आपली कांहींही खूण राहूं न देण्याची खबरदारी घेत असल्यामुळें त्याचा शोध लागणें अत्यंत मुष्किलीचें होई. एका जिल्ह्यांत तो फार दिवस राहत नसे व एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जावयाचें ह्मणजे चपल हरणाप्रमाणें तो झटकन् निघून जाई. या भागांतील बहुतेक भिल्लांशीं त्याची मैत्री असे.व ते भिल्लही त्यास चांगलें साह्य करीत. प्राणापेक्षांही जास्त विश्वास ते त्यास देत व पोलिसची हालचाल कळली कीं ते त्यास कळविल्यावांचून रहात नसत.

पहातां पहातां १८८१ सालही संपलें, पण तात्या सांपडला नाहीं; तेव्हां इंग्रजी पोलिस व होळकरी पोलिस एकत्र होऊन त्यांनीं एकमतानें तात्यास पकडण्याचा दृढ निश्चय केला; व मोठ्या उल्हासानें ते काम करूं लागले. डिटेक्टिव इन्स्पेक्टर शेरअली, गोकुलराय, नाथूखां यांनीं त्यास धरण्याकरितां नाना क्लृप्त्या काढण्यास सुरवात केली व वरिष्ठ अधिकारीही खालच्या अधिकाऱ्यांचे कामावर विशेष लक्ष्य पुरवूं लागले.

सतरावा परिच्छेद.

तात्यास पकडण्याचा दीर्घोद्योग सन १८८२.

दौलिया व हिऱ्या यांस काळ्यापाण्याची शिक्षा झाल्याचें ऐकून तात्या होळकर इलाख्यांत जाऊन स्वस्थपणें कांहीं दिवस राहिला; तथापि खरगा गांवांतील त्या न्हाव्यास तो विसरला नव्हता. अद्यापिही तो न्हावी आपल्यासंबंधानें बातम्या पोलिसास देतो, असें त्यास यावेळीं समजलें; तेव्हां तो जून महिन्यांत एके दिवशीं आपल्या लोकांसमवेत त्या न्हाव्याच्या घरीं जाऊन पोंचला. तो न्हावी त्यावेळीं घरांत नव्हता, तेव्हां त्याच्या मुलास घेऊन तात्या जंगलांत निघाला. तीन दिवसांनंतर तो सातपुड्यांतील गावलीनामक गांवीं गेला व तेथें एका मित्राचे घरीं भोजन करून त्यानें विश्रांति घेण्याचा विचार केला. न्हाव्याचा मुलगा यावेळीं तात्याच्या सांथीदारांपैकीं एकाच्या ताब्यांत होता. तो साथीदार पुष्कळ दिवसांच्या चालण्याच्या श्रमानें थकून जाऊन झोंपीं गेला होता; ही संधि साधून तो न्हाव्याचा मुलगा तेथून पळून गेला.

इकडे न्हावी बाहेरून घरीं येतो तों त्याला समजलें कीं, दरवडेखोरांनीं आपल्या मुलास पळवून नेलें. लागलीच त्यानें त्याची वर्दी पोलीसठाण्यांत दिली; तेव्हां पोलीस त्याचा तपास करण्याकरितां निघाले. दरवडेखोर कोणत्या रस्त्यानें गेले, याचा तपास लावून पोलिस त्या मार्गानें गेले; पण कोणत्याही प्रकारचा तपास न लागतां ते सर्व परत आले.

आठ दहा दिवसांनंतर न्हाव्याचा मुलगा परत आपल्या गांवीं आला व त्यानें पोलिसांकडे जाऊन सर्व वृत्तांत सांगितला. दरवडेखोरांनीं त्यास कसें पकडून नेलें, ते कोणत्या मार्गानें गेले; ते कोठें कोठें व कसे कसे फिरत होते व तो मुलगा पळून कसा व कोठून आला या सर्व गोष्टी पोलिसांनीं समजून घेतल्या. दरवडेखोर ज्या ज्या मार्गानें गेले व ज्या ज्या ठिकाणीं गेले, ते मार्ग व तीं ठिकाणें त्या मुलास बरोबर घेऊन पोलिस धुंडाळूं लागले. त्या न्हाव्याच्या मुलाच्या सांगण्यावरून असें कळून आलें कीं, तात्या आपल्या लोकांसह प्रथमतः त्या गांवांतून बाहेर पडून जिल्ह्याच्या ठाण्याकडे वळला. अशा तऱ्हेनें दहा मैल चालून गेल्यावर तो दक्षिणेकडे वळला व सातपुड्याकडे थेट निघाला. रहसनकार गांवाच्या जवळ तात्या आपल्या सर्व लोकांस सोडून गावांत गेला व शिधासामग्री घेऊन परत आला. तेथें जेवण खाण करून पुढें निघाला व सूर्योदयाला सातपुड्याजवळ जाऊन तेथेंच मुक्काम केला.

सायंकाळीं तो सर्व लोकांसह पुढें गेला व कालमकर गांवाजवळ त्यानें मुक्काम केला. आदले दिवसाप्रमाणें याही दिवशीं तात्यानें एकट्यानेंच शिधासामग्री आणिली. नंतर सातपुड्यांतील जंगलांत शिरून बऱ्हाणपूर व खलदिया या दरम्यानचे सडकेनें तो बोरगाजवळील पहाडांत पोंचला व तेथून, राजहोलनजवळ रेल्वेचा रस्ता ओलांडून तो पुनरपि सातपुड्याकडे परत फिरला. तेथें दोन दिवसपर्यंत त्यानें विश्रांति घेतली; व अखेर तो गावली येथें पोंहचला; व तेथूनच तो न्हाव्याचा मुलगा पळून आला.

न्हाव्याचा मुलगा फरारी झाल्याचें ऐकल्याबरोबर तात्यानें जंगलाचा आश्रय केला; मात्र तो कोठें गेला हें कांहींच कळलें नाहीं.

पोलिस लोक त्या न्हाव्याच्या मुलास बरोबर घेऊन वरील सर्व ठिकाणीं गेले; पण तात्याचा अथवा त्याच्या सांथीदारांचा कांहींच थांग लागला नाहीं; तेव्हां तात्या ज्याचे घरीं उतरला. जेवला व त्यानें जेथून शिधासामग्री आणिली, त्या लोकांची ते चौकशी करूं लागले. रहसनकार व कमलकर या गांवांत शिरून पोलिसांनीं चौकशीस सुरुवात केली. घरन् घर टिपून काढण्यास त्यांनीं सुरुवात केली; तात्यास आश्रय कोणी दिला. व त्यास भोजनसामग्री कोणी पुरविली याचा बारकाईनें तपास त्यांनीं केला; पण व्यर्थ! कांहीं एक सुगावा त्यांस लागेना! तेव्हां त्यांनीं त्या गांवांतील लोकांना धाकदपडशा दाखविला. त्या गावांतील लोकांच्या वर्तनाबद्दल वरिष्ठ कामदारांकडे त्यांनीं रिपोर्ट केले; गांवांतील लोकांवर लक्ष्य ठेवण्याकरितां त्या रिपोर्टाप्रमाणें जादा पोलिस नेमण्यांत आले; त्याचा खर्च गांववाल्यांवर बसविला; सारांश, तात्याला साह्य करणाऱ्या दोन तीन इसमांकरितां त्या सर्व गांवास प्रायःश्चित्त भोगावें लागून पोलिसचा द्वेष संपादन करावा लागला.

वर सांगितल्याप्रमाणें वरील दोन्हीं गांवांत व्यवस्था करून पोलिसचा मोर्चा गांवलीकडे वळला. त्या गांवांतील ज्याचे घरीं तात्या उतरला होता, ज्याचे घरांतून तो न्हाव्याचा मुलगा पळून गेला होता, त्यास पोलिसानें पकडून मॅजिस्ट्रेट-पुढें उभें केलें व तात्यास साह्य करण्याच्या अपराधाबद्दल मॅजिस्ट्रेट साहेबांकडून त्यांस ६।६ महिन्यांची शिक्षा झाली.

इतके दिवस कायद्याप्रमाणें पोलिस लोक वागत; पण कायद्याचा समतोलपणा कायम ठेविल्यास तात्या सांपडणें शक्य नाहीं, असें समजून त्यांनीं ती आशा सोडिली; व उग्र स्वरूप धारण करून ते वागूं लागले. तात्याचे नातलग आप्तस्वकीय जेथें होते, ज्यांचा तात्याबरोबर कांहीं संबंध आहे असें कळलें, ज्यांनीं तात्याबरोबर काम केलें आहे असें समजलें; सारांश, तात्याशीं थोडाफार संबंध असलेले लोक जेथें जेथें होते, तेथून त्या सर्वांस इंग्रजी पोलिस व होळकरी पोलिस खांडव्यास जमा करूं लागले. त्यांना बक्षिसाची आशा दाखवून अथवा धाकदपटशा देऊन तात्याचा शोध लावण्याचा प्रयत्न जारीनें सुरू झाला; तेव्हां तात्याच्या आप्त स्वकीयांनीं आपसांत असें ठरविलें कीं, एकट्या तात्याकरितां आपणांसर्वांनीं हा त्रास सोसण्यापेक्षां सर्वांनीं मिळून तात्याला धरून देण्याचा निश्चय करावा. पोलिसांना ती गोष्ट मान्य होऊन जमविलेल्या सर्व लोकांतून तात्याचा शोध करण्याकरितां वीस लोक निवडले व बाकीच्यांना सोडून दिले.

ते वीसजण मनापासून तात्यांचा शोध करूं लागले. बराच शोध केल्यावर त्यांस असें कळून आलें कीं, होळकरइलाख्यांत तिनसिया गांवीं तात्या फक्त आपल्या एका सांथिदारासह रहात आहे. लागलींच ते तिकडे गेले व त्या भागाच्या मालगुजारास सर्व हकीकत सांगून तात्यास पकडण्याचे कामीं त्यांनीं त्याचें साह्य मागितलें. मालगुजारानें साह्य देण्याचें कबूल करून लोक जमा केले व तात्या रहात होता त्या गांवाकडे ते सर्वजण निघाले; पण त्या गांवाच्या

नजीक जाऊन पाहिलें तों बरोबर मालगुजार नाहीं. तो मागल्यामागेंच कोठें एकाएकीं नाहींसा झाला. तो मालगुजार स्वतःच्या प्राणाच्या रक्षणाकरितां ह्मणा अथवा तात्याशीं त्याचा स्नेह होता ह्मणून ह्मणा; तो त्या लोकांस सोडून झपाट्यानें पुढें जाऊन दुसऱ्याच वाटेनें तात्यास जाऊन भेटला व पुढें येणाऱ्या आपत्तीची त्यानें त्यास वर्दी पोंचविली.

तात्याला हें कळतांच तो आपले सांथीदारांसह तेथून पळाला. तो पळून चालला असतां त्यांच्या विरुद्ध पक्षांतील कित्येक लोकांनीं त्यास पाहिलें व ते त्याचा पाठलाग करूं लागले, पण व्यर्थ, तो सांपडला तर नाहींच; पण तो कोणी-कडे एकदम नाहींसा झाला हेंही न कळून त्यास धरण्यास आलेले लोक निराश होऊन परत आले.

मालगुजारानें या कामीं विश्वासघात केला हें बाहेर येऊन त्यावर खटला करण्यांत आला; पण होळकरसरकारानें त्यास सोडून देऊन ताकीद दिली कीं, एका महिन्यांत जर तात्या न सांपडेल तर तुह्मांस धरून शिक्षा करण्यांत येईल.

पहातां पहातां एक महिना संपला; पण तात्याचा पत्ता लागला नाहीं; तेव्हां त्या मालगुजारास पुनरपि धरिलें; पण महाराजांनीं त्यास सोडून दिलें. मालगुजारावर इतकी दया करण्याचें महाराजांस काय कारण होतें हे कळलें नाहीं; पण मालगुजाराची सर्व संपत्ति जप्त करण्यांत आली. तेव्हां आतां त्यास शिक्षा देण्यांत अर्थ नाहीं असें समजूनच महाराजांनीं त्यास सोडून दिलें असावें असें अखेर ऐकण्यांत आलें.

अठरावा परिच्छेद.

हिऱ्याच्या खुनावर तात्याचा सूड.

हिऱ्या व दौलिया यांचा खटला न्यायकोर्टांत चालू असतां त्यांचे विरुद्ध हेमगिरि गांवच्या कांहीं लोकांनीं साक्ष दिली. व त्यांच्या साक्षीवरच अरोपींस जन्मठेप (काळेपाण्याची शिक्षा) देण्यांत आली होती.

ता. १६ डिसेंबर रोजीं आरुदगांवच्या एका पोलीस अम्मलदारास तात्या आपल्या टोळीसह सातपुड्यांतील हिरापुर गांवीं आला असल्याबद्दची बातमी समजली. त्याबरोबर तो कांहीं लोक बरोबर घेऊन तात्याला पकडण्याकरितां हिरापुरीं जाऊन पोंचला, पण तेथें तात्या अथवा त्याचे साथीदार आहेत अशाबद्दल कांहींच बातमी न मिळाल्यामुळें तो पोलिस शिपाई परत आण्यास निघाला, तोंच एकाएकीं लांबवर कोठें तरी भयंकर आग लागली आहे असें त्यास दिसलें. ही आग कोठें लागली असावी. याचें अनुमान करितां असें कळून आलें कीं, हेमगिरीगांवीं ती आग लागली असावी. तो शिपाई बरोबरच्या लोकांसह त्या गावांकडे त्वरेनें निघाला. त्या गांवाजवळ जातात तों तो सर्व गांव पेटला असल्याचें त्यास दिसून आलें. ज्वाला व ठिणग्या चोंहोंकडे पसरल्या असून धुरानें तर सर्व गांव अगदीं भरून गेला होता. जणुं काय ब्रह्मदेवानें रागावून त्या सर्व गांवाचा वृक्षांसह स्वाहा करण्याची प्रतिज्ञा केली आहे. सर्व गांव धडधड पेटला असूनही आग कमी होण्याचीं कांहीं

चिन्हें दिसत नसल्यामुळें ब्रह्मदेवाचा राग व त्याची क्षुधा लवकर शांत होईल असें वाटलें नाहीं. ब्रह्मदेवाच्या या भयंकर कोपानें चिंतित व भयभीत होऊन पोलिस अंमलदार बरोबरच्या लोकांसह हेमगिरी गांवांत शिरला. तलवारी व बंदुका घेऊन आणखीही कित्येक रजपुतांनीं त्यास मदत केली. गांवांत शिरून पहातात तों दरवडेखोर प्रत्येक घरांत शिरून त्यांतील माल लुटून घरांस आग लावीत आहेत असें त्यांना दिसलें. पहातां पहातां सर्व गांव जळून भस्म झाला. तो भयंकर प्रकार पाहून रजपुतांचें गरम रक्त जास्त गरम झालें व त्यांनीं दरवडेखोरांवर मोठ्या धैर्यानें चाल केली; व ते त्यांजवर गोळ्यावर झाडूं लागले. तात्या जर तेथें उभा आहे तर त्याचे सांथीदार त्या बंदुकीच्या गोळ्यांस कसचे भितात? तेही बंदुका घेऊन रजपुतांवर धांवले! दोन्ही बाजूंनीं गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला; व दोन्ही बाजूंचे लोक आपापला पराक्रम दाखवूं लागले. अशा प्रकारें कांहीं वेळपर्यंत त्यांची लढाई झाल्यावर रजपुतांचा पुढारी जव्वरसिंह याच्या शरीरांत एका दरवडेखोरानें मारलेली गोळी इतक्या जोरानें घुसली कीं, तो गोळी लागल्याबरोबर चक्कर येऊन धाडकन पडला व शस्त्रांनीं सुसज्जित असलेला वीर जव्वरसिंह त्या भूलिशय्येवर वीरवेषासहित महानिद्रेंत निमग्न झाला! जव्वरसिंह पडलेला पहातांक्षणीं त्याचे पक्षाचे लोक अत्यंत भयभीत होऊन आपला प्राण घेऊन पळून गेले आणि तात्याही याप्रमाणें विजय प्राप्त करून त्या गांवांतील यथास्थित लूट मिळवून आणि त्या गांवास अग्नीच्या भक्षस्थानीं देऊन तेथून चालता झाला.

हिरापुरगांव वर सांगितल्याप्रमाणें भस्मीभूत झाल्यावर बोरगापोलिसठाण्यांतील लोक तांत्यास पकडण्याकरितां त्या ठिकाणीं येऊन पोंचले. परंतु, पहातात तो जबरसिंहाचें प्रेत तेथें पडलें असून दरवडेखोर मुळींच नाहींत. ते कोणीकडे गेले हें कळलें नाहीं व त्यांचा पाठलाग करण्यासारखें कांहीं साधनही मिळालें नाहीं. ज्याप्रमाणें मोठ्या थोरल्या पाण्याच्या डोहांत माशांचा जाण्याचा मार्ग दिसत नाहीं, त्याप्रमाणें त्या घनदाट जंगलामध्यें तात्या कोणीकडून गेला हें उमजलें नाहीं. मात्र त्या गांवासभोंवतालच्या चार पांच कोस प्रदेशांतील कोल्ह्यांची दाणादाण करून पोलिस लोक मोकळ्या हातानें परत आले.

ज्याप्रमाणें नाटकगृहामध्यें हृदयास चटका लावणारें नाटक पहाणारांच्या हृदयपटावर त्या नाटकाचें चित्र कांहीं दिवसपर्यंत उमटलेलें राहतें, त्याप्रमाणें १६ दिसेंबर रोजीं झालेला प्रकार तात्याच्या हृदयपटावर कांहीं दिवसपर्यंत उमटलेला राहिला. इ. स. १८८१ च्या १६ डिसेंबर रोजीं हिऱ्या पकडला गेला व संन १८८२ च्या १६ दिसेंबर रोजीं ह्मणजे बरोबर एक वर्षानें तात्यानें त्याचा सूड घेतला. ह्मणजे ज्या लोकांनीं दौलिया व हिऱ्या यांच्या विरुद्ध साक्षी दिल्या, त्यांचा तात्यानें सत्यनाश केला; त्यांचें घरदार लुटलें व अखेर त्यांस आगही लावून दिली.

पहातां पहातां आणखी एक वर्ष निघून गेलें. तात्याला पकडण्याकरितां किती द्रव्य खर्चीं पडलें, किती प्रयत्न व्यर्थ झाले, किती मनुष्यें तिरस्कारास पात्र झालीं, किती एक गांवांची राखरांगोळी झाली; पण तात्या सांपडला नाहीं. ब्रिटे-

क्टिव्ह इन्स्पेक्टर नाथूखा इतका चतुर असतांही त्यास पकडूं शकला नाहीं, त्याचे विचार व यत्न व्यर्थ झाले; तथापि सरकारानें त्याची मानमान्यता केली. जरी तात्या सांपडला नाहीं, तरी इंग्रजी पोलिसइन्स्पेक्टर नाथूखा व होळकरसरकारचे कप्तान नंसासिंह यांनीं तात्यास आश्रय देणाऱ्या, भोजन देणाऱ्या, त्यास बातम्या देणाऱ्या; सारांश, त्यास हरएक प्रकारें साह्य करणाऱ्या अशा ३० लोकांस एकेक मिळून एक वर्षांत पकडून मॅजिस्ट्रेटपुढें उभे केले; व मॅजिस्ट्रेटनें त्यांस पुरावा नाहीं म्हणून सोडून दिलें; तथापि त्यामुळें सरकारांत त्याची चहा कमी झाली असें नाहीं; तर उलट त्यांच्या बहादुरीची प्रशंसाच झाली. या बहादुरीमुळें ते तात्यास पकडण्याच्या कामीस जास्तच जोरानें लागले.

एकोणिसावा परिच्छेद.

तात्या चातुर्यानें पोलिसांस ठकवितो सन १८८३.-

ता. १६ डिसेंबर १८८२ रोजीं तात्यानें हिरापूर गांव भस्मीभूत करून व एक खून करून घेतलेल्या सुडानें त्या प्रदेशांतील लोक किती भयभीत झाले, तें सांगतां येत नाहीं. त्या पेटलेल्या आगींत तात्या व त्यांचे साथीदार यांचें प्रबल पराक्रमयुक्त भयानक चित्र ज्यांनीं ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांच्या मनांतून ती गोष्ट आजन्म गेली नसेल. तात्याचा घोर पराक्रम त्यांच्या सतत लक्ष्यांत राहिला असला

पाहिजे. या भयंकर गोष्टीनंतर कांहीं दिवसांनीं ह्मणजे जानेवारीमध्यें तात्यानें इलिचपुर (वऱ्हाड) जिल्ह्यामध्यें मेळवाटांत दोन दरवडे घातले.

नेमाड जिल्ह्यांतील रोहिणी गांवीं एक मालगुजार रहात असे. त्याचा मिल्लांशीं कांहीं संबंध असे, या कारणानें तात्यासंबंधीं अनेक बातम्या त्यास समजत असत व त्या तो वेळोवेळीं पोलिसांस कळवीत असे. पोलिस लोक यामुळें त्यावर खुष असत व सरकारामध्येंही त्याची प्रतिष्ठा असे. या सर्व गोष्टी दरिद्रीपोषक तात्याला कळल्यावांचून राहिल्या नाहींत. त्या त्यास कळल्याबरोबर तात्यानें त्या मालगुजारास पकडण्याकरितां त्याचे घरावर १६ फेब्रुवारी रोजीं दरवडा घालण्याचा बेत केला. हा बेत मालगुजारास कळून त्यानें त्याची वर्दी पोलिसांस दिली; मात्र भीतीमुळें तो त्या दिवशीं आपले घरीं न रहातां दुसऱ्या ठिकाणींच राहिला. पोलिस लोकांनीं मालगुजाराच्या घरांत लपून दरवडा घालण्यास आल्यावर आयताच तात्याला पकडण्याचा विचार केला. पोलिसांचा हा विचार तात्यासही कळला; परंतु, मालगुजाराच्या घरावर दरवडा घालण्याचा त्यानें केलेला बेत न फिरवितां तो ठरलेल्या दिवशीं दरवडा घालण्यास आपल्या लोकांसह निघाला.

मालगुजाराच्या घरांत पोलिस दडून बसले आहेत, त्यांना फसवून त्या घरावर दरवडा घातला पाहिजे, हा विचार करून तात्यानें रोहिणी गांवांत हूल उठवून दिली कीं, तात्या आज रोहिणी गांवापासून कांहीं मैल दूर असलेल्या एका गांवीं एका श्रीमान् सावकाराच्या घरावर दरवडा घालण्याकरितां

तिकडे गेला आहे. पोलिसांच्या कानीं ही गोष्ट पडतांच ते मालगुजाराचें घर सोडून तात्यास धरण्याच्या हेतूनें त्या सात-काराच्या गांवीं निघून गेले; पण तेथें त्यांना तात्या व त्याचे सांथीदार यांचेसंबंधीं कांहींसुद्धां वार्ता कळली नाहीं.

इकडे तात्या आपल्या लोकांसह त्या गांवाकडे जाण्याचा रोख धरून निघाला व एकदम वळसा घेऊन दुसऱ्याच मार्गानें रोहिणीगांवांत आला. ज्यावेळीं पोलिसांनीं त्या मालगुजाराचें घर सोडलें, त्यानंतर थोड्याच वेळानें तात्या आपले लोकां-सह मालगुजाराच्या घरांत शिरला. मालगुजार तेथें सांपडला नाहीं, तेव्हां त्याचें सर्वस्व लुटून व त्याचे घरास आग लावून तात्या लागलीच तेथून निघून गेला. पोलिसांना ही फटवणूक कळतांच ते त्याच पावलीं रोहिणी गांवीं परत आले; पण तेथें त्यांना काय दिसलें? मालगुजाराच्या घराची रक्षा झाली असून त्याचे कुटुंबांतील सर्व मंडळी तेथें रडत बसली आहे व दरवडेखोरांचा मागमूसही नाहीं, एवढेंच त्यांनीं तेथें पाहिलें.

पोलिस लोकांस अशा प्रकारें चाळवणी दाखवून तात्यानें आपला बेत सिद्धिस नेला. तात्याच्या चाळवणींत सांपडून पोलिस अधिकाऱ्यांनीं तात्याला धरण्याचा सुप्रसंग दवडला. तात्याला धरण्याचें जें मनोराज्य त्यांनीं केलें होतें, तें तोडलेल्या वृक्षाप्रमाणें उन्मळून पडलें. तेव्हां त्यांनीं चिडून जाऊन सर्व नेमाड जिल्हा तात्याच्या शोधास्तव पालथा घातला; पोलिसची चौकशी झाली नाहीं, असा एकही गांव राहिला नाहीं. पोलिस शिरले नाहींत असें घर राहिलें नाहीं, जंगलामध्यें पोलि-सांच्या दृष्टीखालून वृक्षवेली चुकून सुद्धां राहिल्या नाहींत, व कोपऱ्याही पहाडांत पोलिसांच्या पायाची धूळ झडल्यावांचून

राहिली नाहीं. परंतु, तात्याचा पत्ता लागला नाहीं; अथवा त्याच्या साथीदारांपैकींही कोणी सांपडलें नाहीं ! !

होळकर सरकारानेंही तात्याला पकडण्याचे कामीं या वेळीं इंग्रजांस पुष्कळ साह्य केलें. आपले तैनातींतील प्रसिद्ध व सुयोग्य अधिकारी महम्मदखां याची या कामीं नेमणूक केली. महम्मदखानें नेमाडजिल्ह्याप्रमाणें होळकरइलाख्यांतही चौकशी करण्यास सुरवात केली. तात्याला मदत करणारांना त्रास देण्यास आरंभ झाला, व त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाचा नाश करून त्यास होळकर इलाख्याच्या बाहेर पळून जाण्यास भाग पडलें हा प्रकार पाहून सर्वजण असें ह्मणूं लागले कीं, जोंपर्यंत इंग्रजी कामदार व महमदखां असाच प्रकार करीत राहतील.तोंपर्यंत तात्या अथवा त्याचे साथीदार या प्रदेशांत येणारसुद्धां नाहींत व कोणीही मनुष्य त्यास कसल्याही प्रकारचें साह्यही देणार नाहीं; तर उलट बातमी कळतांच ती पोलिसांस कळविली जाईल.

अशा प्रकारें तात्याला पकडण्याकरितां जेव्हां विशेष यत्न सुरू झाले; इकडे तिकडे धामधुम चालू झाली; तेव्हां कांहीं दिवस तात्या अगदीं गप्प बसला; व अखेर ज्या मेळघाटांतील दोन दरवड्यांच्या तपासांत पोलिस होते, त्याच मेळघाटांत जाऊन ता. २६ मे रोजीं तात्यानें दारावारनी गांवांत आणखी एक दरवडा घातला. पोलिसानें या दरवड्याचाही पत्ता पडण्याकरितां बतहु यत्न केला; पण त्यापासून कांहीं फलप्राप्ति झाली नाहीं. पोलिस तात्याला पकडण्याचा उद्योग जसजसा जास्त करूं लागत, तसतसा तात्या चवताळल्याप्रमाणें पोलिसांस फसवून दरवडे घाली. एके दिवशीं एका-

एकीं तो जारगांवीं गेला व तेथें लुटालुट करून चालता झाला.

ता० २० जुलै रोजीं तात्या आपल्या टोळीसह शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन बरसराई येथील पोलिसठाण्यांसमोर येऊन उभा राहिला. तेथें एका मालगुजाराचें घर होतें, त्यांत शिरून त्यानें कांहीं लूट मिळविण्याचा विचार केला. मालगुजार घरांत नव्हता. त्याची बायको आपल्या दागिन्यांसह तात्यासमोर येऊन ह्मणूं लागली— " यजमान घरांत नाहींत व मजजवळ तर पैसाही नाहीं; तेव्हां मजजवळ हे जे कांहीं दागिने आहेत, ते आपण घेऊन जावें. " मालगुजाराच्या बायकोचें तें भाषण ऐकून व तिचा नम्रपणा पाहून तात्या फार खुष झाला व तिच्याजवळून कांहीं न घेतां पोलिस ठाण्यासमोरच्या रस्त्यानें तो सावकाश निघून गेला.

ता० २७ जुलई रोजीं तात्या बडपानी गांवीं पोंचला; तेथं पोलिस त्याच्या मागोमाग तपासाकरितां आले, त्याबरोबर तात्या ४ आगष्ट रोजीं झारपा गांवीं जाऊन पोंचला; तेथेंही पोलिस त्याचा पाठलाग करीत आले; तेव्हां ता० १० सपटंबर रोजीं तो केलिगावीं गेला व तेथें त्यानें भयंकर दरवडा घातला. पोलिस तेथेंही त्याच्या मागोमाग आले व तपास करूं लागले. तों दुसरे दिवशीं भर दोनप्रहरीं गोटीगांवीं तात्यानें दरवडा घातल्याची बातमी त्यांस मिळाली. याप्रकारें एका गावाहून दुसऱ्या गांवीं व दुसऱ्यांहून तिसऱ्या ठिकाणीं पोलिस तात्याच्या शोधांत आहेत व तात्या त्यांच्या पुढच्या गांवीं दरवडा घालीत आहे, अशी ससेहोलपट कितीएक दिवस चालूं राहिली; पण तात्या सांपडला नाहीं.

विसावा परिच्छेद.

तात्यामुळें कित्येक गांवदाल्यांवर आलेलीं संकटें.

धमाजीपुरानामक गांवीं दादू पाटील नांवाचा एक गृहस्थ रहात असे. तो तेथील एक प्रसिद्ध व प्रतिष्ठित जमीनदार होता. त्या प्रदेशांतील सर्व लोक त्याच्या आज्ञेंत वागत व त्यांस चांगला मान देत. तो मनांत आणील तर तात्यासंबंधीं सर्व बातमी त्यास लागेल; इतकेंच नव्हे तर तात्याला तो सहज पकडूंही शकेल, असें त्या ठिकाणच्या पोलीस अधिकाऱ्यास वाटून तो जमीनदार दादू पाटील याचे घरीं गेला; व त्यास कांहीं समजुतीच्या गोष्टी सांगून व कांहीं लालुच दाखवून पोलिसांस साह्य करण्याबद्दल त्यानें त्यास विनंति केली. दादू पाटील पोलिसच्या विनंतीस मान देऊन तात्याला पकडण्यास तयार झाला. तात्याचा तपास जारीनें सुरू झाला; पण त्या तपासाचें फळ मिळालें नाहीं; ह्मणजे तात्या सांपडला नाहीं. तो कां सांपडला नाहीं, कसा सांपडला नाहीं, इत्यादि अनेक गोष्टींची चर्चा सुरू होऊन दादू पाटलावर दोषारोप करूं लागण्यास सुरुवात झाली.

पोलीस अधिकारी तात्याला पकडण्याचा यत्न जसजसा जास्त जास्त करूं लागले, तसतसा तात्या जास्त दरवडे घालण्यास तयार झाला. वर सांगितलेल्या दरवड्याशिवाय तात्यानें वेडपानि येथें दरवडा घातला. पोलिस लोक चोकशी करण्यास त्यागांवीं आल्याबरोबर तो खातिगांवीं पोंचला; व तेथून विक्रमपुरास दरवडा घालण्याचा त्यानें बेत केला व अखेर

१० दिसेंबर रोजीं मेळघाटांतील खरीदागांवीं दरवडा घालून त्यानें पोलिसास हात चोळण्यास लावलें. यानंतर वीरपुरा व मोटा येथेंही त्यानें एकेक दरवडा घातला. अशाप्रकारें तात्याची कारवाई पाहून सर्व जण चिंताग्रस्त झाले, पोलिस लोक मोठ्या विचारांत निमग्न झाले, पोलिसांपैकीं कोणांस दुसऱ्या कामावर नेमिलें, कोणांस बदलून टाकिलें व कोणाचा अधिकारही कमी केला. जे बाकी राहिले व जे नवीन आले तेही तात्याच्या कृत्यानें सतावून जाऊन चिन्तासमुद्रांत कष्टमय गटकळ्या खाऊं लागले.! !

तात्याच्या या सततच्या दरवड्यानें दुसऱ्या दरवडेखोरांस आपलें काम करून घेण्यास चांगली संधि मिळाली. कोणी तोतया तात्या बनून व कोणी तात्याच्या नांवाचा पुकार करून लोकांस लुटूं लागले. जिकडे तिकडे लुटालुट आणि दरवडे याशिवाय दुसरें कांहींच ऐकूं येईना. सर्व लोक मोठ्या काळजींत पडले. आपलें, आपल्या कुटुंबाचें, आपल्या वित्ताचें व आपल्या घरादाराचें संरक्षण कसें होईल, या चिंतेनें अगदीं व्याकुळ झाले.

या सुमारास दीनानाथ नांवाचा एक पोलिसइन्स्पेक्टर तात्याच्या शोधास तयार होऊन पुढें आला. कित्येक वर्षें या कामांत पडून जे निराश होऊन मागें सरले व सरकारच्या अवकृपेस पात्र झाले, त्यांच्या स्थितीचा विचार करून दीनानाथ तनमनेंकरून तात्यास पकडण्याचा उद्योग करूं लागला. अनेक स्थळें व अनेक गांवें हिंडतां हिंडतां त्याला असें कळलें कीं, तात्या बरेच दिवसपर्यंत पाताजन गांवाचे जवळ रहात होता, पण आतां तेथून कोठें दुसरीकडे निघून

गेला आहे. दीनानाथास ही बातमी कळल्यावर तो तेथें राहिला नाहीं. त्यानें त्या ठिकाणच्या आसपास असलेल्या सर्व गांवास त्राहि त्राहि करून सोडण्याचा निश्चय केला. जमीनदार, प्रजा, श्रीमंत, दरिद्री, सुखवस्तु, शेतकरी इत्यादि सर्व लोक दीनानाथाच्या विपदृष्टीखालीं आले. तात्या-संबंधी कांहींही बातमी इतके दिवस पोलिसला न देण्याच्या अपराधाबद्दल सर्वांस पकडून त्यानें मॅजिस्ट्रेटाकडे पाठविलें. मॅजिस्ट्रेटनेंही आपले असाधारण विचार व साक्षिदारांचें सांगणें यावर भरंवसा ठेवून सर्वांस सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावल्या.

या लोकांमध्यें मंगलनामक एका मनुष्यास शिक्षा झाली. मंगलच्या विरुद्ध फारसा पुरावा नव्हता, पण कन्हईकुरकु नांवाच्या एका मनुष्याच्या साक्षीवरून मॅजिस्ट्रेटानें त्यास शिक्षा दिली. आपणांस शिक्षा झालेली पाहून कन्हया हंसत हंसत चालला आहे हें मंगलच्या दृष्टीं पडल्याबरोबर तो आपला सर्व अपराध कबूल करून इन्स्पेक्टर दीनानाथ यांस ह्मणाला:— "तात्यासंबंधी बातमी पोलीसास न देण्याचा अपराध मीं केला आहे, यांत शंका नाहीं व त्याबद्दल मला शिक्षाही झाली आहे; पण ज्या कन्हयानें सभ्यगृहस्थाप्रमाणें येऊन प्रतिष्ठितपणें माझ्याविरुद्ध साक्ष दिली आहे, तो माझ्या-पेक्षां शतपट अपराधी आहे. तात्यासंबंधीं बातमी पोलीसास न देण्याचा अपराध मीं केला आहे; परंतु, त्या दुष्टानें तात्याच्या टोळींत सामील होऊन औसकालीगांवीं दरवडा घातला व वाटेल तितकी लूट मिळविली.'

मंगलनें सांगितलेली ही गोष्ट दीनानाथास खरी वाटून

त्यानें कन्हय्यास लागलीच कैद केलें; कन्हय्यानें सर्व गोष्टी कबूल केल्या. तात्याच्या टोळींत आपण सामील कसे झालों, ओसकालीगांवीं दरवडा कसा घातला, दरवडा घालण्याच्या पूर्वी तात्या आपल्या टोळीसह कोठें राहिला होता, कोणत्या गांवांतील कोणत्या लोकांनीं तात्याची खाण्यापिण्यासंबंधानें बरदास्त ठेविली, वगैरे सर्व गोष्टी कन्हय्यानें दीनानाथास सांगितल्या; व चौकशी करितां त्या गोष्टी खऱ्या आहेत, अशी दीनानाथाची खात्रीही झाली. ज्या ठिकाणीं तात्या एक महिनाभर राहिला होता ह्मणून कन्हय्यानें सांगितलें तें ठिकाण दीनानाथानें समक्ष जाऊन पाहिलें; तेव्हां त्यास असें कळून आलें कीं, सदर ठिकाण जंगलांत अथवा पहाडांत नाहीं. तें एका गांवानजीक मनुष्यास राहण्यास योग्य असें स्थान असून पोलिसठाण्याच्या अगदीं समोर आहे. त्या ठिकाणीं यावेळींही तात्याचें राहण्याचें चिन्ह विद्यमान आहे. तात्यानें पोलिसांचा शेजार धरून अनेक ठिकाणीं दरवडे घातले; पण पोलिसांस त्यांसंबंधीं लेशमात्रही बातमी लागली नाहीं. पोलिसांचें बुद्धिसामर्थ्य व कार्यकौशल्य हेंच काय!

एकविसावा परिच्छेद.

तात्याचा ममताळूपणा.

तात्याला पकडण्याकरितां पोलीस जितका जास्त यत्न करूं लागले व आपली अब्रू न जाऊं देण्याचा त्यांचा उद्योग जसजसा जास्त होऊं लागला, तसतसें तात्याला पकडणें

कठीण होऊं लागलें. तात्याच्या टोळींत यावेळीं केवळ भिल्ल लोकच होते, असें नाहीं, तर आतां कोरकू व बंजारी लोकांनींही त्याची टोळी सजविली होती. पोलीसचा प्रयत्न इतका जारीनें सुरू असतांही तात्या सांपडत नसे, याचें मुख्य कारण असें होतें कीं, दरिद्री लोकांचा तात्या केवळ पिता होता. आपत्काळीं बापही आपल्या प्रिय पुत्रांस केव्हां केव्हां सोडून देतो; पण तात्याच्याहातून अशी गोष्ट झाल्याचें कोणीही सांगणार नाहीं. संकटकाळीं ज्यानें तात्याचा आश्रय केला, त्यास तात्यानें शक्य तितकी मदत केली. पतिपुत्रावांचून अनाथ झालेल्या स्त्रियांनीं तात्याची कृपा संपादन केली तर अन्नाकरितां त्यास मग कोणापाशींही तोंड वेंगाडण्याचा प्रसंग येत नसे, सावकारापासून ऋण काढण्यामुळें जर शेतकऱ्यास त्रास झाला अथवा कर्ज मिळण्यास त्यास अडचण पडली, तर तात्या कृपणाच्या धनाचा शोध करून त्यास मदत करी. दैवी आपत्तीमुळें एखाद्या शेतकऱ्याचा बैल मेला तर दुसऱ्या कोणाचा बैल त्यास आणून देऊन त्याची अडचण दूर करी. दुष्काळाचे वर्षीं शेतें बुडाल्यामुळें शेतकरी लोक कपाळावर हात मारून बसत व आपल्या कुटुंबाचा जीव कसा वांचतो, या काळजीनें चूर होऊन जात. त्यावेळीं त्यांना अन्नाची पंचाईत पडत नसे. तात्या कोठून तरी धान्य आणून त्यांस साह्य करीच. सारांश, कोणावर कांहीं संकट आलें व तो तात्याकडे गेला तर तात्या त्यास साह्य केल्यावांचून कधींही रहात नसे. श्रीमंत लोकांचे घरीं दरवडे घालून मिळविलेलें धन गरीबांकडे तो खर्च करी. कृपणाचें धन लुटन अनाथ व दुःखित लोकांमध्यें तो वाटीत असे. एके दिवशीं तात्याला

कळलें कीं, एका गांवीं एक श्रीमान् गृहस्थ रहात आहे व त्या गांवांतील सर्व लोक अत्यंत दरिद्री आहेत; व या वर्षी तर दुष्काळानें त्यांना अत्यंत ताप होत आहे; इतका कीं दोन दोन दिवस आपल्या कुटुंबासहित ते उपास काढीत आहेत. तो श्रीमान् गृहस्थ ही त्यांची विपत्ति पहात असूनही त्यांना मदत करीत नाहीं. ते गरीब लोक रडत रडत त्याच्या पायांवर डोकें ठेवून साह्य मागत असतां तो त्यांच्या दीन स्थितीकडे लक्ष्य देत नाहीं व त्यांच्या पोराबाळांच्या रडण्या-ओरडण्यानेंही त्याचें मन द्रवत नाहीं. ही बातमी कळतांच तात्या आपल्या सांथीदारांसह त्या धनवान् मनुष्याचे घरीं जाऊन पोंचला; व त्याचें सर्व धन लुटून त्याचा ढीग त्याच्या घरासमोर वाटून त्याच्या समक्ष गांवांतील सर्व लोकांस तें धन तात्यानें वाटून दिलें. अशा आपत्काळीं तात्यानें ही मदत केलेली पाहून ते लोक तात्याचा जयजयकार करीत आपल्या घरीं निघून गेले. तात्या निघून गेल्यावर त्या श्रीमान् गृहस्थानें ती बातमी पोलिसठाण्यास दिली, पोलिसांनीं दरवड्याच्या ठिकाणीं येऊन जें ऐकिलें व पाहिलें, त्यायोगें ते चकित होऊन गेले. दरवडेखोरांचा हा दयाळूपणा पाहून कोण मोहित होणार नाहीं. पोलिसांनीं या कामीं चौकशी ती काय करावयाची ? चोरीस गेलेला सर्व माल गांवांतच होता व तो मिळालाही; पण त्याबद्दल कोणाला कोणत्याही प्रकारची शिक्षा वगैरे झाली नाहीं. यानंतर त्या लोकांना तें वर्ष सुखाचें गेलें.

बालक, स्त्री व ब्राह्मण यांपैकीं कोणीही तात्याचा कसलाही अपराध केला, तरी त्याबद्दल तात्या त्यांच्यावर रागावत नसे. त्यानें किती बालकांचे लाड केले, किती स्त्रियांना संतुष्ट

केलें व किती ब्राह्मणांवर उपकार केले, याचें वर्णन कितीही केलें तरी संपणार नाहीं.

ओसकालीगांवीं दरवडा घालण्यास तात्या जात असतां गांवाच्या बाहेरच्या बाजूस त्यानें एक मुलगी पाहिली. ही मुलगी पाण्याची घागर डोक्यावर घेऊन गांवाकडे जात होती. त्यावरून तात्यास कळून आलें कीं, ही मुलगी कोणातरी गरीब मनुष्याची आहे. शस्त्रें घेतलेले लोक पाहून ती मुलगी भयभीत होऊन पळून जाऊं लागली; तेव्हां तात्यानें तिला आश्वासन देऊन आपल्याजवळ बोलाविलें. भीत भीत ती मुलगी तात्यापुढें येऊन उभी राहिली. तात्यानें तिच्याशीं कांहीं एक भाषण न करितां बरेचसे रुपये तिच्या पाण्यानें भरलेल्या घागरींत टाकले व तिला जाण्यास सांगितलें. मुलगी घागर घेऊन घरीं गेली. तेथें तिच्या आईस घागरींत बरेच रुपये सांपडले; तेव्हां मुलीस विचारतां तिच्या तोंडून साग्र हकीगत ऐकून आईस बहुत संतोष झाला. दरिद्री मनुष्याला एक पैसा मिळाला तर त्याला अपार आनंद होतो, त्यास एकदम जर बरेचसे रुपये मिळाले तर त्याच्या आनंदास पारावार रहात नाहीं हें निराळें सांगण्यास नकोच !

तात्या ओसकालीगांवीं शिरला, तेव्हां गांवांत एक लग्न मोठ्या थाटानें चाललें होतें. गांवांतील स्त्रिया दागदागीने घालून लग्नघरीं जमल्या होत्या. त्यांच्या अंगावरील त्या दागिन्यांची किंमत ४।५ हजार रुपयांपेक्षां कमी नव्हती. वाजंत्रें वाजत होतीं, इतक्यांत तात्या आपल्या साथीदारांसह तेथें जाऊन पोंचला. तें पाहून वाजंत्री भयभीत होऊन आपलीं हत्यारें घेऊन पळाले. बायकाही पळून जाण्याचा यत्न करू

लागल्या. सर्व लोक अगदीं गर्भगळित झाले. तें पाहून तात्यानें त्यांस धीर दिला; व तेथें बसून लग्नसमारंभ मोठ्या आनंदानें पहात बसला. त्यानें वधूवरांस पाहण्याची इच्छा दर्शविली. तेव्हां वरपिता व वधूपिता आपल्या लेंकरांस घेऊन तात्यापुढें भयभीत होऊन आले; तेव्हां तात्यानें आपल्या जवळील रुपयांनीं त्या वधुवरांच्या ओंजळी भरून तो तेथून चालता झाला.

ओसकाली व कापासी गांवीं तात्यानें दरवडे घातले, तेव्हां कित्येक स्त्रियांचा अपमान झाला यांत संशय नाहीं; पण ही गोष्ट तात्यास ठाऊक नव्हती. त्याच्या टोळींतील कांहीं निर्दय लोकांनीं जो गर्हणीय प्रकार केला होता तो तात्याच्या जेव्हां दृष्टीस पडला, व स्त्रियांचे करुणस्वर जेव्हां त्याच्या कानीं पडले, तेव्हां तो रागानें अगदीं संतप्त झाला; व स्त्रियांना छळणाऱ्या त्या निर्दय लोकांस त्यानें त्या स्त्रियांसमक्ष यथोचित शिक्षा देऊन त्या स्त्रियांचें समाधान केलें. स्त्रियांवर तात्याची कृपादृष्टि आहे, हें सर्व लोकांस कळलें व साधारण स्त्रियांच्या छलाबद्दल तात्यानें आपल्या सांथीदारांस चांगली शिक्षा केली हें पाहून सर्वांस मोठें कौतुक वाटलें.

तात्या एके दिवशीं जंगलांत भटकत फिरत असतां त्याच्या एका साथीदारानें एका मनुष्यास त्याच्यापुढें आणून उभें केलें. त्या मनुष्याजवळ १०० रुपये होते, ते त्या सांथीदारानें त्याजपासून आधींच हिसकावून घेतले होते. त्या मनुष्यास पाहिल्याबरोबर तो ब्राह्मण आहे असें तात्यानें ओळखलें. ब्राह्मणास त्रास दिल्याबद्दल तात्या त्या आपल्या

सार्थदासास अतीशय बोलला व ब्राह्मणाची क्षमा मागून त्याचे घेतलेले रुपये १०० व एक रुपया जास्त असे १०१ रुपये त्याच्या स्वाधीन केले. जंगलाच्या बाहेर पडेपर्यंत त्याच्या सोबतीस मनुष्य देऊन त्यानें त्याची रवानगी केली.

बाविसावा परिच्छेद.

तात्याचें एक पूर्वचित्र.

ज्या गुणांनीं तात्या मध्यप्रांतांतील दरिद्री लोकांस अत्यंत प्रिय झाला होता, ते गुण तो दरवडेखोर बनल्यामुळें लोप पावले. लहानपणापासून जे गुण त्याच्या हृदयपटावर चित्रित झाले होते, त्यांचीं उदाहरणें वारंवार घडून येऊं लागलीं. तात्या ज्या वेळीं शेती करून आपला उदरनिर्वाह करीत होता, त्यावेळच्या त्याच्या परोपकारबुद्धीचें एकच उदाहरण वाचकांची खात्री पटण्यास पुरेसें होईल.

ज्या प्रदेशांत तात्या राहत असे, त्या प्रदेशांतील शेतकरी पावसाळ्यामध्यें "कुटु" व "कुटकी" खातात. पावसाळ्यांत पोट भरण्यास त्यांना हेंच एक मुख्य साधन असतें. केव्हां केव्हां या प्रांतांत टोळांचा उपद्रव इतका होतो कीं, त्याचें वर्णन करतां येत नाहीं. टोळांची धाड एकदा एखाद्याच्या शेतावर बसली; म्हणजे त्या शेतांत कांहीं राहत नाहीं. टोळधाडीमुळें शेतांचा फडशा पडला तरी शेतकरी लोक फारसे दुःखीकष्टी होत नसत; व कोणी विचारिल्यास ते सांगत कीं, "टोळांनीं जो आमचा नाश केला आहे, त्याची भरती

तात्यामामा करून देईल. " या प्रदेशांतील शेतकऱ्यांस असें खात्रीनें वाटत असे कीं, आपणांस कसलीही अडचण आली तरी ती तात्या दूर करील. लोकांचा तात्यासंबंधानें इतका विश्वास असणें कमी महत्त्वाची गोष्ट नव्हे; व असा सहसा विश्वास उत्पन्न होणें सहज गोष्ट नव्हे. तात्या वास्तविकच तसा गुणी होता. त्यानें कोणालाही अन्नाचें कष्ट होऊं दिले नाहींत. तो कोणत्या तरी उपायानें भुकेलेल्यास अन्न देईच.

ज्या प्रदेशांतील ही कथा आह्मी सांगत आहों, त्या प्रदेशांत " मामू " " मामा " हा मोठा सन्मानदर्शक शब्द आहे; यामुळें त्या प्रदेशांतील सर्व लोक तात्यास " तात्या मामा ". " मामा " अशा बहुमानदर्शक नांवांनीं हाक मारीत असत.

त्या प्रदेशांतील लोक तात्याला इतके मानीत असल्यामुळें तात्याच्या टोळींत इतके लोक सामील झाले होते कीं, तो आंकडा सांगितल्यास कोणास खराही वाटणार नाहीं. ओसिकालीगांवचा दरवडा ४००० रुपये किमतीचा होता; त्याची तात्यानें जेव्हां वाटणी केली तेव्हां एकेकाच्या वांटणीस १० रुपयांपेक्षां अधिक कांहीं आलें नाहीं !! याचप्रमाणें दुसऱ्या एका दरवड्याच्या वाटणींत तर एकेकच रुपया एकेकाच्या वाटणीस आला होता.

तात्या जरी दरवडेखोर होता, तरी शिकारीचे कामांत तो मोठा तरबेज होता व त्याचा त्याला शोकही होता. जेव्हां तो शिकारीस जाई, तेव्हां शिकारीचे जंगलांत तो एक तंबू देवर्वी व शिकारींत मारलेलीं जनावरें तेथें शिजवून आसपास खेड्यांच्या लोकांस बोलावून आणून त्यांसह तेथें आनंदानें

जेवण करी. त्या प्रदेशांत प्रचलित असलेलीं प्रसिद्ध प्रसिद्ध गाणीं त्यास येत व नाचण्यांतही तो तरबेज असे. जेवण झाल्यावर तो आलापसहित मधुर गान करून सर्वांस तल्लीन करी व हावभावांसहित नाच करून सर्वांस प्रसन्न करी. सारांश, अशाप्रकारें मध्यें मध्यें शिकारीच्या निमित्तानें तो जरी सर्वांस संतुष्ट करी, तरी दरवडे घालण्याचें काम तो विसरे असें मात्र नाहीं.

पोलिसांचा तात्यास धरण्याचा उद्योग चालूंच होता. तात्याचे साहाय्यकर्ते ह्मणून त्यांनीं कित्येक लोक तुरुंगांत घातले; तथापि तात्यानें दरवडे घालण्याचें सोडून दिलें नाहीं. तर उलट जास्त जास्त दरवडे घालून तो पोलिसांस चिडवूं लागला. वर लिहिलेल्या दरवड्याखेरीज आणखीही कित्येक इंग्रजी व होळकरी गांवांत त्यानें एकामागून एक दरवडे घातले; पण माकराईराजाच्या भागांत एकही दरवडा पडल्याचें कानीं आलें नाहीं. यामुळें तात्या माकराईराजाच्या प्रांतांत राहून परप्रांतांत दरवडे घालतो असा सर्वांस संशय आला.

तात्याला पकडण्याचा उद्योग सारखा चालू होता; परंतु, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर गांववाल्याच्या सहाय्यावर व साहसावर सर्व भिस्त ठेविली गेली. सर्व गांवांत असा हुकूम देण्यांत आला कीं, जेव्हां दरवडेखोर गांवांत येतील, तेव्हां लोकांनीं गांव सोडून पळून न जातां शस्त्रें घेऊन दरवडेखोरांशीं सामना करावा; व शक्य तितक्या प्रयत्नानें त्यांचा प्रतिकार करून आपल्या धनदौलतीचें रक्षण करावें. दरवडेखोर पळून गेल्यास कांहींनीं त्यांच्या मागोमाग जाऊन त्यांचें रहाण्याचें ठिकाण पाहून यावें; व तें ठिकाण पोलिसांस

दाखवावें; आणि त्यांस साह्य करावें. दरवडेखोर सांपडले ह्मणजे पोलिसांस त्रास पडणार नाहीं, लोक दुःखमुक्त होतील व दरवडेखोरांस तुरुंगांत घालण्यास सांपडून आपली कर्तबगारी सरकारापुढें जाहिर होईल, हाच या हुकुमाचा हेतु असावा.

गावोगावीं हा हुकुम सोडल्यावर मागोमाग बंदुकांचें परवाने देण्याचा सपाटा सुरू झाला. अनेक लोकांनीं आपल्या जीवितवित्ताच्या संरक्षणार्थ बंदुकांचे परवाने भराभर घेतले. सारांश, तात्याला पकडण्याकरितां अशा प्रकारच्या अनेक क्लृप्त्या योजितां योजितां १८८३ साल संपून गेलें. सरकारचे लाखों रुपये खर्च झाले व पोलिसांस शरमेनें वर डोकें काढणें कठीण वाटूं लागलें.

तेविसावा परिच्छेद.

तात्याविरुद्ध पोलिसांचें युद्ध व पराजय. सन १८८४ इ.

वर सांगितलेल्या दरवाड्यांनंतर तात्या काय कारणानें कोणजाणें कांहीं दिवसपर्यंत स्वस्थ बसून राहिला; मात्र इंग्रजी पोलिस व होळकरी पोलिस एकत्र होऊन त्यास धरण्याचा एकसारखा प्रयत्न करीत होतेच. पोलिसांची जारीनें चालत असलेली हालचाल तात्यास कळून तो स्वप्राणसंरक्षणार्थ एके ठिकाणीं न राहतां कधीं होळकरइलाख्यांत तर कधीं इंग्रजी हद्दींत, तर कधीं दुसऱ्याच एकाद्या राज्यांत गुप्त रीतीनें हिंडून दिवस घालवूं लागला. अखेर ता. २४ मार्च रोजीं त्यानें पुनरपि मेळघाटांत दरवडा घालण्याचा विचार केला; पण त्या-

वेळीं पोलिस लोक तात्याचा शोध इतक्या बारकाइनें करीत होते कीं, त्यांना तात्याचा हा विचार कळून चुकला होता, कोण जाणे. तात्यानें अमुक कार्य करावयाचें असें ठरविलें ह्मणजे मग तें करण्यास कितीही अडचणी आल्या तरी तो त्यांची पर्वा करीत नसे. या त्याच्या जन्मस्वभावाप्रमाणें तो नेमल्या तारखेस दरवडा घालण्यास तयार झाला. पोलिसास ही बातमी आधींच कळली असल्यामुळें वऱ्हाडपोलिस अगदीं जय्यत तयार झालें; व ज्या गांवीं तात्या दरवडा घालणार होता, त्या गांवाजवळच एका गुप्त ठिकाणीं त्यांनीं आपला डेरा दिला. तात्या ठरल्या दिवशीं आपल्या लोकांसह त्या गांवाकडे निघाल्याचें कळ-तांच पोलिस त्याच्या पाठीस लागले. तात्या आपल्या लोकांसह सशस्त्र सज्ज होता व पोलिसही तात्यास पकडण्याच्या ईच्छेनें प्रथ-मच तयार होऊन बसले होते. मग काय विचारतां ? दोन्ही पक्षांची नजरानजर झाल्याबरोबर घोर युद्ध सुरूं झालें. पोलिस लोक दरवडेखोरांस पकडण्याकरितां आपली सर्व शक्ति खर्च करून कसब करूं लागलें व दरवडेखोरांनींही आपली सुटका होण्याकरितां शक्य तें कौशल्य दाखविण्यास सुरवात केली. दोन्ही बाजूंनीं लाठी (सोडगी), तलवारी व अखेर गोळ्या यांचा वर्षाव सुरूं झाला. प्रथमतः दोन्ही पक्ष कसून लढले; अखेर तात्याच्या टोळींतील लक्ष्मण नामक दरवडेखोर पोलिसच्या वारानें घायाळ होऊन जमीनीवर पडला; व पोलिसांनीं त्याला लागलींच आपल्या छावणींत पोंचता केला. लक्ष्मणची ही अवस्था झालेली पाहून तात्याची टोळी जिवाकडे न पाहतां पोलिसावर भयंकर तऱ्हेनें गोळ्यांचा वर्षाव करूं लागली. अनेक पोलिस घायाळ होऊन पडले

एका कामदारासही नर्मी गोळी लागून तो त्या ठिकाणीं अचेतन होऊन पडला; दुसऱ्या एका अधिकाऱ्यानें त्यास सावध कर-ण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण व्यर्थ ! ! तें पाहून पोलि-सांचा धीर सुटला व ते पळाले; तेव्हां तात्यानें इच्छित स्थळीं जाऊन दरवडा घातला व निघून गेला.

लक्ष्मण बराच जायबंदी झाला असल्यामुळें औषधोपचा-राचा उपयोग न होतां तो पुढें लवकरच मरण पावला. त्याच्या आजारीपणांत तो एक वेळ कांहींसा शुद्धीवर आला होता; त्यावेळीं त्यानें इतकेंच सांगितलें होतें कीं, माझें राह-ण्याचें ठिकाण नेमाडजिल्ह्यांतील ओखरगांव होय. मी ज्या वेळीं तात्याच्या टोळींत आलों, त्यावेळीं माझ्याबरोबर यदु व पांडु असे दोघे इसम आले होते. हें ऐकून पोलीस ओखर गांवाचा तपास करूं लागले. बराचसा तपास केल्या-वर त्यांना तें गांव सांपडलें व ते त्या गांवीं गेले. पांडु त्यावेळीं आपल्याशेतांत काम करीत होता. पोलिस आपला शोध करीत गांवांत आले आहेत असें त्यास कळतांच तो जंगलांत पळून गेला तो परत आला नाहीं. पांडु सांपडला नाहीं, तेव्हां पोलिसांनीं त्या गांवांतील कांहीं " कोरखरो " लोकांस तात्याचे साह्यकर्ते या संशयावरून पकडलें. अखेर मेळघाटांतील दरवड्यांत सामील असल्याबद्दल १० मनुष्यां-वर अपराध शाबीत होऊन त्यांस १४।१७ वर्षांच्या सक्त-मजूरीच्या शिक्षा झाल्या.

इतकें करूनही जेव्हां तात्या सांपडला नाहीं; तेव्हां मेळ-घाटांतील दरवडा घालून तात्या ज्या गांवांवरून गेल्याचें सम-जलें, त्या बाजूस चौकशीचें काम सुरूं झालें. ज्यांच्या घरीं

तात्या जेवला अथवा राहिला अशी बातमी लागली, त्या त्या घरच्या लोकांस धरण्यास सुरवात झाली. त्या लोकांस मॅजिस्ट्रेट पुढें उभें केलें व त्यांस सक्तमजुरीच्या शिक्षा देण्यांत आल्या.

यानंतर तात्या वऱ्हाड, नेमाड व हुशंगाबाद या जिल्ह्यांतून निघून जाऊन होळकरइलाखा व खानदेश या दरम्यानच्या जंगलांत राहूं लागला. पोलिसला ही कुणकुण लागतांच ते होळकर इलाख्यांतील खरगांवीं जाऊन पोंचलें. यावेळीं तात्याला पकडण्या करितां होळकर सरकारकडून कप्तान महंमदखा यांची योजना झाली होती व नेमाड जिल्ह्याच्या डिस्ट्रिक्ट पोलिससुपरिंटेंडेंचे जागेवर सरदार रतनसिंह यांस इंग्रजसरकारानें नेमिलें होतें. दोघांनींही एक विचारें तात्यांस पकडण्याचा उद्योग करावा असा दोन्ही सरकारचा त्यांस हुकुम झाला होता; पण याचें फल विपरीत होऊं लागलें. कांहीं कारणानें दोघांमध्यें द्वेश उत्पन्न झाला व तात्याला धरण्याचें काम विसरून जाऊन ते एकमेकांचीं छिद्रें शोधीत बसले. तात्याला ही संधी चांगली मिळून त्यानें नेमाड जिल्ह्यांत किती एक दरवडे घालून लोकांस अगदीं भिववून टाकलें.

या वेळीं तात्याला पकडण्याच्या कामांत आणखीही एक अडचण येऊन पडली. ठिकठिकाणच्या जिल्ह्यांतून मुख्य मुख्य प्रसिद्ध हुशार पोलिस कामदारांस तात्याला पकडण्याकरितां नेमिल्यामुळें जिल्ह्याजिल्ह्याचे ठिकाणीं त्यांचा अभाव झाला. हें पाहून दुसऱ्या बदमाश लोकांनीं लोकांवर अत्याचार करण्यास सुरवात केली. चोऱ्या आणि दरवडे यांचा अगदीं सुळसुळाट होऊन तो प्रदेश अराजक आहे कीं काय असा

भास होऊं लागला. अधिकारी वर्गाच्या ही गोष्ट लक्ष्यांत येऊन ते त्याचा बंदोबस्त करण्यास तयार झाले. नवीन व्यवस्था नवे हुकुम व नवे यत्न सुरू झाले.

अशा प्रकारें सन १८८४ हें वर्षही संपून गेलें. देशाची बहुत हानी झाली, सरकारचें पुष्कळ द्रव्य खर्च झालें, तात्याचे साह्यकर्ते ह्मणून कित्येक लोक पकडले व कित्येक तुरुंगांत घातले; पण मुख्य काम जें तात्यास पकडण्याचें तें मात्र साधलें नाहीं.

चोविसावा परिच्छेद.

तात्याच्या हातून जब्बरसिंहाचा शेवट. सन १८८५ ई.

जब्बरसिंह हांगर गांवाचा मालगुजार व जमीनदार होता. सरकारचे शुभचिंतक होण्याच्या आशेनें व बक्षीस मिळविण्याच्या इच्छेनें त्याचें मन अत्यंत लोभित होऊन गेलें. त्यानें मनांतल्या मनांत तात्याला पकडण्याचा संकल्प करून तो लोक जमवूं लागला; व त्या प्रदेशांतील सर्व ठिकाणीं गुप्तरीतिनें लोक पाठवून तो तात्याचा शोध करूं लागला. तात्याला ही बातमी कळलीच. जब्बरसिंहाचा हेतु जाणून तात्या आपले टोळीसह एके दिवशीं हांगरगांवीं गेला व जब्बरसिंहास हाक मारून त्यास ह्मणालाः— " मला धरण्याकरितां तूं इतके परिश्रम कशाला करितोस ? तुला मला धरावयाचें असेल तर हा पहा मी प्रत्यक्ष आलों आहें. मला धर. " तात्याच्या तोंडचे हे शब्द ऐकिल्याबरोबर जब्बरसिंहाचें मन विव्हलित झालें. त्याच्या मनांत तात्काळ पाप संचारलें; व त्यानें

ताल्याला पकडण्याकरितां गांवांतील सर्व लोकांस एकत्र केलें. तात्या काहीं भित्रा नव्हता. तो आपल्या लोकांसह तेथेंच उभा राहून जब्बरसिंहाची कारवाई मोठ्या कौतुकानें पाहूं लागला. अखेर गांवचे लोक व तात्या यांचें मध्यें मारामारीस सुरवात झाली. दोन्ही बाजूंनीं बंदुकींतील गोळ्या झडूं लागल्या. पाहतां पाहतां जब्बरसिंह त्या ठिकाणीं गोळी लागून घायाळ झाला व बक्षिसाची इच्छा जागच्याजागीं ठेवून या संसारमायेचा त्यानें कायमचा त्याग केला. हें पाहून गांवचे लोक भिऊन पळून गेले. गांवच्या लोकांचें तें आचरण पाहून तात्या त्यांच्या-वर फार असंतुष्ट झाला व त्यानें गांवांत घुसून तो गांव एक-दम त्यानें पेटवून दिला; व यथास्थित लूंठ मिळवून तो तेथून चालता झाला.

या गोष्टीनंतर तात्यानें त्या प्रदेशांत अनेक दरवडे घातले व अनेक गांवें जाळून भस्म केलीं, पण त्या सर्वांचें वर्णन येथें देणें अशक्य असल्यामुळें त्रोटक हकीकत मात्र येथें देतों.

तात्या ज्या गांवीं दरवडा घालण्यास जाई, त्या गांवांतील लोक तात्या आल्याची बातमी कळतांच भयभीत होऊन गांव सोडून जात; व त्यामुळें तात्याचें काम निर्वेध होई. तो दरवडा कसा घाली व अखेर नाहींसा कसा होई, याचा पत्ता मागाहून चौकशी करणारास मुळींच लागत नसे; एवढ्या-करितां पोलीसखात्यांकडून गांववाल्यांना भर व उत्साह देण्याकरितां प्रत्येक ठिकाणीं एकेक कान्स्टेबलाची नेमणूक करण्यांत आली होती.

नेमाड जिल्ह्यांतील मृलगानामक गांवीं अशाच प्रकारें

एका कान्स्टेबलची नेमणूक झाली होती; तो मोठा साहसी व कार्यदक्ष मनुष्य असल्यामुळें त्या गांवांतील सर्व लोक त्यास मोठा मान देत असत. तात्या एके दिवशीं त्या गांवीं गेला व दरवडा घालून आपली मनःकामना पूर्ण करूं लागला; पण कान्स्टेबलनें हें पाहून तो किमपिही न डगमगतां तो गांवऱ्यांजवळ साह्य मागूं लागला. पण त्याच्या विनंतीकडे कोणी लक्ष्य दिलें नाहीं; व कोणी त्यास साह्यही दिलें नाहीं. तथापि जें थोडेसें साह्य मिळालें तेवढ्यावरच तो तात्यास धरण्याकारितां पुढें सरला. तात्याच्या लोकांनीं त्यांस येतांनां पाहिलें; तेव्हां त्यांनीं लूटीचें काम तहकूब ठेवून ते कान्स्टेबलाचा समाचार घेण्यास तयार झाले. कान्स्टेबल मोठ्या साहसानें दरवडेखोरांवर गोळ्या झाडूं लागला; परंतु अखेर तो गोळी लागून जमीनीवर जो एकदां पडला, तोंच त्याचा प्राण निघून गेला. कान्स्टेबलची ती दशा पाहून जमलेले दुसरे लोक तेथें राहतात कशाला? तें सूं पळत सुटले व तात्या स्वइच्छेप्रमाणें लूट मिळवून तेथून चालता झाला.

होळकरसरकारच्या राज्यांत मुकुंदनामक एक भिल्ल राहत असे. तो तात्यासंबंधीं सर्व इत्थंभूत बातम्या महाराजसरकारास कळवीत असे. तात्या जेव्हां जसा वागे, ज्या गांवीं दरवडा घालण्याची इच्छा करी, ज्या ठिकाणीं गुप्त रीतीनें राहण्याचें मनांत आणी, तें मुकुंदा भिल्ल महाराजांस आधींच जाऊन कळवी. तात्याला हें समजून एके दिवशीं रात्रीं तो मुकुंदाच्या घरीं गेला, त्यानें केलेले अपराध त्यास सांगितले, महाराजांजवळ काय काय बातम्या त्यानें सांगितल्या, त्याचीही

ओळख तात्यानें त्यास दिली; व त्यास शिक्षा करण्याच्या हेतूनें त्यानें आपल्या साथीदारांकडे दृष्टि फिरविली; त्याबरोबर बंदुकीचा एक भयंकर आवाज निघाला; व मुकुंद भिल्लाचा देह तेथें तडफडत पडलेला सर्वांनीं पाहिला.

पंचविसावा परिच्छेद.

तात्याचे हातून पोलिसची दुर्गति स. १८८५ ई.

यावर्षी तात्यानें हुसंगाबाद जिल्ह्यांमध्यें ९, बैतुल जिल्ह्यामध्यें १ व नेमाड जिल्ह्यांत कितीएक दरवडे घातले; त्यांपैकीं केवळ दोन दरवडयांची हकीकत खालीं देतों.

नेमाडजिल्ह्यांत बारुरनांवाचा एक गांव आहे. तेथें एक मालगुजार रहात असे. इतके दिवस त्यानें तात्याच्या विरुद्ध कांहींही केलें नाहीं अथवा त्याच्यासंबंधीं कांहीं बातमी कोणासही सांगितली नाहीं; पण या सुमारास तात्याला पकडून देण्याची त्याला इच्छा झाली. त्यानें तात्यासंबंधीं कांहीं बातम्या मिळवून सरकारी कामदारांस कळविल्या. तात्याला ही बातमी कळतांच तो त्या मालगुजारास शिक्षा देण्याकरितां आपले लोकांसह त्याच्या घरीं जाऊन पोंचला; व त्याचें सर्वस्व लुटून, जातांना त्याचा एकुलता एक पुत्रही जबरीनें तो घेऊन गेला. मालगुजारानें याची पोलिसठाण्यांत वर्दी दिली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

वरील गोष्ट घडल्यानंतर कांहीं दिवसांनीं बापुमंग नांवाच्या एका पोलिस शिपायानें आपल्या शहाणपणानें व हुषारीनें

भौलिया व औलिया नांवांच्या तात्यांच्या टोळींतील दोन भिल्लांस पकडलें. पोलिसशिपायांचें तें साहस पाहून तात्या अत्यंत क्रोधायमान झाला व त्यास शिक्षा करण्याच्या हेतूनें तो आपल्या टोळीसह सुर्गनवंजारीनामक गांवीं जाऊन पोंचला. या गांवाला दरवड्याचे वेळीं मदत करण्याकरितां व त्याचें संरक्षण करण्याकरितां त्या शिपायाची तेथें नेमणुक झाली होती. त्या शिपायाला पहातांच तात्याच्या तळव्याची आग मस्तकास पोंचली. त्या शिपायानें केलेल्या कृमाबद्दल त्याचा सूड घेण्याच्या इच्छेनें तात्यानें त्याचा खून करण्याचाच बेत केला; पण त्याला एकदम मारिल्यास त्याला कोणत्याही तऱ्हेचा त्रास होणार नाहीं, असें मनांत आणून तात्यानें त्यास जन्मभर आठवण राहील अशा प्रकारची शिक्षा देण्याचें मनांत आणिलें; व त्याप्रमाणें त्यानें त्याचें नाक कापून पेटी पोषाक, बंदुक इत्यादि सरकारी सामान हिरावून घेतलें व त्यास गांवाबाहेर हाकून लावलें. बिचारा बापू मग काय करणार! तशा त्या विद्रूप स्वरूपानें तो आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर जाऊन उभा राहिला. ते अधिकारी तात्याच्या शोधांत प्रथमपासून होतेच; त्यांत या शिपायाची दुर्दशा पाहून ते जास्त काळजीनें काम करूं लागले; पण त्यास यश मात्र आलें नाहीं. तात्या सांपडण्याचें तर दूरच राहिलें; पण त्याच्या टोळीचाही पत्ता त्यांस लागला नाहीं.

अशा प्रकारें १८८९ सालही समाप्त झालें. कितीएक लोक तात्यास पकडण्याकरितां नेमिले गेले, कितीएक लोकांस सरकारी नोकरींतून कमी करण्यांत आलें; पण सरकारचा तात्यास पकडण्याचा हेतु साध्य झाला नाहीं. सर्व लोक

पोलिसांच्या नामर्दपणाबद्दल चर्चा करूं लागले व त्यांचा बंदोबस्त पाहून लोकांत असंतोष उत्पन्न झाला. पोलिसांची ही शोचनीय स्थिति, बापूची करुणरसोत्पादक अवस्था व मालगुजाराचें मर्मभेदक रोदन ऐकून कोणाचें अंतःकरण द्रवणार नाहीं व कोणाच्या डोळ्यांतून पाणी येणार नाहीं! पण एक तात्या मात्र हा सर्व प्रकार पाहून हंसणारा होता व तो हंसतही होता. सरकारचे जास्त पैसे खर्च होऊं लागले, व बड्या बड्या पोलिस अधिकाऱ्यांवर सरकारची रोषदृष्टि झाली, हें कांनीं पडलें ह्मणजे तात्या नाचूं उडूं लागे!!

सव्विसावा परिच्छेद.

तात्याचें एक अधम कृत्य.

तात्याला पकडण्याचा उद्योग पोलिसलोकांचा सारखा चालूंच होता; पण आपणांस या कामीं यश येत नाहीं व यश येण्याची आशाही नाहीं, असें जेव्हां त्यांस वाटलें, तेव्हां त्यांनीं आपल्या कामाचा रिपोर्ट सरकाराकडे पाठविला. रिपोर्ट सरकारच्या हातीं पडतांक्षणीं तें अगदीं चकित झालें. तेव्हां तात्याला पकडण्याचा भार पुनरपि सर्वस्वीं पोलिसांवर टाकणें प्रशस्त नाहीं, असें वाटून मध्यहिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरलसाहेबांचे एजंट सर लिफिल ग्रिफिन यांनीं स्वतः त्या कामीं उद्योग करण्याचें मनामध्यें आणलें व होळकरसरकारचे रिसालदार मेजर ईश्वरीप्रसाद सी. आय. ई. यांजकडे ही [illegible]गिरी सोपविली. ईश्वरीप्रसाद यथाशक्ति तात्याला [illegible]गेगास लागले.

ईश्वरीप्रसादाकडेच ती कामगिरी सोपवून ग्रिफीनसाहेब स्वस्थ बसले असें नाहीं. तर त्यांनीं प्रत्येक जिल्ह्याजिल्ह्याचे ठिकाणीं एकेक पोलिसचौकी बसविण्याचा हुकुम सोडला व त्या पोलिसचौकीवर तात्याचा पाठलाग करण्याकरितां शीघ्रगामी घोडेस्वार ठेवण्याची व्यवस्था केली. इतके दिवस तात्याला पकडण्याकरितां केवळ पोलिसांचेच श्रम व यत्न चालले होते. पण त्यांपासून कांहींच फलप्राप्ति होत नाहीं, असें पक्कें ठरलें; तेव्हां त्या कामावर युद्धविशारद लष्कराची योजना करण्यांत आली.

सरकार व होळकरमहाराज यांची ही व्यवस्था पाहून तात्या मनांतल्या मनांतच हंसूं लागला व वर्षाच्या आरंभींच त्यानें तडाक्यासारखे लागोपाठ दोन दरवडे घालून सर्वांस चकित करून सोडलें. हें पाहून ईश्वरीप्रसाद लाजला व सैन्य घेऊन लागलींच तात्याच्या शोधार्थ बाहेर पडला. ज्या ठिकाणीं तात्यानें दरवडे घातले, तेथें तो बारकाईनें शोध करूं लागला. आपली चतुरंग सेना घेऊन तो या गांवाहून त्या गांवीं, या जंगलांतून त्या जंगलांत, या डोंगरावरून त्या डोंगरावर भटकूं लागला. ज्या गांवीं तो शिरे, तो गांव याच्या सैन्यामुळें दणाणून जाई. ज्या जंगलांत हा घुसे, त्या जंगलांतील हिंस्र पशू आपले जीव संरक्षण करण्याकरितां पळून जात; जंगलांतील झुडुपें, वेली यांचा फन्ना पडूं लागला, आणि याचें हें सैन्य एखाद्या टेकडीवर चढल्यास ती टेकडी या सैन्याच्या भयानें थरथर कांपत आहे कीं काय, असाही भास होऊं लागे. सारांश, तात्यावरची ही स्वारी इतस्ततः हिंडूं लागली. सर्व वर्षाऋतु अशातऱ्हेनें जंगलांत ईश्वरीप्रसा-

दानें काढला; पण तात्याचा शोध न लागून त्यास विन्मुख परत स्वस्थानीं येणें भाग पडलें.

ईश्वरीप्रसाद आपल्या ठिकाणीं पोंचतों न पोंचतों, इतक्यांत ता. २७ अक्टोबर रोजीं तात्या आपल्या टोळीसह पोखरगांवीं जाऊन पोंचला. पोखरगांव खांडव्याच्या पश्चिमेस १२ मैलांवर आहे. या पोखरगांवीं तात्या पूर्वीं कांहीं दिवस राहिला होता, व शिवा पाटलाची मुलगी यशोदा इच्याबरोबर त्याचें याच गांवीं सूत जुळलें होतें. शिवा पाटलाच्या विश्वासघातकीपणामुळें आपल्या वडिलार्जित जमीनीस तात्या याच गांवीं मुकला होता; बदमाशगिरी-बद्दल याच गांवांतून तात्या तुरुंगांत गेला होता; सारांश, तात्याच्या बदमाशगिरीचा अंकुर याच गांवीं फुटला होता. या अंकुराचा पुढें जंगी वृक्ष बनून तात्या भयंकर दरवडेखोर बनला. (यासंबंधीं विशेष हकीकत मागें दुसऱ्या परिच्छेदांत आली आहेच.) परंतु, या पोखरगांवांतील कोणत्या मनुष्याचा कोणाशीं कसला संबंध होता, हें कळणें अत्यंत अवश्य असल्यामुळें यासंबंधीं संक्षिप्त वर्णन येथे देतों.

शिवापाटलाकडे पोखरगांवांतील अर्ध्या जमिनीची मालकी होती. यावेळीं तो मयत झाला होता; मात्र त्याचा मुलगा जालिम व मुलगी यशोदा हीं त्याच गांवीं राहत असत. शोभन भिल्लाच्या घरांतून जें सामान चोरीस गेलें होतें, तें या जालिमच्या घरीं सांपडलें होतें; तथापि शिवापाटलानें रजपुतांच्या संमतीनें या खटल्यांतून जालिमास वांचवून तात्यास वनवासी बनविलें. या गांवांतील राहिलेल्या अर्ध्या जमिनीचा मालक

सरदारपाटील होता. सरदाराला मोहननांवाचा एकुलताएक मुलगा होता. याच मोहनाच्या कपटानें व सरदाराच्या विश्वासघातकीपणानें तात्या सन १८७८ मध्यें धरला गेला होता. यावेळीं ते दोघेहीं मयत झाले होते; फक्त सरदाराची विधवा स्त्री गाजिया, मोहनची विधवा स्त्री सारसी व तिचे दोन लहान लहान मुलगे मात्र तेथें राहत होते.

सरदार व मोहन यांनीं तात्याला धरून दिलें तेव्हां यशोदेस अत्यंत दुःख झालें; पण बाप व भाऊ यांच्या भयानें तिनें तें दुःख आंतल्या आंत दाबून ठेविलें होतें. सरकार त्या दोघांवर त्याबद्दल फार खुष झालें होतें; पण त्याचें बक्षिस त्यांना मिळण्यापूर्वींच तात्या तुरुंगांतून पळाला. तदनंतर तात्यानें पोखरगांवीं येऊन तो गांव जाळून भस्म करून टाकला. तथापि सरकारानें मोहनास सोन्याची कडी बक्षिस दिली होती. या कृत्यानंतर मोहन स्वर्गवासी झाला. सरकारानें त्याबद्दल अत्यंत दुःख प्रदर्शित केलें व त्यानें केलेल्या कार्याबद्दल व त्याच्या कुटुंबाबद्दल सरकारानें सहानुभूति दाखविली. सरदाराची बायको गाजिया एका जमीदाराची मुलगी होती, शिवाय सरकारची तिच्यावर कृपादृष्टि, यामुळें तिला फार गर्व झाला होता. आपल्या मुलास सोन्याची कडी बक्षिस मिळाली याबद्दल तर तिला धन्यता वाटून अहंकारानें ती आंधळी बनली. ती यशोदेस नानाप्रकारचे कडु शब्द बोलून तीस तुच्छ करून टाकी व तात्यासंबंधीं नाना गोष्टी सांगून ती तीस लाजवी. यशोदेची गाजियेकडे कांहीं ज्वारी येणें होती; एके दिवशीं यशोदेनें त्याचें मागणें केलें; परंतु, गाजियेनें तिचें देणें नाकबूल करून उलट ती तीस अनेक तऱ्हेनें

नसतो. तुझा अभिमान एकां क्षणांत नष्ट करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं आहे, हें तुझ्या आतां लक्ष्यांत आलें असेलच. मीं ही जी तुला कायमची शिक्षा दिली आहे, ती नाहींशीं करण्यास आतां कोणीही समर्थ नाहीं. दुसरें, जिच्या कुशींत अशा अयोग्य पुत्रानें जन्म घेतला, तीस हेंच प्रायश्चित्त योग्य आहे." इतकें बोलून तात्या गप्प बसला. गाजियेचे नांकांतून रक्ताची धार लागली; इतकी कीं, तिचें सर्व लुगडें रक्तमय होऊन खालची जमीनही तांबडी लाल झाली.

हा भयंकर प्रकार येथें घडला तेथून जवळच एका शेतांत एक शेतकरी काम करीत होता. त्यास तात्यानें बोलाविलें. बिचारा शेतकरी कांपत कांपत तेथें गेला; तेव्हां तात्यानें त्या दोन्ही बायका व तीं मुलें त्याच्या स्वाधीन करून त्यांस सांगितलें कीं; तूं यांस घेऊन जाऊन त्यांच्या घरीं पोंचतीं कर. गाजियेला प्रथम यशोदेकडे घेऊन जा. मी ही जी हिला शिक्षा दिली आहे ती तीस दाखवून तिला सांग कीं, "तुझ्याबरोबर वाईट वर्तन केल्यामुळेंच तिला ही शिक्षा दिली आहे." शेतकरी तो निरोप ऐकून त्या बायकामुलांसह तेथून लागलींच निघून गेला व तात्याही हंसत हंसत तेथून चालता झाला.

तात्यानें इतके दिवस दरवडे घालण्याचें काम केलें; पण स्त्रिया व मुलें यांजवर जुलूम कधीं केला नव्हता; इतकेंच नव्हे तर त्याच्या साथीदारांपैकीं जर कोणीं तसें कृत्य केल्याचें त्याच्या समजण्यांत आलें, तर तो तें कृत्य करणारास लागलीच दंड करीत असे. पण पहा ! प्रेम किती विचित्र आहे !! जो प्रेमांत बद्ध झाला, तो कर्तव्यकर्मांतून परावृत्त

व्हावयाचा ! ज्ञानी आणि विवेकी पुरुष प्रेमबद्ध झाले तर त्यांच्या हातूनही जर आपलें हिताहित पहाणें होत नाहीं, तर यशोदेच्या प्रेमपाशांत गुरफटलेल्या तात्या दरवडेखोरांकडून निंद्य कार्य झालें यांत विशेष आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. यशोदेच्या प्रेमांत गुरफटून तात्या आपलें हिताहित विसरला. ज्या कामाचा त्यास अत्यंत तिटकारा तेंच काम तात्या स्वतः करण्यास तयार झाला! आणखीही एका स्त्रीची तात्यानें अशीच दुर्दशा केली आहे, तें वृत्त वाचकांस पुढें कळेलच !

सत्ताविसावा परिच्छेद.

पोखरगांवी पुन्हां दरवडा.

ता. २८ अक्टोबर रोजीं पहाटे चार वाजतां तात्याच्या या अद्भुत दरवडयाची बातमी त्या ठिकाणच्या डिस्ट्रिक्ट पोलिस-सुपरिंटेंडंट साहेबांस कळली. हे साहेब अत्यंत उद्योगी व हुशार अधिकारी होते. बातमी पोंचल्यापासून एक प्रहराच्या आंत ते दरवडयाच्या जागीं जाऊन पोंचले व मोठ्या उत्साहानें त्यांनीं तात्याला शोधण्याकरितां चांगल्या चांगल्या लोकांची योजना केली. तात्या ज्या बाजूला गेला होता त्या बाजूस त्या लोकांस पाठवून ते त्या ठिकाणींच राहून दरवडयाची चौकशी क्रमाक्रमानें करूं लागले. २८ तारीख संपली व चौकशी करण्यास गेलेले सर्व लोक २९ तारखेस तात्याचा पत्ता नाहीं ह्मणून परत आले. साहेब पुढें काय

करावें याचा विचार करीत बसले होते, तों बेलुंड गांवीं आदले दिवशीं रात्रीं तात्यानें दरवडा घातल्याची बातमी आली. त्याबरोबर साहेब बहादुर त्या गांवीं जाऊन त्यानीं दरवड्याचें ठिकाण पाहिलें व तात्याच्या शोधार्थ त्यांनीं जारी प्रयत्न चालविला; पण व्यर्थ! तात्याचा कांहींही मागमूस लागला नाहीं.

ईश्वरीप्रसादास ही बातमी कळतांच तेही ' माळवा भील कॉर्स बटेलियन ' व आपलें सैन्य घेऊन तात्याच्या शोधार्थ बाहेर पडले. तात्या अमुक ठिकाणीं आहे अशी काणकूण लागतांच त्यांनीं तेथें जाऊन बारीक रीतीनें चौकशी करावी; पण अखेर निराश होऊन निघून जावें; असा प्रकार चालला होता. तात्या हे दोन्ही दरवडे घालून जो निघाला, तो होळकरहद्दींत जाऊन गुप्त रीतिनें राहूं लागला. कांहीं दिवस तेथें घालवून नवंबर महिन्यांत तो भिनपानगांवीं आला. हिम्मत पाटलाचा सर्व नाश केलेला, व हिम्मतपाटलाचा खून केल्याच्या आरोपावरून तात्याचा मुख्य सरदार बिजनिया यांस ज्या गांवीं सर्वांसमक्ष फांशीं दिलें, तोच हा गांव. तात्या आज पुन्हां त्याच हिम्मत पाटलाच्या घरांत घुसला. हिंमतचा मुलगा गोविंद यावेळीं मालगुजराचे जागेवर होता. हिंमत पाटलाचा मुलगा दरिद्र स्थितींतून पुन्हां चांगल्या स्थितींत आलेला पाहून त्यास बरें वाटलें नाहीं व त्याच्या पोटांत सूड घेण्याच्या ज्वाळा पुनरपि पेटूं लागल्या. त्यानें यावेळीं हिंमत पाटलाच्या मुलाचें घर पुनरपि लुटून त्यास अन्नास महाग केलें.

मागाहून पोलिसांस बातमी लागून ते गोविंद पाटलाचे घरीं येऊन चौकशी करूं लागले. इकडे तात्या जो निघाला तो वारुरीगांवीं जाऊन पोंचला. या गांवच्या एका स्त्रीनें

पूर्वी यशोदेस छळलें होतें, त्याबद्दल सूड घेण्याकरितां ती तेथें गेला. त्यानें त्या स्त्रीस हुडकून काढून तिचें नाक कांपलें. प्रेमपाशांत बद्ध होऊन तात्यानें दोन स्त्रियांस शूर्पणखा बनविलें व आपण लक्ष्मणाप्रमाणें दूर मौज. पहात उभा राहिला.

कांहीं केलें तरी तात्या सांपडत नाहीं, हें पाहून एकानें कल्पना काढिली कीं, तात्या नांवाचा कोणी मनुष्य नाहीं; जर तात्या नांवाचा कोणी मनुष्या आसता तर तो इतके दिवस आह्मी सारखा शोध करीत असतां न सांपडणें शक्यच नाहीं. परंतु, पडलेल्या दरवडयांतून ज्यांचीं अनेकांनीं नाकें कापलीं त्यानीं त्यास प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळें त्या कल्पकाच्या कल्पनेचें हंसें मात्र झालें. असो. अशा प्रकारें पोलिस व लष्कर यांची चौकशी जारीनें चालली असतांही तात्या न सांपडता सन १८८७ साल निघून गेलें.

अठ्ठाविसावा परिच्छेद.

तात्या दोन पोलिसांचीं नाकें कापितो.
सन १८८८ इसवी. *

पोलिस व लष्कर तात्याला पकडण्याचा उद्योग जसा जास्त जास्त करूं लागले तसा तात्याचा दरवडे घालण्याचा क्रम जास्त जास्त वाढूं लागला. ता. २७ जानेवारी रोजीं तात्यानें घानेकोटा गांवांतील सर्व गंडी लुटलें. पोलिस

---

* पोलिस रिपोर्टांचे आधारें व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या मजकुराच्या आधारें हें पुस्तक लिहिलें आहे.

त्याच्या चौकशींत हताश होऊन बसतात न बसतात तोंच ता. १७ मार्च रोजीं नेमाड जिल्ह्यांतील भोगांव नांवाचें एका गावांतील मालगुजार व पटवारी यांच्या घरास आग लावून तात्यानें ९०० रुपये किंमतीचा माल लांबविला.

यावेळीं तात्या पुनासानामक सरकारी जंगलांत राहून हे दरवडे घालीत होता व त्या जंगलावरील सरकारी कामदार त्याची खाण्यापिण्याची वगैरे सर्व बरदास्त ठेवीत होते. जेव्हां तात्या तें जंगल सोडून दुसरीकडे निघून गेला तेव्हां त्यानें आपली बरदास्त ठेवणाऱ्या जंगलकामदारास बरेंच द्रव्य वगैरे देऊन त्यांची चांगली संभावना केली. यानंतर तात्यानें होळकरहद्दींतील मवलीगांवीं दरवडा घातला. यानंतर ता. ८ मे रोजीं त्यानें कित्येक भिल्लांच्या साह्यानें बिसतारगांवीं एक मोठा भयंकर दरवडा घातला. या दरवडयाचा पत्ता लावण्यांत महाराजांनीं बहुत प्रयत्न केला. अधिकाऱ्यांनीं अतिशय श्रम करून कांहीं लोक पकडले, त्यांच्या घराचे झाडे घेतां दरवड्यांतील कांहीं मालही मिळाला व पकडलेल्या लोकांना शिक्षा देण्यांत आल्या. जास्त दरवडे पडूं नयेत म्हणून जास्त शिपायांच्याही नेमणुका झाल्या; तथापि यानंतर थोड्याच दिवसांनीं तात्यानें कोदारीगांवीं दरवडा घातलाच! कोदारी गांवच्या दरवड्याची चौकशी करण्यांस पोलिस त्या ठिकाणीं गेले तोंच तात्यानें ता. १९ जून रोजीं फिरून रोसनगांवीं दरवडा घातला.

हा दरवडा घातल्यावर तात्या पळाला नाहीं. यावेळीं त्याच्याजवळ फक्त २०च लोक होते व त्यांसह तो गंग्राधना गांवीं तळ देऊन राहिला होता. ता. २८ जून रोजीं पोलि-

सांस ही बातमी लागून ते तेथें आले व त्यांनीं तात्यांचा तळ समक्ष पाहिलाही. तात्याला धरण्याचे कामीं यावेळीं आपणास साह्य मिळावें ह्मणून त्यांनीं बहुत उद्योग केला; पण गांवच्या लोकांपैकीं कोणीही साह्यास आलें नाहीं; तेव्हां त्यांनीं दुरूनच तात्या राहिला होता तिकडे गोळ्या झाडण्यास सुरवात केली. तात्याच्या बाजूकडून दोन गोळ्या आल्या; पण पुढें कांय झालें कोण जाणे, तात्या तेथल्यातेथें कांहीं सामान टाकून पळून गेला; तेव्हां पोलिसांनीं तें सामान जप्त केलें व तात्याला न धरितां त्याचें सामान मिळविल्याबद्दलच फुशारकी मारीत ते चालते झाले.

तात्यानें तेथून निघाल्यावर जातां जातां भूरिसात गांवीं दरवडा घालून आपणास जरूर असलेलें सामान विकत घेतलें व तेथून तो पुढें चालता झाला. पाठोपाठ पोलिस तेथें आले; पण तात्याचा पत्ता लागला नाहीं. पुढें ता. ५ जुलै रोजीं पादारगांवीं जाऊन पोंचला. तात्या आल्याची बातमी गांवांत पसरतांच कांहींनीं पोलिसांस वार्दी दिली. ही बातमी तात्यास कळतांच तो अतिशय रागावला व त्यानें चोहोंबाजूंनीं गांवास आग लावून देऊन मनमुराद लूट मिळविली. तेथून तो परत चालला असतां एकाएकीं एका पोलिस शिपायाची व त्याची गांठ पडली. दृष्टभेट होतांक्षणीं तात्यानें त्याचें नाक कापलें व तो तेथून निघून गेला. मि. मारिससाहेब ह्या ठिकाणीं जाऊन काळजीपूर्वक तपास करूं लागले. जें जें यत्न त्यांस सुचले; व जें करणें त्यांस उचित् वाटलें, तें तें त्यांनीं केलें; पण तात्यासंबंधीं कांहीं एक बातमी त्यांस मिळाली नाहीं; मात्र ता. २७ अक्टोबर रोजीं तात्यानें होळक-

रइलाख्यांत एके ठिकाणीं दरवडा घातल्याचें त्यास अखेर समजलें. यानंतर तात्यानें आणखी कित्येक ठिकाणीं दरवडे घातले, त्या प्रत्येक दरवड्याची चांगल्या प्रकारें चौकशीही होत गेली; पण तात्या सांपडला नाहीं.

अशा प्रकारें तात्यांला पकडण्याचा उद्योग महराज होळकर जसजसा आस्त करूं लागले, तसतसे त्यांचे कित्येक अधिकारी तात्यास साह्य करण्यास जास्त जास्त प्रवृत्त झाले. कोणी तात्याच्या खाण्यापिण्याची तरदूद करूं लागले व कोणी तात्याच्या राहण्यानिजण्याचा बंदोबस्त करूं लागले. महाराजांचे कामगार या प्रसिद्ध दरवडेखोरास इतके सामील कां झाले, हें मात्र कळलें नाहीं. मात्र या फितुरीची वार्ता महाराजापर्यंत पोंचून त्यांनीं त्या कामदारांस दरवडयास सह्य करण्याच्या आरोपावर फौजदारींत घातलें; व अखेर त्या सर्वांस श्रीमंदिराची हवा खाण्यासही पाठविण्यांत आलें.

बेतुल जिल्यांतील एका जंगलांत तात्या कांहीं दिवस राहिला होता, तेथें एक पोलिस शिपाई तात्याचा तपास करीत करीत जाऊन पोंचला. तात्यानें त्यास पकडलें व त्याची बंदुक, पोशाक व बक्कल हिसकावून घेऊन व त्याचें नाक कापून त्यास तेथून हाकून लावलें. तात्या ज्याजवर असंतुष्ट होई, त्यास त्याचें नाक कापून शिक्षा करावयाची हा तात्याचा स्वभावच होता असें दिसतें.

अशा प्रकारचीं दुष्ट कृत्यें तात्या करी; पण मिळविलेलें धन चांगल्या कार्यांतच तो खर्च करीत असे. गरीबांचें पालन व शेतकऱ्यांस बीं व बैल देणें या नित्य कृत्यांस लागणारा खर्च वजा जातां बाकी शिलक राहणारा पैसा तो

नर्मदातटाकीं जाऊन साधू व ब्राह्मण यांस देऊन टाकीत असे. या वर्षीही नर्मदेचें स्नान करून त्यानें ब्राह्मण व साधू-संत यास सहा हजार रुपये वाटले.* अशा प्रकारचीं सत्कार्यें सुशील मनुष्यांचे हातून घडतात; पण दरवडेखोरांमध्यें अशा प्रकारचा सद्गुण फक्त तात्या भिल्लामध्येंच सांपडतो.

एकोणतिसावा परिच्छेद.

गणपतच्या विश्वासघातकीपणानें तात्या पकडला जातो. सन १८८९ इ.

गेल्या पांच वर्षांत त्यानें जे दरवडे घातले, त्यांचें यथास्थित वर्णन केलें तर तें एक आठरापर्वीचें महाभारतच होईल. त्यानें सुमारें ४०० दरवडे घातले, तेव्हां या ४०० दरवड्यांचें वर्णन करणें सहज गोष्ट नाहीं, व त्याची इतकी अवश्यकताही नसल्यामुळें फक्त मुख्य मुख्य गोष्टींचें वर्णन मात्र या पुस्तकांत केलें आहे. या वर्षी त्यानें जे दरवडे घातले, त्यांचें

---

* तात्या अशाप्रकारें ठिकठिकाणीं दरवडे घालून पुष्कळ पैसा मिळवूं लागला, पण एखाद्या स्वार्थी मनुष्याप्रमाणें तो पैसा एकत्र जमवून ठेवीत नाहीं. श्रीमंताशिवाय तो कोणाचें धन हरण करीत नाहीं, व हरण केलेलें द्रव्य गरीबांस वाटून तो त्यांचें दुःख दूर करितो. तात्यानें किती शेतकऱ्यांस नांगर व बैल घेऊन दिले आणि कितीना बीं घेऊन दिलें, याची गणती करतां येणार नाहीं. गतवर्षीही त्यानें नर्मदेमध्यें स्नान करून ब्राह्मण व भिक्षुक यास ६००० रुपये दिले होते.

'काशी पत्रिका,' बनारस

वर्णन करणें बाजूस ठेऊन गणपतच्या विश्वासघातकी-पणामुळें तो कसा पकडला गेला, याचें मात्र संक्षिप्त वर्णन येथें करितों.

या वेळीं तात्याचें वय ४५ वर्षांचें होतें. गेलीं ११ वर्षें त्यानें दरवडे घालण्यांत घालविलीं. अन्न आणि झोंप सोडून रात्रंदिवस जंगलांत भिरी भिरी फिरण्यानें त्याचें शारिरिक बल कमी झालें. पूर्वी त्यास खाण्याच्या पदार्थांची कमतरता पडल्यास, एखाद्या दरिद्री मनुष्याचें अन्न कष्ट दूर करण्याची इच्छा झाल्यास — व ते पदार्थ सहज न मिळाल्यास धावणाऱ्या रेल्वे गाडींत तो सहज चढे; व मालगाडीच्या टप्यांचीं दारें जोरानें उघडून त्यांतील धान्याचीं पोतीं खालीं ढकलून देई. एवढी त्याची शक्ति होती. अशा प्रकारें तो कधीं कधीं ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वेच्या गाड्यांतून तांदुळ, गहूं इत्यादि धान्य बाहेर फेकी व गाडी पळत असतां तींतून उडी टाकून खालीं पडलेलीं धान्याचीं पोतीं पळवून नेई.

ही त्याची शक्ति हळूं हळूं कमी होत गेली; व तीबरोबर त्याचें साहसही नाहींसें झालें. प्रथमतः तात्या क्षणमात्रही विसावा न घेतां एकसारखी ३० कोसांची दौड करी; पण यावेळीं १० कोस चालून गेला तरी तो थकून जाऊं लागला. याशिवाय त्याची दृष्टीही कमी झाली.

सारांश, अशा प्रकारें पोलिस, लष्कर, मालगुजार यांच्यांशीं संतत ११ वर्षें संग्राम करून व हजारों घरें जमीन-दोस्त करून तात्या अखेर अगदीं शिथिल झाला व तो सर-काराकडून आपणास क्षमा कशी मिळेल, याचे उपाय शोधूं लागला. याच कारणाकरितां त्यानें पुष्कळांचा स्नेह संपादन

केला व आपल्या तर्फे सरकारास चार गोष्टी सांगण्याकरितां त्यानें पुष्कळांस द्रव्यही दिलें; पण कोणाचे हातून कांहीं उपयोग झाला नाहीं; व त्याचा पक्ष धरून सरकारापाशीं त्याच्यातर्फे वकीली करण्याचेंही कोणी कबूल केलें नाहीं. यानें स्वतः ११ वर्षेपर्यंत सरकारला सतावून सोडलें असल्यामुळें आपण होऊनही सरकारापुढें जाऊन उभें राहण्याचें साहस त्याच्यानें करवेना! अशाप्रकारें या वर्षातील सहा महिने निघून गेले; त्यानंतर बनैरगांवच्या गणपतनांवाच्या एका रजपुताशीं तात्याचा स्नेह जमला. आपल्या तर्फे सरकाराला दोन गोष्टी सांगण्याबद्दल तात्यानें गणपतची विनंती केली व त्यास पुष्कळ द्रव्यही दिलें. गणपतनें तात्याच्या विनंतीस मान देऊन सरकाराकडून क्षमापत्र आणून देण्याचें कबूल केलें. या गोष्टीस बरेच दिवस झाले; तरी गणपतनें क्षमापत्र आणलें नाहीं; तेव्हां तात्यानें एक दिवस त्याला त्या संबंधीं विचारिलें. गणपतनें उत्तर दिलें:— "रिसालदार मेजर ईश्वरीप्रसाद सी. आय. ई. यांचें बरोबर माझें बोलणें झालें आहे व त्यांनीं तुला क्षमा करण्याचें कबूल केलें आहे. एक महिन्यानंतर क्षमापत्र आणून देण्याची त्यांची प्रतिज्ञा आहे." तात्याला तें सांगणें खरें वाटलें. ईश्वरीप्रसादाची गांठ घेण्याचा दिवस मुकरर झाला. त्या दिवशीं तात्या एका पहाडाचे टेंकडीवर ईश्वरीप्रसादाची वाट पहात उभा राहिला. कांहीं वेळानें मेजरसाहेब तीनशें सशस्त्र लोकांसह त्या ठिकाणीं येऊन पोंचले. ईश्वरीप्रसादचा विचार असा होता कीं, संधि सांपडेल तर बरोबरच्या लोकांचे साह्यानें तात्यास पकडून इतक्या दिवस केलेल्या श्रमाचें चीज करावें.

पण ती गोष्ट साधली नाहीं. तात्या ज्या ठिकाणीं उभा होता तेथून त्यास पकडून आणणें असंभवनीय होतें; तेव्हां ईश्वरीप्रसादास ती मनांतील आशा सोडून देणें भाग पडलें. फक्त त्यानें तात्यास चांगल्या प्रकारें पाहून घेतलें व दुरूनच दोघांमध्यें कांहीं बोलणें झालें. अखेर असें ठरलें कीं, सरकार बहादुर तात्यास क्षमा करील, एक महिन्यानंतर ईश्वरीप्रसादानें स्वतः क्षमापत्र आणून द्यावें व तात्यानें त्याच्या स्वाधीन व्हावें.

एक महिना झाला न झाला तोंच गणपतनें तात्यास निमंत्रण पाठविलें व तुझें कार्य झालें अशी त्यास सूचनाही दिली. हा दिवस 'रक्षाबंधनाचा' होता. यांच दिवशीं स्नेही स्नेही एकमेकांच्या हातांत राखी बांधतात.

याच दिवशीं गणपतनें बंधुत्वाच्या नांवाखालीं तात्याशीं विश्वासघातकीपणा केला. ता. ११ आगष्ट ह्मणजे रक्षाबंधनाचे दिवशीं तात्या गणपतच्या निमंत्रणावरून केवळ सहा सांथीदारांसह त्याच्या घरीं गेला. तात्या आलेला पाहून गणपतनें बहुत आनंद प्रदर्शित केला, व त्यास मेजवानी देऊन विश्रांती घेण्याकरितां त्यास दिवाणखान्यांत नेलें. तदनंतर मोठ्या चतुराईनें त्याच्या सांथीदारांस गणपतनें कांहीं कामानिमित्त बाहेर घालविलें. सरळ स्वभावाचा तात्या मित्राच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तेथेंच बसून राहिला. कांहीं वेळानें गणपत त्याच्या जवळ येऊन बसून नानाप्रकारच्या गोष्टी सांगूं लागला; व गोष्टींच्या भरांत तात्याची बंदुक त्यानें आपल्या हातांत घेतली व लागलींच एक खुणेचा शब्द केला. त्याबरोबर गणपतच्या घरांतून भराभर

पोलिस शिपाई बाहेर आले व त्यांनी तात्यास पकडलें. तात्या यावेळीं निःशस्त्र होता. ह्मणून त्याला कांहींच गडबड करतां आली नाहीं. तात्यास धरल्याची बातमी त्याच्या सांथीदारांस समजतांच ते आपल्या धन्यास सोडविण्याच्या प्रतिज्ञेनें पोलिसांवर चालून गेले; पण पोलिसच्या गोळ्यांच्या मारापुढें त्यांचें कांहीं न चालून ते पळून गेले. तात्याचे हातपाय लोखंडी सौखळदंडानें बांधून टाकण्यांत आले. हातकडी तोडून तात्यानें पळून जाऊं नये ह्मणून दोन जवान पोलिस त्याच्या दोहोंबाजूस उभे करण्यांत आले व त्यांच्या हातांशीं तात्याचे हात हातकडीनें आवळून टाकण्यांत आले. तात्याचे दोन्ही पायांत जड बिड्या घातल्यामुळें त्याचे पाय लडबडूं लागले. गणपतच्या मैत्रीचें सार्थक झालें! त्याच्या विश्वासघातकीपणामुळें तात्या कैदी झाला. नंतर त्यास खरगांव येथें ईश्वरीप्रसादासमोर नेण्यांत आलें. तात्याला पाहतांच ईश्वरीप्रसादाच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. आपल्या तीव्रबुद्धीबद्दल मॅजर साहेब मनांतल्या मनांत आपणास धन्य मानूं लागले. तात्याला पकडलें तेव्हां नाक कापलेला पोलिस शिपाई बापू यांचें बक्कल त्याच्या कमरेस सांपडलें.

तात्या सांपडला, ही बातमी समजतांच इंग्रजसरकारास परमावधीचा आनंद झाला. आपल्या पाठीमागील ससेमिरा सुटला, ह्मणून पोलिस लोकांस हर्ष झाला. ईश्वरीप्रसादानें चौकशी करण्याकरितां तात्यास इंग्रजसरकाराकडे पाठवून दिलें, तेव्हां हा खरा तात्या आहे कीं नाहीं, याबद्दल चर्चा सुरू झाली. हा संशय नाहींसा करून घेण्याकरितां तात्यास खांडव्याच्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें. पण तेथें हा संशय

दूर न होतां अधिक वाढला. कारण, ११ वर्षापूर्वी तात्या या तुरुंगांतून पळून गेला; तेव्हां तो जितका उंच होता, त्यापेक्षां आतां तीन इंच जास्त उंच भरला. पण तो संशय लवकरच दूर झाला. पोखर इत्यादि ठिकाणच्या गांववाल्यांनीं त्यास चांगल्या प्रकारें ओळखलें. असो. यानंतर त्याची चौकशी करण्याकरितां त्यांस मोठ्या बंदोबस्तानें जबलपुरास पोंचतें करण्यांत आलें; व तेथें त्याच्या चौकशीस आरंभ झाला.

तिसावा परिच्छेद.

तात्याचीं कांहीं मुख्य मुख्य कृत्यें.

तात्या दरवडेखोर असूनहीं हास्य व क्रीडा करण्यांत अत्यंत अनुरक्त होता. यासंबंधानें कित्येक गोष्टी वाचकांस पूर्वीच समजून चुकल्या आहेत. तात्याच्या अंतःकरणास भय कसलें तें मुळींच ठाऊक नव्हतें. तात्याच्या हातून सहज जीं अद्भुत कामें होत, तीं करण्याचें धाडस एखाद्याच्या अंगीं क्वचित्‌च असावयाचें! असल्या धाडसाचीं एक दोन उदाहरणें खालीं देतों. ज्या गोष्टींच्या आधारानें तात्याचें हें जीवनचरित्र लिहिण्यांत आलें आहे, त्या सर्व गोष्टी सरकारास मान्य असून पोलिसांच्या चौकशींत बाहेर आलेल्या आहेत; ह्मणून त्यासंबंधानें संशय घेण्याचें कारण नाहीं. या खालीं ज्या गोष्टी दिल्या जात आहेत, त्या मात्र लोकांच्या तोंडच्या आहेत. असें ह्मणतात कीं:—

१ एके दिवशीं तात्यानें आपला वेष पालटून साधारण

शेतकऱ्याच्या वेषांत आपणास धरण्याकरितां जे पोलिस नेमले होते, त्या पोलिसांतील एका बड्या अधिकाऱ्यांच्या तंबूवर धांवत धांवत गेला. दारावर पहारेकरी बसला होता; त्यास तात्या घाई घाईनें ह्मणाला:–" तूं आपल्या धन्यास जाऊन सांग कीं, जवळच्या एका जंगलांत तात्याला पाहिलेला एक शेतकरी आपणाकडे बातमी देण्यास आला आहे." पहारेकऱ्यानें जल्दीनें आपल्या धन्यास वर्दी पोंचविली; त्याबरोबर तो उठून बाहेर आला; व त्या गुप्तवेषी तात्याच्या तोंडून सर्व वर्तमान ऐकून क्षणाचाही विलंब न करितां आपली बंदूक घेऊन व घोड्यावर स्वार होऊन त्या वेषधारी तात्यांच्या मागोमाग तो जंगलांत निघाला. तात्या त्यास एका घोर जंगलांत घेऊन गेला व अखेर अशा ठिकाणीं त्यानें त्यास नेलें कीं, घोड्यावर बसून तेथून जाणें अशक्यच झालें. तो घोड्यावरून खालीं उतरला व तात्याच्या विचारानें घोडा एका झाडास बांधून ते दोघे पायींच पुढें निघाले. यानंतर तात्यानें त्यास अशा अडचणीच्या जागीं नेलें कीं, तेथें खालीं बसून उठण्याच्या वेळेस तेथील झाडाझुडपांच्या आश्रयानें उठावें लागत होतें. तो पोलिस अधिकारी हातांतील बंदुकीसह प्रथम खालीं बसला व मग झाडाची डहाळी धरून उठूं लागला; पण त्यास उठतां येईना! अखेर त्यानें आपले हातांतील बंदुक तात्याच्या स्वाधीन केली व मोठ्या कष्टानें उठून उभा राहिला. पण पुढें पहातो तों आपला साथीदार कोठें दिसेना! इकडे तिकडे टेहळून पाहूं लागला तों तो आपला साथीदार आपली बंदुक हातीं घेऊन व आपल्याच घोड्यावर स्वार होऊन दुसऱ्या मार्गानें त्या ठिकाणीं येत आहे असें त्यास

दिसलें. जवळ येऊन तो त्या पोलिसअधिकाऱ्यास ह्मणतोः- "तात्याला पकडण्याचें तुझें काम नव्हे; व असेल तर पकड. मीच तात्या आहें. यावेळीं तुझ्याजवळ कसलेंही शस्त्र नाहीं. मी तुझीच बंदुक घेऊन तुझ्याच घोड्यावर बसलों आहें; जर यावेळीं माझ्या मनांत आलें तर मी जागच्या जागीं तुला ठार मारूं शकेन! पण माझी तशी इच्छा नाहीं; तथापि तुला कांहीं शिक्षा देणें योग्य आहे; ह्मणून मी तुला सांगतों कीं, तूं आपले सर्व कपडे येथें काढून ठेवून चालता होशील तर तुझें कल्याण आहे; नाहीं तर फुकट तुला येथें प्राण द्यावा लागेल." तात्याचें हें भाषण ऐकून तो अधिकारी अगदीं भयभीत झाला. आधींच त्यास कोणाची मदत नाहीं; व त्यांत निःशस्त्र! यामुळें त्यास मुकाट्यानें आपले सर्व कपडे तेथें काढून ठेवून चालतें व्हावें लागलें. घोड्यावर स्वार झालेला तात्याही त्याची ती अवस्था पाहून हंसत हंसत निघून गेला.

२ एके दिवशीं तात्याला समजलें कीं, आपणाला पकडण्याकरितां सरकार अगदीं आतुर झालें असून आपणास पकडण्याकरितां कित्येक अधिकाऱ्यांची योजना झाली आहे. सदर अधिकारी आपल्या तपासाकरितां अमुक दिवशीं अमुक रेल्वेस्टेशनवर येऊन उतरणार आहेत, याचाही त्यानें पत्ता काढला व त्या दिवशीं आपण स्वतः हमालाच्या वेषानें त्या स्टेशनवर हजर राहिला. सदर अधिकारी मंडळी रेल्वेंतून स्टेशनावर येऊन पोंचतांक्षणीं इतर हमालाप्रमाणें तात्यांही त्यांचें सामान डब्यांतून बाहेर काढून त्यांच्या उतारायाच्या ठिकाणीं घेऊन चालला.

सामान घेऊन जातां जातां त्या अधिकाऱ्यांच्या एका शिपायाजवळ तात्यानें गप्पा मारण्यास सुरवात केली. बोलतां बोलतां तात्या भिल्लास पकडण्याचे कामावर आमची नेमणुक झाली असून तेवढ्याच कामाकरितां आह्मीं येथें आलों आहों, हेंही तात्यानें त्या शिपायाच्या तोंडून वदवून घेतलें व नंतर तात्या त्यांस ह्मणाला:— " तात्यासंबंधीं बरीच माहिती मजला आहे. " शिपायानें तें ऐकून ती बातमी आपल्या अधिकाऱ्यास जाऊन कळविली. त्या अधिकाऱ्यानें हमालवेषधारी तात्यास बोलावून घेऊन त्यास सर्व हकीकत विचारिली. यावेळीं तात्या कोठें आहे, हेंही त्यांस त्यानें सांगितलें व लागलींच सर्व शिपायांसह त्या हमालास घेऊन सदर अधिकारी तात्याच्या शोधार्थ निघाला. जातां जातां ते सर्व लोक भूक आणि तहान यांनीं व्याकुळ झालेले पाहून वेषधारी तात्या एका दाट जंगलांत घुसला. त्या ठिकाणीं त्यानें आपली ओळख सर्वांस दिली व आपणास धरण्याबद्दलही त्यानें त्यास हाकारलें. लोक त्यास धरण्यास धांवल्याबरोबर तो त्या जंगलांत एकदम नाहींसा झाला. त्या पोलिसच्या टोळीनें त्या जंगलांत त्याचा पुष्कळ तपास केली; पण पत्ता लागेना; तेव्हां निराश होऊन ते थकले भागलेले व तहान-भुकेनें व्याकुळ झालेले लोक एका झाडाखालीं सावलींत विश्रांति घेत बसले; व पुढें काय करावें याचा विचार करूं लागले. इतक्यांत आपल्या मागें कोणी " हां, हां, " करून हंसत आहे असें त्यास वाटलें; व मागें वळून पहातात तों मघाचाच हमाल वेषधारी तात्या खदखदा हंसत आहे ! ! ते पुन्हा त्वरा करून त्यास धरण्यास धावले; पण तो कसचा सापडतो! त्याच जंगलांत तो पुनरपि

कोणीकडच्या कोणीकडे नाहींसा झाला ! ! त्यांनीं पुष्कळ शोध केला; पण अखेर निराश होऊनच त्यास परत आपल्या ठिकाणीं यावें लागलें. आपली फजिती होईल, ह्मणून त्यांनीं ही गोष्ट बाहेर फोडली नाहीं.

३ एके दिवशीं तात्या गुप्त वेषानें एका पोलिसठाण्यावरून चालला होता. त्यावेळीं त्या ठाण्याचा इन्स्पेक्टर हजामत करण्याकरितां न्हावी पहात होता. तात्यानें तितक्यांतल्या तितक्यांत वस्तरा इत्यादि साहित्य जमवून त्या ठाण्यावरून तो चालला. त्यांस एका पोलिसानें पाहिलें व इन्स्पेक्टरसाहेबांची हजामत करण्याकरितां ठाण्यांत नेलें. हजामतीस सुरवात झाली व त्याबरोबर तात्यासंबंधीं विषयही निघाला. तात्याला एकडण्याकरितांच ही पोलिसचौकी स्थापन झाली आहे; पण बहुत श्रम केलें तरी तात्याचा पत्ता लागत नाहीं, असे इन्स्पेक्टरसाहेब बोलले. इन्स्पेक्टरसाहेबास होणाऱ्या त्रासाबद्दल दु:ख प्रदर्शित करून तात्या ह्मणाला:— " मला तात्यासंबंधीं पुष्कळ माहिती आहे. " इन्स्पेक्टरसाहेबांनीं लागलींच चौकशीस सुरुवात केली. तात्यानें बोलतां बोलतां सांगितलें:— " तात्याची हजामत बनवून मी नुकताच आलों तो या पलीकडल्या जंगलांत गुप्तरीतीनें राहतो." न्हाव्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच इन्स्पेक्टरसाहेबांच्या तोंडास पाणी सुटलें. ते इनामाची लालूच दाखवून न्हाव्यास ह्मणतात:—" माझी हजामत लवकर आटोपून तात्या कोठें आहे तो मला दाखीव. मीं आतांच्या आतां त्याला कैद करतों; व मग तुझ्या बक्षिसाचीही व्यवस्था करितों. " —

इन्स्पेक्टरच्या या भाषणास कबूल न होतां अखेर

तात्यानें ती गोष्ट मोठ्या संकटानें कबूल केल्यासारखें दाखविलें व हजामत लवकर लवकर करण्यास त्यानें सुरुवात केली. अर्धी अधिक हजामत झाल्यावर तो वेषधारी तात्या त्यास ह्मणूं लागलाः—" महाराज, तुह्मी तात्यास पहाणार व पाहिलें तर त्यास धरणार ह्मणतां ? तात्याला पकडण्याइतकी शक्ति आपल्यांत आहे ? जर त्यास आपण पकडणार ह्मणतां, तर पकडा ! मीच तात्या." असें ह्मणत ह्मणतच तात्यानें आपल्या हातांतील वस्तऱ्यानें इन्स्पेक्टरसाहेबांचें नाक झटकन् कापून पलायन केलें. त्याच्या मागोमाग ठाण्यातील सर्व शिपाई धावले; त्यांनीं त्यास पकडण्यासाठीं अगदीं धुमाकूळ उठवून दिला; पण तात्या त्यांच्या सुपाळ्यांतून कसा व कोठें निघून गेला, याचा थांगही लागला नाहीं. तेव्हां इन्स्पेक्टरसाहेब तात्याची आशा सोडून रक्ताची धार लागलेल्या नाकाची शुश्रूशा करण्याच्या उद्योगास लागले.

४ तात्या स्त्रियांना फार मान देत असे. एकदां एक नवरी मुलगी लग्न आटोपून पालखींतून नेण्यांत येत होती. तात्यानें पालखीपाशीं जाऊन तिचा चेहरा पाहिला व तिला आपली मुलगी समजून बरेच दागिनें त्यानें तीस दिलें. *

५ एके दिवशीं तात्या कोठून दरवडा घालून चालला होता; वाटेनें त्यास कांहीं मंडळी मोठ्या समारंभानें जात असलेली दिसली. जवळ जाऊन पहातां लग्नाची वरात चालली आहे असें त्यांस दिसलें. नवरानवरी पालखींत

* ही गोष्ट एका वर्तमानपत्रांत आली असून त्यावेळीं इंदुरांत राहणारे बाबू गिरजाशंकर यांच्या बोलण्यांत या गोष्टीचा उल्लेख नेहमीं होत असे.

बसले असून वाजंत्रीं वगैरे वाजत मोठ्या समारंभानें वरात चाळली होती. तात्या आपल्या लोकांसह तेथें गेला. त्यास पहातांच सर्व लोक भयभीत होऊन पळूं लागले; पण तात्यानें त्यास अभय देऊन नवरा-नवरी पहाण्याची इच्छा प्रदर्शित केली. लोकांनीं भीत भीत त्यास पालखीपाशीं नेलें. नवरा-नवरीस पाहून तात्या असंतुष्ट झाला व ह्मणाला:—अशा रूपवान् कन्येला दागिने कां नाहींत? तिच्या अंगावर दागिने घालण्यांचें सामर्थ्य तुमच्याजवळ नव्हतें तर मला आधीं कळवायचें होतें!" असें बोलून त्यानें दरवडयांत मिळविलेले दागिने त्या वधुवरांच्या अंगावर घातले व नंतर त्या मंडळीस उद्देशून तो ह्मणाला:-पहा, आतां हा जोडा कसा शोभतो तो?". तात्याचें हें वर्तन पाहून सर्व विस्मित झाले व तद्नंतर तात्याही आपल्या लोकांसह तेथून निघून गेला.

एकतिसावा परिच्छेद.

तात्याची न्यायकोर्टांत चौकशी

ता. २६ सपटंबर रोजीं जबलपुरचे डेप्युटी कमिशनर मि. इस्मेसाहेब यांजपुढें तात्या भिल्लास प्रथमतः चौकशीस उभें केलें. चांगला बळकट बांधून पोलिसच्या बेन्यांत त्यास स्वतः बडे पोलिससाहेब कचेरींत घेऊन आले. तात्याला पाहण्यास व तात्याचा खटला ऐकण्यास हजारों लोक कचेरींत जमले होते. कोर्टाची जागा व भोंवतालचें अवार प्रेक्षकांनीं अगदीं ठेंचून भरून गेलें.

जबलपुरचे डिस्ट्रिक्ट पोलिससुपरिंटेंडंट हॅमिल्टनसाहेब, खांडव्याचे डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट मि. स्किपन व एक बॅरिष्टर असे सरकारतर्फे खटला चालविण्यास हजर होते. तात्याच्या तर्फे कोणीही नव्हतें.

प्रथम दिवशीं फारसें काम झालें नाहीं; पण त्यानंतर ता. २८ रोजीं ८ साक्षी होऊन पोखरगांवांतील दरवडा व गाजियेचें नाक कापणें हे आरोप त्याच्यावर शाबीत झाले. यावेळीं तात्यांच्या ह्मणण्याचें समर्थन करणारा कोणीही नव्हता; अर्थात् तात्या स्वतःच साक्षीदारांस प्रश्न वगैरे करूं लागला. मॅजिस्ट्रेटच्या प्रश्नांस जबाब देतांना त्यानें नाक कापिल्याचें कबूल केलें व नाक कापण्याचें कारणही त्यानें सांगितलें; तेव्हां डेप्युटी कमिशनरसाहेबांनीं त्याजवर ३९९ व ३९७ प्रमाणें चार्ज ठेऊन त्यास सेशनकमिट केलें.

ता. ५ आक्टोबर रोजीं तात्याचा खटला सेशनांत निघावयाचा होता, पण दुर्गापूजेनिमित्त तो दिवस तहकूब राहून ७ आक्टोबर तारीख नेमण्यांत आली.

इकडे ता.१ अक्टोबर रोजीं डेप्युटी कमिशनरसाहेबांपुढें खुनासहित दरवडा घालण्याच्या आरोपावरून त्याची चौकशी झाली. हिम्मतपाटलाचा खून ज्या दरवड्यांत झाला, तो हा खटला होय.

ता.७ अक्टोबर रोजीं सेशनकोर्टांत तात्यांच्या चौकशीस आरंभ झाला. जज्जसाहेब व दोन असेसर यांचें मत तात्या दोषी आहे असें ठरलें; व दरवडा घालणें आणि नाक कापणें या अपराधाबद्दल त्यास जन्मठेप (काळ्यापाण्याची) शिक्षा देण्यांत आली.

ज्यावेळीं तात्यास ही शिक्षा सांगण्यांत आली, त्यावेळीं कोर्टांत अनेक प्रांतांतील हजारों लोक जमले होते. तात्यास झालेली शिक्षा ऐकून ते लोक कोणी दुःख करीत व हंसत हंसत चालते झाले. तात्याचे शत्रु तात्यास फांशीची शिक्षा झाली नाहीं ह्मणून व मित्र त्याचा सर्व जन्म आतां तुरुंगांत जाणार ह्मणून दुःख करीत होते; आणि शिक्षा झाली ह्मणून व फांशीची शिक्षा झाली नाहीं ह्मणून आनंद मानणारेही तात्याचे कित्येक शत्रू व मित्र त्या जमावांत होतेच. असो.

वरीलप्रमाणें शिक्षा झाल्यावर त्याजवरील राहिलेल्या आरोपाची चौकशी करण्याकरितां त्यास पुनरपि जेरबंद बांधून डेप्युटी कमिशनरसाहेबांच्या कचेरींत आणण्यांत आलें.

छत्तिसावा परिच्छेद.

तात्याची पुढील चौकशी.

खुनासहित दरवडा घालण्याच्या आरोपावरून ता. ९ अक्टोबर रोजीं तात्याची जी चौकशी डेप्युटीकमिशनरसाहेब्यापुढें झाली त्याच कामास पुढें सुरवात झाली. कमिशनरसाहेबांचें कोर्ट प्रेक्षकांनीं अगदीं भरून गेलें होतें. सेशनची शिक्षा झाल्यावर ता. ७ अक्टोबर रोजींच हा खटला इकडे निघाला होता. या दिवशीं कांहीं साक्षी घेऊन कोर्ट उठलें. दुसरे दिवशीं कांहीं साक्षी घेण्यांत आल्यां ९ ता० अक्टोबर रोजीं हिम्मत पाटलाचा खून केल्याच्या आरोपावरून डेप्युटीकमिशनरसाहेबांनीं तात्यास सेशनकमिट केलें.

ताल्याचा मुख्य सरदार बिजानिया धरला गेला, तेव्हां ाजवर एकेक मिळून चार दरोडे घातल्याचे आरोप शाबीत रण्यांत आले व एकेक मिळून चार वेळ त्यास शिक्षा ण्यांत आली. पोलिसांना एवढ्यावरही संतोष न होऊन ांनीं त्याजवर हिम्मत पाटलाचा खून केल्याबद्दल खटला ला व त्यांतच त्यास फांशीची शिक्षा झाली. तात्यालाही ाचप्रमाणें जन्मठेपेची शिक्षा झाली असतां पुन्हां त्याजवर म्पतपाटलाचाच खून केल्याबद्दल खटला करून ता० १९ क्टोबर रोजीं सेशनमध्यें त्यास चौकशीस आणण्यांत आलें. ान तीन पोलीस अधिकारी व एक बॅरिष्टर तात्याच्या विरुद्ध- ुरावा करण्यास उभे राहिले. तात्या एकटा होता. त्याच्या र्फे न्यायाधिशास दोन गोष्टी सांगण्यास कोणीही तयार व्हता. असो. खटल्यास सुरवात झाली; साक्षी नेण्यांत आल्या व तात्यावर खुनाचा आरोप शाबीत झाला; व त्यास जज्जसाहेबांनीं फांशीची शिक्षा सुनाविली. प्रेक्षक लोक कोणी आनंद मानीत व कोणी दुःख करीत आपापल्या ठिकाणीं गेले. तात्यास पूर्वीप्रमाणेंच पक्का जखडून जबल- पुरचे तुरुंगांत नेण्यांत आलें.

तेहेतिसावा परिच्छेद.

उपसंहार.

आपल्या चौकशीच्या शेवटल्या अवस्थेंत तात्या अगदीं शिथिल झाला होता. शेवटचे दोन तीन दिवस तर त्यास अन्न खाण्याचेही क्लेश झाले. खुल्या मैदानांत राहण्याचा, झाडा-

खालीं दिवस काढण्याचा, कडक उन्हाळा व मुसळधार पावसाचा मारा त्यास पूर्वी सहन करावा लागत होता. कोरडी भाकर व हिरवीं कच्चीं फळें खाऊन त्यास दिवसाचे दिवस काढावे लागत होते. अशा प्रकारें आयुष्य घालविणाऱ्या मनुष्याचें बल किती दिवस टिकणार ? ज्या प्रतापी तात्यास धरण्याकरितां वीरशिरोमणी इंग्रजास इतके दिवस खटपट करावी लागली, ज्याच्या बुद्धिकौशल्यापुढें होळकरी अम्मलदारांचा अभिमान जिरून गेला होता, त्या तात्याची अवस्था ४५ वर्षांचे वयांत अगदीं क्षीण येण्यासारखी होऊन गेली. त्यास फाशीची शिक्षा झाल्याचें ऐकून कोणास दुःख होणार नाहीं ? कोणाच्या डोळ्यांस पाणी येणार नाहीं? कोणाच्या हृदयांत त्या दरिद्रीरक्षकाचें चित्र उमटणार नाहीं ? तात्या दरिद्री लोकांचा बंधु होता, यामुळेंच मध्यहिंदुस्थानांतील कंगाल प्रजा त्याची आठवण करून आजही रडत असते !

तात्या मध्यहिंदुस्थानांतील भिल्लांमधील एक प्रमुख दरवडेखोर होता. त्यानें अनेक वेळां अनेक ठिकाणीं दरवडे घातले, अनेक गांव जाळले, अनेक लोकांचीं नाकें कापून त्यांस जन्माचे नासिकारहित त्यानें करून टाकलें; अनेक लोकांचे प्राण घेण्यास तो कारण झाला, अनेक गांवें लुटून अनेक लोकांस त्यानें भिक्षेस लावलें, तथापि त्याच्याकरितां डोळ्यांतून पाणी येतेंच ! हृदय शांत होत नाहीं. एका साधारण मनुष्याच्या विश्वासघातकीपणामुळें तो सांपडला; व अखेर त्याचा परिणाम झाला तो ऐकून कोणाच्या हृदयास वेदना होणार नाहींत ? व कोणाच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहणार नाहींत ?

तात्याचा उद्योग, त्याचें शौर्य, साहस, चातुर्य इत्यादीं बद्दल ज्यानें गोष्टी ऐकल्या, तो थक्क झाला; ज्यानें ते प्रकार पाहिले, त्याची अक्कल गुंग होऊन गेली व ज्यानें त्यासंबंधीं विचार केला, तो हतज्ञान होऊन गेला.

इंग्रज सरकारानें आपली अगणित शक्ति खर्च करून होळकरसरकारच्या सैन्याचे सहाय्यानें तात्याला पकडण्याकरितां ११ वर्षें पर्यंत अतिशय कष्ट, परिश्रम व यत्न केले; पण त्याचें फल मिळालें नाहीं. किती लष्कर व किती सरदार त्याच्या मागें धावले, व किती एक प्रसिद्ध पोलिसअधिकाऱ्यानीं जंगलें व पर्वत धुंडाळले, पण तात्या सांपडला नाहीं. त्याच्या निमित्तानें किती एक लोकांचे अपमान झाले, किती एक लोक तुरुंगांत गेले, व किती एक गांवें उजाड झालीं; पण तो सांपडला नाहीं.

शेतकऱ्यांचे वेष धरून तात्यानें पोलिस लोकांस फसवून जंगलांत नेलें व तेथें त्यांची निर्भर्त्सना केली. हमालाच्या वेषानें मोठमोठ्या पोलिस अधिकाऱ्यांस फर्शी पाडले, कित्येकांचीं नाकें कापलीं, व अशा तऱ्हेनें सरकारी अधिकाऱ्यांस त्यानें अगदीं सतावून सोडलें.

श्रीमंतांस लुटून निर्धनास द्रव्य द्यावयाचें, कंजुषास दरिद्री बनवायाचें, व दुष्टांस शिक्षा करून सुष्टांस मदत करावयाची, हा त्याचा बाणा असे. त्यानें अनेक लोकांचा सत्यनाश केला, पण त्यांच्या बायकांमुलांस त्यानें यत्किंचितही दुखावलें नाहीं; इतकेंच नव्हे तर स्त्री, वृद्ध, बालक व ब्राह्मण, यांना जर त्याच्या अनुचरांपैकीं कोणी दुखावलें; तर तो त्यांस दंड करीत असे.

या गुणांमुळें तात्या ऊर्फ तंट्या भिल्ल जरी भयंकर द‍र‍वडेखोर होता, तरी सर्वांस प्यारा होता व याच कारणामुळें त्याला फांशीं दिल्याचें ऐकून मध्याहिंदुस्थानांतील लोक फार हळहळले व ह्मणूनच त्याच्यावर खून, चोरी, दरवडा, घरें जाळणें, नाकें कापणें इत्यादि आरोप शाबीत होऊनही त्यास फांशीची शिक्षा दिल्याबद्दल कोणासही संतोष वाटला नाहीं.

समाप्त.